# कवि माधव

यांची

# कविता


९२३५

म. ग्रं. सं. ठाणे

विषय काव्य

सं. न. २०४

११३२

३८३

REFBK-0005350


माधव केशव काटदरे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र.
ता.
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं
ठाणे



माधव केशव काटदरे

# कवि माधव यांची कविता

श्री. माधव केशव काटदरे

[ प्रकाशक—हरि विष्णु मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई ७ ]

REFBK-0005350

५३५०

किंमत सव्वा रुपया

[ नोव्हेंबर १९३५ ]

मुद्रक

मंगेश नारायण कुळकर्णी, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस,

कर्नाटक हाउस, चिराबाजार मुंबई २

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. न.
ता.
ठाणे

श्रीयुत रा. रा.

डॉ. विनायक नारायण रेगे,

एल्. एम्. ॲण्ड् एस्.

मुंबई

यास

सादर व सविनय

**समर्पण**

माधव

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

वंगकविश्रेष्ठ डॉ रवींद्रनाथ टागोर यांच्या कवितावरून लिहिलेलीं सात पद्यें या पुस्तकात समाविष्ट केलेलीं आहेत (खंड १ व ३) हीं पद्यें आपल्या इतर पद्यांबरोबर प्रसिद्ध करण्याची परवानगी खुद्द डॉ टागोर व त्यांच्या कवितेचे प्रकाशक मे. मॅकमिलन आणि कंपनी, (लंडन) यांनी मला दिलेली आहे

**माधव केशव काटदरे**

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| आराध्य देवतेस– ... ... ... ... | १ |

**खंड पहिला**

| | |
|---|---|
| तूं उषा हांसरी ! ... ... ... . | ५ |
| सोनावळ ... ... ... ... .. | ५ |
| कुरङ्ग ... ... ... ... ... | ६ |
| बालमुकुन्द ... .. ... ... | ७ |
| मत्स्यकन्या मीनाक्षी ... ... ... | ८ |
| नव्या खेळाड्याची विचारपूस ... ... ... | ८ |
| बाळा नीज ! ... ... ... ... | १० |
| गमे मजला हें नवल यमूबाई ! ... ... | १० |
| पोहायला शिकणारा बाळ्या ! ... ... ... | ११ |
| तो कां रागावला. ... ... ... ... | ११ |
| कोण बाळ हा फिरे वनीं ? ... ... ... | १२ |
| ये, ये ! ये राजा ! ... ... ... ... | १३ |
| नको जाऊं बाहेर आज बाळा ! ... ... ... | १४ |
| एका रात्रींची गंमत ! ... .. ... | १६ |
| आटपाट नगरातील काहाणी ! ... ... ... | १७ |
| होणार तुझ्या जर हास्याचा लय येथें— ... . | १८ |

**खंड दुसरा**

| | |
|---|---|
| वसंतास— ... ... ... .. | २१ |
| हिरवें तळकोंकण ... ... ... ... | २१ |

अनुक्रमणिका

| कवितेचें नांव | पृष्ठ. |
|---|---|

## खंड तिसरा


| | |
|---|---|
| कृष्णकमळी ... ... ... ... | २७ |
| जणुं उषा ! ... ... ... ... | २७ |
| मत्स्यकन्येचें विरहगीत ... ... ... | २८ |
| प्रथम दर्शन ... ... ... ... | २९ |
| कला तव कळुनि मला ये पुरी ! ... ... ... | ३० |
| याचना ! ... ... ... ... | ३१ |
| एकच घोट ! ... ... ... . | ३२ |
| वाचन आणि लेखन ! ... ... ... | ३३ |
| पारिजातकाच्या कळ्या ... ... ... | ३४ |
| तैसाच निघोनी जाई ! ... ... ... | ३४ |
| कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ? ... .... | ३५ |
| संपवीन अपुलें गाणें ! ... .... ... | ३६ |
| बरें तर ! संपीव !! ... ... ... ... | ३७ |
| करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला ! ... ... | ३७ |


## खंड चवथा


| | |
|---|---|
| तात्या पंतोजी ... ... ... ... | ४१ |
| गोपूकाका ... ... .... ... | ४२ |
| पंतांचा पराक्रम ! ... ... ... ... | ४६ |
| आळवणी ! .... .... ... .... | ४९ |
| जिवंत मृत ! ... .... ... ... | ५१ |
| झुंज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय ! .... ... | ५२ |


## खंड पांचवा


| | |
|---|---|
| बालकवींचें गायन ! ... ... ... ... | ५७ |
| समुद्र आणि कवि ... ... ... ... | ५८ |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| माधुरी तयाला ! | ५८ |
| दिवे आणि आरसे | ५९ |

## खंड सहावा

| | |
|---|---|
| मोग्याची मोहना | ६३ |
| महादेवशर्म्यांचा मृत्यु ! | ६५ |
| गेले ! बालकवी गेले ! | ६८ |
| कविवर्य टिळक यांचें निधन ! | ७१ |
| सन्त तुकाराम | ७५ |

## खंड सातवा

| | |
|---|---|
| भारतलक्ष्मी | ८१ |
| अग्रहायण आणि आर्यांचें मूलस्थान | ८१ |
| कवि ' विनायक ' यांस | ८४ |
| गोविन्दाग्रजाची मुरली | ८५ |
| ये पुढतीं सरसावून | ८५ |

## खंड आठवा

| | |
|---|---|
| कवि किती कवनीं परि वर्णिती ? | ८९ |
| शिवराजस्तव | ९० |
| शनिवारवाड्यापुढें ! | ९१ |

## खंड नववा

| | |
|---|---|
| चालवितों शाहीरगिरी | ९९ |
| शिवकालीन रायगड | १०२ |
| छत्रपतींचें पत्र | १०९ |
| शाहूचें दक्षिणेंत आगमन | ११४ |
| शाहुराजाचा उमराव | ११७ |
| इन्द्रोजी कदम | १२५ |
| तारापुरचा संग्राम | १३२ |

| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| मस्तानी ... | १३८ |
| सर्खेल सबळ आंगरे ! ... | १४४ |
| आग्र्याचें आरमार ... | १४७ |
| पानपतच्या मैदानावर ... | १४९ |
| वजीर शहावलीखान ... | १५१ |
| पानपतचा सूड ! ... | १५४ |
| जिवबादादा बक्षी ... | १५८ |
| सवाई माधवरावाचा मृत्यु ! ... | १६३ |
| अपूर्व किंकर ! ... | १६६ |
| गोकलखा ... | १७० |
| रावबाजींचें राज्यदान ... | १७३ |
| आमची शाहीरगिरी ... | १७७ |
| निर्वाणीचें निवेदन ... | १७९ |

## खंड दहावा

| | |
|---|---|
| एका प्राचीन महर्षींची प्रभूस प्रार्थना ... | १८३ |
| सृष्टीची उत्पत्ति ... | १८४ |
| उषा ... | १८५ |
| राजा वरुण ... | १८७ |
| नाथ तूं अनाथ जनांचा ! ... | १८८ |
| विश्वात्मा ... | १९० |

ग्रा. क्र. ५३५०

## आराध्य देवतेस—

रुचिरतमदेहिनी ! कल्पने ! मोहिनी !
कविमनोवासिनी ! देवते ! स्वामिनी !

त्वत्प्रभावें किती
तारका हासती
मधुरसें बोलती
वदन नसुनी !

भक्ति घे धवलिमा
प्रेम घे रक्तिमा
पाप घे कालिमा
तुजसि नसुनी !

सुयश तें पांढरें
हास्यही पांढरें
तुजमुळें हें खरें
दिव्य रमणी !

त्वां सुधा निर्मिली
सुरवरां ती दिली
कवनिं परि ठेविली
याहि भुवनीं.

नाक चांफेकळी
रदन मुक्तावली
तुजमुळें जाहलीं
भामिनीचीं.

भ्रू धनू जाहली
सोडि बाणावली
वेणिही शोभली
सर्पिणी कीं.

हस्त ते पंकजें
नेत्रही पंकजें
चरणही पंकजें
करिसि कवनीं.

अचर जे चर तयां
बोलके करुनिया
देसि गे ! वाङ्मया
काव्य, रमणी !

भूतलीं क्षणभरी
फिरसि, उडसी वरी !
कोण गे ! तव सरी
करिल भुवनीं ?

रोष तूं कविवरी
धरिसि जरि सुन्दरी
दाखि तो गुण तरी
कायकवनीं ?

---

# खंड पहिला

# तूं उषा हांसरी !

तू उषा हांसरी हांसत हांसत येसी,
स्वप्रसन्नहास्यें प्रसन्नता उधळीसी !
हांसुनी, आपणासवें जगा हंसवावें
यावांचुनि तुजला अन्य न कांहीं ठावें !

तर अशीच हंसरे हांस—सर्वदा;
हास्याची वितर जगास—संपदा !
पावो न हास्य विलयास—हें कदा !

हास्येंच तुझ्या या प्रवृत्ति जागी झाली !
हास्येंच तुझ्या, या हृदयीं गीतें फुललीं !

# सोनावळ

काय फुला !
नांव तुला ?
सांग सानुल्या सांग मला !

पिवळी ती
तव कान्ती
रमवी माझ्या मना अति !

गिरीवरी
रानभरी
कोणा ये ना तुझी सरी !

५३५०
स्वतंत्र प्रत
क्रमांक ११३२
ता
३

मोदभरीं
डोल तरी !
नाच नाच रे ! वायुवरी
हांस हंसें
लाव पिसें
शोभसि नभिंचें तारकसें !
गन्ध तुला
जरि नसला
भ्रमर तुला जरि नच भुलला,
आदरितो
परि तुज तो
पुष्पमित्र जो म्हणवीतो.
तों कानीं
ये वाणी–
" सोनावळ मी वनराणी ! "

---

## कुरडू.

–:०:–

माणिक, पाचू, इन्द्रनीलमणि जडले ज्याच्यावरी,
दिसे न आतां देवेन्द्राचें धनुष्य तें अंबरीं;
तळख बिजली चपलाईचा नाच न नाचे नभीं,
वाजायाचे बन्द जाहले देवांचे दुन्दुभि !
शेंदुरवर्णी सर्व चामठा नदीकिनारीं पळे
मावळावया आणि लागलीं पिवळीं सोनावळें;
तुरे साजिरे तांबुस दवळे खोवुनि अपुल्या शिरीं
हर्षभरानें डोलत राहे वनांत कुरडू तरी !

काय कारणें कुरङ्गला या हर्ष असा जाहला
असेल ज्यांना ठाउक त्यांनीं सांगावें तें मला.

---

# बालमुकुन्द.

नयन लोल, जणों कमळें निळीं !
रदन कुन्दलताकलिकावली !
अधर बिंबफलोपम सुन्दर
मधुर हास्यविलास तयावर. १

झांकिती निटिल, मारुतचंचल
कृष्णवर्ण कुरळे मृदु कुन्तल;
अंगकान्ति बघुनी झुरडे घन,
नाचती वनमयूरहि हर्षुन ! २

स्कंधावरी कंबल शोभताहे,
वेणू तशी यष्टि करांत आहे;
कटीतटीं अंबर पीत साजे
कर्णद्वयीं कुण्डल तें विराजे. ३

शीर्षावरी हालत मोरपत्र,
शोभे शशांकासम चारु वक्त्र;
मोदें असा बालमुकुन्द खेळे,
वनीं मुलांचे जमवून मेळे. ४

---

# मत्स्यकन्या मीनाक्षी.

कमरेपासुनि वरी मात्र जे हुबेहूब माणसें,
कमरेखालीं शरीर ज्यांचें परन्तु मासे तसें,
मत्स्यलोक ते सुखें राहती खोल सिन्धुच्या तळीं;
मुलखामध्य पडलीं त्यांच्या, रस्त्यावर पोंवळीं !
राजा त्यांचा महाप्रतापी वैभवशाली जरी,
टाकुनि मोत्यें धारण करितो शंखचि अपुल्या शिरीं !
त्या राजाची राजस कन्या मीनाक्षी सुन्दर
सांजवेळची आज पातली समुद्रतीरावर !
करुनि खेंकड्यावरि आरोहण फिरते पुळणीवरी !
हळुच बघा तिज ! ना तरि भिउनी जाइल ती सागरीं !

---

# नव्या खेळगड्याची विचारपूस.

"कोठुनि तू येसी येथें
तान्हुल्या ! सांग आम्हांतें."
'स्वर्गांतुनि येथें आलों,
तुमचा मी बन्धू झालों.'
"हे पाणिदार तव डोळे
तुज कैसे प्राप्त जहाले ?"
'गगनांतुनि मी येतांना
देवें मज दिधलें त्यांना.'

"अश्रु हे कुठें रे तुजला
लाधले ? सांग आम्हांला."
'येथेंच अश्रु हे होते
जन्मतां लाधले मातें.'

"हे गाल असे कां झाले ?
कीं गुलाब जैसे फुलले."
'पाहुनी तुम्हाला झाला
मोद तोच गालीं भरला.'

"स्मित कोणीं दिधलें तुजला ?
सानुल्या सांग आम्हांला."
'अप्सरा चुंबुनी मातें
देल्या मज झाल्या त्यातें."

"माकुल्या छान कानांला
तुज देता कोण जहाला ?"
'देवानें आज्ञा केली
कानांची जोडी आली !
हातपाय अवयव मजला
देवच तो देता झाला.'

"तव लाभ कसा आम्हांला
सोनुल्या ! सांग रे झाला ?"
'देवें मज धाडुनि दिधला
खेळगडी तुमचा केला !'

"केवढी कृपा ही प्रभुची !
या स्तुती करूं तर त्याची."

# बाळा नीज !

निज, निज, निज आतां तान्हुल्या ! पाळण्यांत,
दिवस निघुनि गेला, वाहतो शीत वात !
चमकति नभिं तारे, हो तरी अंधकार,
चिमुकलि न उदेली आज ती चन्द्रकोर ! १

सुखकर शिशुलीलां योग्य हा काल नाहीं,
म्हणुनि शयनिं आतां स्वस्थ तूं झोंप घेईं !
निज, निज, निज सोन्या ! बैसतें मीहि येथें,
वदत वदनिं 'जो ! जो !' पाळणा हालवीतें. २

नभिं बघुनि उषेला पक्षि गातील गाणीं,
खुलतिल मग बागा रम्य ऐशा फुलांनीं !
उगवुनि तंव देईं जो नव्या वासराला,
उठविल रवि तोची माझिया बांसराला ! ३

# गमे मजला हें नवल यमूबाई !

आठ घडले तव जणूं माणकांचे,
हसें गालावर गोड तुझ्या नाचे !
कळी फुलती नव पारिजातकाची
तशी मूर्ती चिमुकली तुझी साची ! १

चमक नयनीं जरि नसे तारकांची,
मुग्ध मोदाची वसति तरि सदाची;

चन्द्रलेखेची चारुता तुझ्यांत,
तुझें दर्शन आल्हाद जना देत ! २

अससि बाळे ! तू वयें जरी सान,
तरिहि जिज्ञासा आणि समाधान,
कशीं नांदति एकत्र तुझ्या ठायीं,
गमे मजला हें नवल यमूबाई ! ३

---

# पोहायला शिकणारा बाळ्या !

शिकावया पोहायाला
नदीवरी बाळ्या गेला;
तसाच परि परतुनि आला,
सांगुं लागला आईला—
"आई ! पाणी
ओलें म्हणुनी
आलों निघुनी;
कर आधीं कोरडें तया,
शिकेन मग मी पोहाया !"

ग्रंथ क्र. ९९३८

---

# तो कां रागावला.

"बाहेरुनी बघसि वांकुनि काय बाळ?
येवोनि आत बघ जें बघणें खुशाल !"
मी बोलिलों; परि न बाळ घरांत आला,
रागावुनी निघुनि तेथुनि शीघ्र गेला ! १

बाहेर त्यावरि पुन्हा बघुनी तयाला
त्याचा हळूच कर जाउनि म्या धरीला;
"बोलावितां तुजसि, कां पळतोस बाळ?"
केला तया चिमुकल्यास असा सवाल. २

झालाच दूर तंव तो हिसकून हात,
डोळे वटारुनि उभा मजला पहात!
दृष्टी तदीय परि भेदरवी न मातें,
मी हांसलों; बघुनि बाळ पळे घरातें! ३

त्यानंतरें मज पुन्हा दिसला पथात,
होता तया जनक हात धरून नेत;
आंठ्या अनेक पडल्या निमिषीं कपाळा,
"कोणीकडे?" म्हणुनि मी पुसतां तयाला. ४

"जाऊं नका मजशिं बोलत!" बाळ बोले!
"कां?" मी म्हणे, नयन वर्तुळ तोंच झाले!
तो गर्जला, "मजसि नाव असून 'बाळ्या,'
तुम्हा न लाज कशि 'बाळ' मला म्हणाया?" ५

---

# कोण बाळ हा फिरे वनीं?

फूलपांखरावरि बसुनी
कोण बाळ हा फिरे वनीं?
कोणाचा हा मधु ध्वनी
स्फुरण भरी वातावरणीं?
कोणाच्या मंजुळ गानीं
स्वर्गसुधा लाभे अवनी?

तरुवर जे गेले वठुनी
पल्लव त्यां दिधले कोणीं ?
कुणीं नटविली कुसुमांनीं
ही लतिकाकुंजश्रेणी ?
विखरुनि मोत्यें मृदुल तृणीं
कोण बाळ हा फिरे वनीं ?
तेजस्वी तारापंक्ति
नृत्य करी ज्याच्यावरतीं,
सरोवरीं त्या क्रीडेची
चन्द्रकला नौका याची !
करुनि तरंगां हिन्दोल
घे झोंके चिमणा बाळ !
चित्रें दावुनि नित्य नवीं
रिझवी या संध्यादेवी !
गाउनियां याला गाणीं
मधुपांची निजवी राणी !
सांगा तर मजला कोणी
कोण बाळ हा फिरे वनीं ?

---

# ये, ये ! ये राजा !

ये, ये ! ये राजा ! दे भेटी जीव झुरे तुजसाठीं,
राजस हातांनीं मार मिठी दृढतर माझ्या कंठीं !
मोत्यें अश्रूंचीं तुजवरुनी काढिन ओंवाळोनी !
रम्य तुझें रूप फिरफिरुनी पाहिन डोळे भरुनी !

मम सुखशान्तीचें अभिराम तूंच सख्या ! प्रिय धाम,
पावे तुजपाशीं विश्राम माझा आत्माराम !
इन्दीवरतुल्य नेत्रांनीं अवलोकीं ही अवनी,
एकचि दृक्पातें पहा क्षणीं जाइल कैशी फुलुनी !
मंजुळ तव हास्यें प्रसन्नता येइल साऱ्या जगता
मधुर तुझें गीत कोमलता शिकविल कठोर चित्ता !
पळेल नैराश्य ऐकून स्फूर्तिप्रद तव गान,
शाहिर सृष्टीचे पक्षिगण जातिल वेडावून !
वाजवुनी पांवा भारून टाकूं या हें भुवन;
पडतिल कृष्णघन कोसळुन सुटुनी सारें भान !
डोलत राहील निजदृष्टी मिटुनी मोदें सृष्टी !
ये, ये ! ये राजा ! दे भेटी जीव झुरे तुजसाठीं.

---

# नको जाऊं बाहेर आज बाळा !

( डॉ॰ रवीन्द्रनाथ टागोर यांच्या The Crescent Moon मधील The Rainy Day या कवितेवरून )

नभा आच्छादित करी मेघमाला;
तिमिर दाटुनियां वनीं राहियेला.
होति जर्जर बहु तालवृक्ष सारे
जवन पवनाशीं झुंजतां बिचारे ! १

पंख पर्जन्यें भिजुनि मलिन झाले,
स्तब्ध चिंचेवरि काक बैसलेले !
नदीनिर्जनतट भीति दे मनाला,
नको जाऊं बाहेर आज बाळा ! २

वईपाशीं बांधुनी ठेविलेली,
गाय कपिला बापुडी भिजुनि गेली !
तिला बांधुनि गोठ्यांत परत येतें,
बसुनि बाळा तोंवरी रहा येथें. ३

जागजागीं शेतांत भरे पाणी !
धरिति मासे जाउनी तिथें कोणी !
गल्लिगल्लींतुनि करित खळखळाटा
गढुळ पाणी बुझवितें सर्व वाटा ! ४

करुनि घोडा आपुला समीराला
स्वार त्याच्यावरि मेघ गमे झाला !
नदीवरुनी घागरी आपुलाल्या
कधिंच भरुनी बायका परत आल्या ! ५

तऱ्यालागीं हा कोण हांक मारी ?
बन्द तरिची जाहली असे फेरी !
असे आला सरितेस महापूर
ऐक बाळा ! गर्जना तिची घोर ! ६

दिवे अजुनी आहेत पुसायाचे,
सांज झाली तरि न तें कळायाचें !
जागजागीं मार्गांत चिखल झाला,
नको जाऊं बाहेर आज बाळा ! ७

वाघ सांपडतां पिंजऱ्यांत जैसा,
वनीं वेळूंच्या वायु आज तैसा,
क्षुब्ध होउनि धडपडे सुटायाला
शब्द त्याचा दे भीति बालकांला. ८

---

# एका रात्रीची गंमत !

वनीं गालिच्यावरी फुलांच्या बसला चन्दनहिरा,
वनदेवांचा चिमणा राजा, बनाइचा नोवरा !
सन्निध त्याच्या बसली त्याची चिमणी ती नोवरी
इवलीं इवलीं पुष्पभूषणें घालुनि अंगावरी !
पुढें तयांच्या दूर्वाच्छादित हिरवें क्रीडांगण,
वनदेवी वनदेव नाचती धरुनि तिथें रिंगण !
रात्र चांदणी, शुभ्र चांदणें, नाच रंगला वनीं,
बघती चन्दनहिरा बनाई इवल्या निज लोचनीं !
जलाशयाच्या तळीं सदाचा निवास ज्यांचा खरा
नाच पहाया जळांतुनी त्या वर आल्या आसरा !
रात्र चांदणी, शुभ्र चांदणें, नाच रंगला वनीं,
जलाशयांतुनि बघति आसरा नयनें विस्फारुनी !
नाच पहाया अधीर झाल्या स्वर्गदेवता मनीं
आल्या गगनीं त्वरें रुपेरी अभ्रांवर बैसुनी !
वनदेवींचा वनदेवांचा नाच चालला वनीं
वांकवाकुनी स्वर्गदेवता बघती गगनांतुनी !
दाटी झाली गगनामध्यें, वाव न उरला मुळीं,
अभ्रांनीं नभ भरलें, पडल्या छाया भूमीतळीं !
पळे चांदणें, नाच थांबला, चन्द्र कोपला मनीं,
अभ्रांलागीं देऊं लागला हातांनीं ढकलुनी !
हलतां अभ्रें स्वर्गदेवता कोसळती खालतीं !
'तुटके तारे !' वनदेवी वनदेवहि उद्गारती !
'पडतिल अंगावरी !' म्हणोनी होय पळापळ क्षणीं !
कुठला राजा ? कुठली राणी ? कुणा पुसेना कुणी !

जवळ आसरा जलाशयाचा तळ करिती सत्वर !
गाठिति चन्दनहिरा बनाई वेगें गिरिगव्हर !

---

# आटपाट नगरांतील काहणी !

"बुलबुल गवई कुणीं मारिला?" चिमणा म्हणतो 'मीं!'
"कां रे चिमण्या सांग मारिला बुलबुल तूं नामी?"
'कारण कसलें घेउनि बसलां जगांत हर कामीं?
नवी धनुकली सहज पाहिली आहे का नामी!'
बोलुनि ऐसें हंसत उडाला निर्दय चिमणा तो!
पकडुनि त्याला आणिल ऐसा कोण पुढें येतो?
म्हणे ससाणा 'पकडुनि त्याला घेउनि मी येतों!'
आणि आणिला खराच त्यानें पकडुनि चिमणा तो!
कबजामध्यें डोमकावळे घेती चिमण्याला,
न्याय तयाचा करावयाला हंस पुढें आला.
हसें दिधली चिमण्यालागीं शिक्षा देहान्त,
आणि आणिली बगळ्यानें ती क्षणांत अमलांत!
नेउनि टाकी नदींत कवडा चिमण्याचें प्रेत
सुसर माकुली ठाव तया दे अपुल्या उदरांत! १

* * *

मेलेल्या बुलबुलाभोंवतीं पक्षी मग जमले,
अश्रूंनीं आपुल्या तयाला त्यांनीं भिजवीलें !
सपक्ष गन्धर्वांस द्यावया शेवटला मान,
सर्व विहंगां खगेश्वराचें सुटलें फर्मान,

# वसन्तास—

चित्त झालें अत्यन्त हें उदास,
वसन्ता हे ! त्या मुदित करायास
त्वरें घेउनि ये दिव्यदृश्यमाला
पुरे झाला औदास्यमय हिंवाळा ! १

काळ जाइल जरि अल्प तुझ्या संगें,
सृष्टि, मनही रंगेल नव्या रंगें;
लास्य तूझें फुलवील फुलें रानीं !
हास्य तूझें फुलवील मनीं गाणीं ! २

---

# हिरवें तळकोंकण.

सह्याद्रीच्या तळीं शोभलें हिरवें तळकोंकण
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नन्दनवन !
झुळझुळ गाणें मंजुळवाणें गात वाहती झरे
शिलोच्चयातुनि झुरुझुरु जेथें गंगाजळ पाझरें;
खेळत खिदळत नद्या चालल्या गुणगंभीराकडे
दरिखोऱ्यातुनि माणिकमोतीं फुलुनि झांकले खडे;
नील नभीं घननील बघुनि करि सुमनीं स्वागत कुडा,
गोमेदांच्या नटे फुलानीं बरसातींत तेरडा !
कडेपठारीं खेळ मारुतासह खेळे हिरवळ,
उधळित सोनें हंसे नाचरें बालिश सोनावळ !

शारदसमयीं कमळवनाच्या तरल्या शय्येवरी
मदालसा स्वच्छन्द लोळती जलदेवी सुन्दरी !
कविकाव्यांतुनि तशी जींतुनी स्रवते माध्वी झरी
आमोदा उधळीत फुले ती बकुळीची मंजरी,
हिरव्या पिवळ्या मृदुल दलांच्या रम्य गालिच्यावरी
स्वप्नीं गुंगति गोकर्णांचीं फुलें निळीं पांढरीं !
वृक्षांच्या राईंत रमती शकुन्त मधु गायनीं
तरंगिणीच्या तटीं डोलती नाग केतकीवनीं !
फूलपांखरांवरुनि विहरती पुष्पवनांतिल परी
प्रसन्नता पसरीत वाजवुनि जादूची पांवरी !
शिताबाइच्या गोड हातचे पोहे जे कानमीं
रागानें दे बाइलवेडा कवडा भिरकावुनी,
रोपें त्यांचीं बनुनि पसरलीं नाचत चोहींकडे
अजुनि पहा या ! मण्डित त्यांनीं कोंकणचे हे सडे !
इतिहासाला वार्ता ज्याची श्रुत नाहीं जाहली,
दन्तकथांसहि विस्मृति ज्याची होउनियां राहिली,
" झिम्मा खेळे कोंकणचा तो नृपाळ " म्हणती मुली
" गळे वसन्तीं टपटप जेव्हां आंब्याची डाहळी ! "
कुठें आढळे फळभारानें लवलेली आंवळी,
कुठें गाळिती भुळभुळ अधुलीं पक्क फळें जांभळी;
कुठें हलवितो पिंपळपानें पिंपळ पारावर,
कुठें वडाच्या पारंबीवर झोंके घे वानर !
कुठें बेहड्यावरि राघूस्तव विरही मैना झुरे,
प्राणविसांवा परत न आला म्हणुनि चित्त बावरे !
मधमाशांचीं लोंबति पोळीं कुठें साविणावरी
रंग खेळती कुठें धमोर्दे पांगारे शेवरी !
पोटीं साखरगोटे परि धरि कण्टक बाहेरुनी
झुले कुठें तो फणस पुरातन रहिवासी कोंकणी.

कोठें चिंचेवर शठ आंबा करि शीतळ साउली
म्हणुनि कोपुनी नदीकिनारीं रातवो राहिली !
निर्झरतीरीं रानजाइच्या फुलल्या कुंजांतुनी
उठे मोहमय संगीताचा अस्फुट कोठें ध्वनी !
कुठें थाट घनदाट कळकिचा, त्यांत संचरे कुणी
पुंगि बजावित फन्दि मुशाफर दर्यापुर सोडुनी !
कुठें सुरंगीमुकुलकुलाच्या सस्मित वदनांतुनी
दरवळलेला परिमळ सेवित फिरति अप्सरा वनीं !
कोरान्टीचीं, नादवटीचीं, नेवाळीचीं फुलें
फुलुनि कुठें फुलबाग तयांनीं अवघे शृंगारिले !
नीललोचना कोंकणगौरी घालुनि चैत्रांगणीं
हिन्दोळ्यावरि बसविति जेव्हां अंबा शुभदायिनी,
हळदीकुंकूं तदा वांटितां नसो प्रसादा उणें
पिकलीं म्हणुनी रानोरानीं करवन्दें तोरणें.
औदुंबर तरु अवधूताचा छाया दे शीतळ,
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचें बळ,
बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ
आइन किंजळ करिती मान्त्रिकमन्त्रबळा दुर्बळ !
गडागडावर निवास जेथें माय भवानी करी,
राहे उधळित फुलें तिथें खुरचांफा चरणावरी !
पानफुलांच्या वाहुनि माळा अर्जनिच्या नन्दना
तिजवर वरुनी वैधव्याच्या रुइ चुकवी यातना !
' चिंव चिंव ' शब्दा करित निंबावर खार भराभर पळे,
भेंडिउण्डिणींवरी बैसुनी करकरती कावळे,
लज्जारंजित नवयुवतीच्या कोमल गालांसम
रंगुनि काजू, भरले त्यानीं गिरिडोंगर दुर्गम !
तिथें मण्डलाकार मनोहर नर्तन आरंभुनी
रुसल्या सखिची घुमत पारवा करितो समजावणी !

हंसे उपवनीं अर्धोन्मीलित सुवर्णचंपककळी
पाडुनि तुळशींवरी चिमुकली हलती निज सांउली !
केसर पिवळे, धवल पाकळ्या, परिमळ अबर भरी
घालित रुंजी भ्रमति भृंग त्या नागचंपकावरी !
सौगन्धिक उच्छ्वास सोडिती प्राजक्ताच्या कळ्या
लाजत लाजत हळुच उघडितां निज नाजुक पाकळ्या,
त्या उच्छ्वासां पिउनि बिजेचा चांद हर्षनिर्भरीं
होउनियां बेभान नाचतो निळावन्तिच्या घरीं !
धुन्द सिन्धुला मारवेलिची मर्यादा घालुन
उभी सैकतीं कोंकणदेवी राखित तळकोंकण;
निकट माजलीं निवडुंगांचीं बेटें कण्टकमय
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिन्दे निर्भय;
मागें त्यांच्या डुले नारळीपोफळिचें आगर
पुढें विराजे निळावन्तिचें निळेंच जळमन्दिर !
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित ऐसें नन्दनवन
सह्याद्रीच्या तळीं शोभलें हिरवें तळकोंकण.

---

# खंड तिसरा

## कृष्णकमळी

कुंजांत हिच्या घे कान्हा,
मुरलीवर मोहक ताना,
म्हणुनीच हिच्या सुमनांचा
मन्द गन्ध मोहक साचा !
कुजांत हिच्या घननीळ
प्रीतिचे खेळला खेळ,
म्हणुनीच हिच्या सुमनांचा
रंग नीललोहित साचा !

---

## जणुं उषा !

तुझे डोळे प्यारी !
प्रणयजलवापीच दिसती !
विलास स्वच्छन्दी
झषसमचि तेथें झळकती !
गमे तूं या लोकीं
चुकुनि अपुली आलिस दिशा
गुलाबी गालांची
थबथबित गोरी जणुं उषा !

---

# मत्स्यकन्येचें विरहगीत.

तळीं मी खोल सिन्धूच्या,
    तुझा भूमीवरी वास !
तुझी प्राप्ती मला कैंची ?
    असे वेडी परी आस !
मला वाटे तुझ्या संगें
    इथें सानन्द नांदावें !
जळाखालीं तुला कैसें
    परी जीवन्त आणावें ?
तुझ्या संगें रहायाला
    जरी मी भूवरी यावें,
जळींच्या मत्स्यकन्येला
    कुठोनी चालणें व्हावें ?
विसांवा तूं तरी माझा,
    तुझ्या ठायीं पुरा भाव !
कुडी येथें ! तुझ्यापाशीं
    सदा घोंटाळतो जीव !

---

# प्रथम दर्शन

तोंच ये निकट एक कुमारी,
इन्दुसुन्दरमुखी सुकुमारी !
पद्मपत्रसम राजस डोळे,
मुक्त, वक्र, मृदु, कुन्तल काळे १
हास्य लास्य करि नाजुक गालीं,
बुद्धिमत्त्वहि विशाल कपालीं !
लोहितोष्ठयुग विद्रुमरम्य
दाविती रदन मौक्तिकसाम्य ! २
मूर्ति पाहुनि तिची अभिराम
नेत्र घेति मम तेथ विराम;
लोचनांप्रति जशी रमणीय
मानसासहि गमे कमनीय ! ३
देखिल्या कितिक सुन्दर बाला
मोहसंभव न मन्मनिं झाला,
तोच पाहुनि हिला परि होई
केविं, हें नवल तों मजलाही ! ४
कार्य मात्र, नच कारण ठावें !
कां घनावलिस मोर भुलावे ?
अंबरीं उदय जों शशि पावे,
कां सरीं कुमुदवृन्द फुलावे ? ५
अन्य वृक्ष कितिएक विशाल
यत्फलें रुचिर आणि रसाल,
तूंचमात्र परि एक रसाला !
केविं सांग रुचलास पिकाला ? ६

किती लीलावति ! गोड तुझ्या लीला,
किती मोहक फेंकिसी कटाक्षांला !
करुनि मार्गच्युत कधिंच या जनासी
लाडिगोडी आणखीं चालवीसी ! ३

दूर करुनी आपुलें इन्द्रजाल,
मुक्त निज दासा करीं एक वेळ !
कुठुनि नातरि तुजलागिं अर्पिण्याला
हृदय मालकिचें लाधणें तयाला ? ४

---

# एकच घोट !

—:०:—

तर हृदयें आतां होउंदेत संलग्न,
राहुदे गडे ! दृष्टींत दृष्टि गुन्तून !
लुसलुशित आपुले लपवितेस कां ओंठ ?
घेउंदे त्यांतल्या एक सुधेचा घोट !
मृत्युशीं कराया समर चाललों आज,
सोडिना अजुनि तरि तुजसि लाजरे ! लाज !
होईन अमर मी अधर-सुधा तव पिउनी,
जाईन जवें मग मृत्युवरी चालोनी !
जो प्रेमाचें तव दिव्य कवच हें त्याला,
वद चिद्ध केविं त्या करिल मृत्युचा भाला ?
संगरीं शत्रुला क्षणार्धांत जिंकून,
आणीन सखे ! तव चरणाशीं बांधून !
    सोडणें उचित लज्जेस—जर नसे,
    तर खुशाल लाजत हास—हें हंसें !
    परि झांकुं नको वदनास—राजसे !

वियजाचा तुजवरि चढविन शाश्वत साज,
मज पाज एक तरि घोट सुधेचा पाज !

---

# वाचन आणि लेखन !

लडिवाळपणें जवळ येउनी
दीपापुढतीं हात धरोनी
विघ्न करिसि मज काव्यवाचनीं
केविं लडिवाळे ?— बालिश ही लीला बाले !
विश्वकवीची मोहक कविता
रसराज जिथें नाचे नुसता
सदैव ती तूं जवळी असतां
तुला अवगणिलें— म्हणुनि का तुझें हे चाळे ?
खरीच ही अरसिकता माझी
तुवां दाविली चतुरे ! आजी;
व्हावि न मजवरि परि इतराजी
येथुनी चाले— उचित तेंच वाचन बाले !

*　　*　　*　　*

मग्न असें मी काव्यलेखनीं
हळूच हांसत तोंच यउनी
ठेवितेस मसिपात्र लपवुनी
केविं वेल्हाळे ?— बालिश ही लीला बाले !
लुसलुशीतशा तव अधरावर
दंतीं लिहिणें काव्यें सुन्दर
प्रेमरसानें सखे ! निरन्तर
तया अवगणिलें— म्हणुनि का तुझे हे चाळे ?

खरीच ही अरसिकता माझी
तुवां दाविली रसिके ! आजी,
व्हावि न मजवरि परि इतराजी
येथुनी चाले— उचित तेंच लेखन वाले !

---

# पारिजातकाच्या कळ्या.

ती—
मुक्तावली धवल, विद्रुमवल्लि रक्त,
हेलावतां उदधि होउनियां विमुक्त,
येतांच भूमिवरतीं बनल्या तयांच्या
या पारिजातक-कळ्या रमणीय साच्या ! 1

तो—
स्वप्नीं दिसे मजसि मूर्ति तुझी वियोगीं,
ती पावली विलय तूं दिसतांच वेगीं !
झाल्या तदोष्ठ-रद-हास्य-मृदुत्व यांच्या
या पारिजातक-कळ्या रमणीय साच्या ! २

---

# तैसाच निघोनी जाई !

"Day after day he comes and goes away."
*Dr Tagore—The Gardener.*

दिवसानुदिवस तो येई—तैसाच निघोनी जाई !
जा सखे ! एवढें त्याला—हें वेणींतिल सुम देई !

"तुजशीं हें दिधलें कोणीं ?"
तो पुसेल तुजलागोनी;
तरि तया ( विनति तव चरणीं )
नांव न मम कळवीं बाई !
कारण तो येउनि मात्र—तैसाच निघोनी जाई ! १

येउनियां वृक्षाखालीं—बसतो तो धूलीमाजी !
पसरुनी ठेव तर तेथें—मृदु पल्लव पुष्पें ताजीं !
अश्रुपूर्ण त्याचे नयन
करितात मन्मना खिन्न !
तो दाखवी न बोलून—
हृदयीं जें घोळत राही !
सखये ! तो येउनि मात्र—तैसाच निघोनी जाई ! २

---

# कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ?

"I hold her hands and press her to my breast "
*Dr Tagore—The Gardener.*

तिचे स्वकरीं घेवोनि हात दोन्ही
तिला हृदयाशीं ठेवितों धरोनी !
तिची मोहकता बद्ध बाहुपाशीं
करिन मजलागीं हांव मनीं ऐशी !
तिचें मधुर स्मित लुटिन चुंबनांनीं,
नयनलीलामृत पिइन लोचनांनीं,
म्हणुनि झटतों; परि लाभ नच कशाचा
कसा काढावा नीलिमा नभाचा ?

तिच्या लाचण्या कवळण्या पहावें,
लोंच त्यानें खुडलुनी मला जावें !
कधीं माझ्या वपु मात्र तिचें यावें !
म्हणुनि कंटाळुनि परत म्यां फिरावें !

स्पर्श आत्म्यानें मात्र ज्या करावा,
कसा कुसुमा त्या तनुस्पर्श व्हावा ?

---

# संपवीन अपुलें गाणें !

"If you would have it so,
I will end my singing."

*Dr. Tagore—The Gardner.*

इच्छाच तुझी जर असली–संपवीन अपुलें गाणें !
तव चित्तवृत्ति बावरते–तर नको तुजकडे बघणें !
तूं दचकुं नको मज बघुनी–चाललों अन्य मार्गानें !

जर उडे तुझा चोंटाळा,
त्यजिलें तव उद्यानाला !
गुंफ तूं सुखें सुममाला !
यापुढें न माझें येणें !

इच्छाच तुझी जर असली–संपवीन अपुलें गाणें !

---

# वरें तर ! संपीव !!

—:०:—

" Then finish the last song and let us leave "
*Dr. Tagore—The Gardner.*

संपीव एकदां तर हें—शेवटलें अपुलें गाणें !
सोडुनी एकमेकांला—संप्राप्त आपणा जाणें !
गेलियावरी ही रजनी,
तिज नको आठवूं स्वमनीं !
जा विला सार विसरोनी !!
अन्यथा न आतां होणें,
संपीव एकदां तर हें—शेवटलें अपुलें गाणें ! १

निज बाहुंनीं कवळाया—कोणाला झटतें मी ही !
स्वप्नांस ठेवणें धरुनी—केव्हांहि शक्य हें नाहीं !
रिक्तता उरीं धरितात
अति उत्सुक माझे हात !
भेदित ती हृदया नेत !
त्या जखमा भरुनि न येणें !
संपीव एकदां तर हें—शेवटलें अपुलें गाणें ! २

---

# करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला !

करें एका तूतें करुनि कमलाक्षी ! जवळ मीं,
तुला वक्षीं जेव्हां दृढ कवळियेली घन तमीं,
तदा त्वन्मुग्धत्वासह पळवुनी तों प्रकटला,
मणी त्वां लाजोनी हृदयिं अपुल्या जो लपविला ! १

तयाच्या जी तेजें रुचिर तव मूर्ती विलसली,
जिच्या लावण्याला तृषित नयनें पीत बसलीं,
ठसा त्या मूर्तीचा मम हृदयिं जो या उमटला
पुसाया काळाचा करहि सखये ! त्या न शकला ! २

सुधा ओष्ठींची मी तव करुनियां सेवन तदा
गडे ! गातों आतां तुजवरुनि हें गायन सदा !
तुझ्या बिंबोष्ठींचें अमर करि पीयूष मजला,
करो हें माझेंही अमरचि तसें गान तुजला ! ३

# खंड चवथा

# तात्या पंतोजी

गांवामध्यें जुनें पुराणें देउळ गणपतिचें,
सुबक बांधणी, खांबावरतीं कामहि नकशीचें,
दारीं ज्याच्या विहीर, चांफा, भोंवतिं तरुराजि,
त्यांतच बसला शाळा घालुनि तात्या पन्तोजी.
विद्येची गणराज देवता, म्हणुनी ही शाळा
घालुनि तेथें संमत साऱ्यां पन्तोजी झाला !
मुद्रा त्याची रागिट, तैशी कपाळास आंठी,
गन्ध दुबोटी लावी, हातीं निगडीची काठी.
पागोट्यानें उणीव केली छत्रीची दूर
पाहुनि त्याला लज्जित होई चाकाचा घेर !
तपकीरीची डबी सदाही कनवटिला त्याच्या,
तमाखुचूर्णें लाल जहाल्या नाकपुड्या साऱ्या !
चिलीम वाटे पन्तोजीच्या पत्नीला सवत,
फेंकुनि देई तीनतीनदां, परि ती ये आंत !
वर्षें झालीं वीस, परि नवी चर्चा नच आली !
पुराणवस्तुप्रियता येणें सकलांना पटली !
शिष्य तयाचे हुशार मोठे, घोडीवर चढती !
कुणी ओणवे, कोणी सुर्या रोज रोज घेती !
कोणीं भाज्या, फळें गुरूच्या घरीं पोंचवावीं,
कुणीं सुपाऱ्या पानें देउनि मर्जी राखावी.
पन्तोजींना ज्योतिष येतें, प्रश्न पहातात;
वस्तु हरपली कोठें आहे अचुक सांगतात !
गमना तैसें घरें बांधण्या मुहूर्त बघतात,
उत्सवसमयीं मौजेखातर कथाहि करितात !

वेदान्तहि त्यां कळतो सारा, वादविवादात !
त्यांच्या पुढतीं घेंडें मोठीं टेंकितात हात !
अंगावरतीं बाजू येतां सन्तापुनि जाती,
गुरुजी अपुल्या तरी मतांच्या समर्थना करिती !
विद्वत्तेचे द्योतक ऐसे शब्द थोर थोर
चिडुनी वदतां पन्तोजींना कंप सुटे फार !
मेघासम गर्जना ऐकुनी टकमक जन बघती
"शिरीं एवढ्या अपार भरलें ज्ञान कसें !" वदती.

---

# गोपू काका

हिरवी हिरवी शोभे झाडी ओढ्याच्या कांठीं,
नारळ पोफळ यांची तींतच बाग दिसे मोठी,
वाहे झुळझुळ जिकडे तिकडे पाटाचें पाणी
तिच्यांत होती 'मठी' बांधिली गोपूकाकांनीं.
ओळख त्यांची करुनी घ्याया असतिल जे राजी
त्यांस सांगतों श्वशुर तयांचे तात्यापन्तोजी !
होती श्वशुरांहुनि कांकणभर वरचढ ही स्वारी
बण्डी, चंची, छत्री, धोतर, यांस बहिष्कारी !
गन्ध आडवें, जाड जानवें, ढोपरभर पचा,
वर्ण सांवळा देह शोभवी गोपूकाकांचा.
पानसुपारी–तंबाखूचें बटवा माहेर,
मठींत काका असतां गुडगुडि शब्द करी थोर !
पूजा, अर्चा, कडक सोंवळें, एकनिष्ठ भाव,
निःस्पृह वाणी काकांची, हें मान्य करी गांव !

साधें भोळें कुटुंब पहिलें गोपूकाकांचें
निधान झालें परि तें होतें त्यांच्या प्रेमाचें.
झिजतां झिजतां पार पावला पिंपळ काकूंना,
बहु वर्षांनीं एक लाधलें पुत्ररत्न त्यांना !
उत्कर्षाला पावत असतां प्रमोद काकांचा
दुर्दैवानें हाय ! घेतला घात कसा त्यांचा !
बाळ हरपलें ! शोकें पडल्या काकू आजारी
होइल वायू म्हणुनी जपले काका त्यां भारी
' भलतें सलतें औषध देतिल गांवांतिल वैद्य,
करूं नये तें करावयाला सांगतील पथ्य;
विश्वासावें तयांस कोणीं ? कैवारी राम,
तीर्थ तयाचें देतां तिजला पडेल आराम ! '
विचार ऐसा करुनि पाजिती पत्नीला तीर्थ
घातक झालें तेंच शेवटीं ! यत्न ठरे व्यर्थ !
जिच्या निवासें मठीस शोभा स्वर्गाची आली
सोडुनि सारें अकस्मात ती स्वर्गाला गेली !
आकाशींची कुऱ्हाड ऐशी काकांवर पडली,
विधुरावस्था भोगायाचें ये त्यांच्या भालीं !
' कवडीचुंबक गोपूकाका म्हणुनी काकूला
औषधपाणी दिधलें नाहीं, जीव तिचा गेला ! '
अशीं दूषणें अनेक देती गांवांतिल लोक,
देउत बेटे ! करकरती का जगिं थोडे काक ?
हाल मांडिले किति काकांनीं अपुल्या देहाचे
पत्नी गेली म्हणुनी तें या न वर्णवे वाचे !
नेत्रांमधुनी थोर वाहती अश्रूंच्या धारा
सुदीर्घ ऐसा मधुनि टाकिती काका सुसकारा !
पाणचुलींतुनि लोट धुराचा जाई आकाशीं
सांगत बसती गोड निरोपा पत्नीला त्याशीं !

वयस्य त्याचे शेवटिं आले, घालिति समजूत,
' पुरे शोक हा ! मेली पत्नी परत नसे येत !
गृहिणीवांचुनि गृह जें, त्याहुनि बरवें कान्तार;
नवी आणुनी गृहिणी, थाटा पुनरपि संसार ! '
प्रयत्न जेव्हां भगीरथासम मित्रांनीं केला,
समजुत झाली ! शोक सर्वही काकांचा गेला !
उचल घेतली मंडळिनें मग दुसऱ्या लग्नाची
काकांनींही सैल सोडिली पिशवी पैशांची !
पन्तोजींची बनी धाकटी बारा वर्षांची
गोरिगोमटी, धीट बोलकी, चुणचुणीत साची !
भाउभटानें जाउनि तेथें शिष्टाई केली
देणें घेणें ठरुनि वधू ती नेमस्तहि झाली.
पन्तोजींनीं दान करोनी कन्या काकांना,
संसृतिपाशीं पुन्हा बांधिलें बळकट कीं त्यांना !

कवीन्द्र काकांवरी पाडिती पाउस काव्यांचा !
टीकाकारां विषय अलिकडे झाला काकांचा !
अडुधावरती सहज उठवुनी गप्प कुणीं द्यावी,
तिचीच चर्चा गावामध्यें रात्रंदिन व्हावी !
कुणी बोलतो, ' जमला यांचा जोडा पण जोडा !
नांवें टिकल्या ठेविल जन तो समजावा वेडा ! '
' पतिपत्नींचें भांडण चाले ! ' बोलतसे कोणी,
' केरसुणीचे बनी तडाखे काकाना हाणी '
तेही रागें धरुनि ओढिली करें तिची वेणी,
करी पलायन माहेरीं ती हिसका देवोनी !
कन्या शोभे गोपूकाकां जरि त्याची राणी,
भली भेटली ! काढी पतिच्या नयनांतुनि पाणी ! '
अशा तऱ्हेची नित्य बातमी गांवीं पसरावी,

साधारण जन ! त्यांस त्यांतली गोम काय ठावी ?
उदात्ततेचा, स्वर्गीयाचा, दिव्याचा गन्ध
नसे तयांना, स्वार्थ सर्वदा वाटे सुखकन्द !
भांडण कसलें ? प्रेमकलह तो चाले दोघांत !
छटा प्रीतिच्या नेत्रांमध्यें तेव्हां खुलतात !
‘क्रोध’ तयाना खुशाल बोलो व्यवहारी वीर
‘छटा प्रीतिच्या !’ पुनः पुन्हा तरि आम्हीं म्हणणार.
प्रणयरसाचे गोपूकाका असुनी अवतार,
टीकाम्रांचा कसा तयावर होतो भडिमार ?
देवा ! नाहीं न्याय काय रे तुझ्या घरीं उरला,
म्हणुनि दूषणें दुर्जन देती गोपूकाकांला ?
माहेराला रुसुनी गेली त्यांची ‘गो’ म्हणुनी
अन्नपाणिही टाकुनि दिधलें गोपूकाकांनीं !
हवा कशाला प्रत्यय दुसरा त्यांच्या प्रेमाचा ?
उज्ज्वल निश्चल अविनाशी तें अनुभव हा साचा !

कालनदीचा सदा चालला प्रचण्ड जो ओघ,
त्यांत वाहतां बदलत जाई सृष्टीचें रूप
गोपूकाकांकडला मनुही आतां पालटला,
स्थूलत्वानें राधाकाकुंस पोक्तपणा आला !
विशालबुद्धिद्योतक ऐसें विशालसें डोकें,
भार तयाचा वाहुनि आलीं पाठीला पोकें !
जरत्कारुचा सखाच ऐसा चिरंजीव झाला,
प्राण सहावा समजति काका काकू परि त्याला.
नसतां जवळी सुत, काकांच्या स्वास्थ्य मना नाहीं
जिवास करिती करमणूक ते म्हणुनि तदा पाहीं !
पानसुपारीतंबाखूचे बारावरि बार
भरुनी काका करिति अंगणावरतीं भडिमार !

भान न उरलें तन्मय वृत्ती काकांची झाली
स्वार्थपरायण जगा ! पाहिजे शरम तुला गमली !
कवना नाहीं विषय म्हणुनि जे रडत कवी बसती
रचा काव्य ते उत्साहें या समाधिच्या वरतीं !
समाधि तुमची गोपूकाका ! अभंग राहूं दे !
तत्त्वशोधकां तत्त्व अमोलिक तिच्यांत लाभूं दे !
हंसेल तुम्हां, निघुनि बचिशी त्याची जाऊं दे !
स्वार्थाचें मग नांव तरी का उरतें पाहूं दे !

---

# पन्तांचा पराक्रम !

त्या पन्तांचें पाळण्यांतलें नांव न आम्हां ठावें !
नांवासाठीं कवन कुचंबत काय परी ठेवावें ? १
नामाभावीं वैशिष्ट्याचा होतो ज्यांच्या अन्त,
गुलाम असले निज नांवाचे नव्हते अमुचे पन्त ! २
मूर्ति तयांची कृश, उंचेली, डोळे पाणीदार,
चाल चपल अति, आणिक मुद्रा दिसे निश्चयी फार ! ३
वाचन जबरें, मनन दांडगें, उद्योगहि तो मोठा,
स्वदेशविषयक कळकळिचाही नव्हता तेथें तोटा ! ४
देशांतिल संपत्ती आधीं लुटिली तुर्कपठाणीं !
उरली सुरली धुवुनी नेती आतां गोरे वाणी ! ५
घारी त्यांची नजर चुकवुनी, टाळुनि त्यांशीं वैदा ,
कशी करावी देशासाठीं नव संपत्ती पैदा ? ६
विचार हे डोक्यांत घोळती रात्रदिन पन्तांच्या
उपाय कांहीं परी सुचेना विचारशक्तिस त्यांच्या ! ७

एके रात्रीं पन्त अंगणीं अवशीचे फिरतांना
बागेमध्यें लकलकलेंसें दिसलें कांहीं त्यांना ! ८

टक लावुनियां पाहु लागले थबकुनि त्याला पन्त,
तर्कवे न त्यां काय तरी हें लकलकतें बागेंत ! ९

आकाशांतिल कुणी चांदणी निखळुनि पडली खालीं
उधळित अपुलें तेज राहिली काय इथें भंवतालीं ? १०

मनांत ये हें पन्तांच्या तों सरपर सरपर कांहीं
वाजुनि उठला शब्द घाबरा बेडकिचा लवलाहीं ११

परिसुनि त्याला पन्त गांठिती निजसदनाचें दार
स्वरक्षणास्तव करीत आस्तिकमन्त्राचा उच्चार ! १२

पत्नी त्यांची पुसे तयांना, “ घामघूम कां झालां ? ”
ते उत्तरले “ बागेमध्यें आज थोरला आला ! १३

भोमाडावरि मणी तयानें ठेवुनि दिधला आहे.
मणिप्रकाशीं शोधित अपुलें भक्ष्य थोरला राहे ” १४

त्या दोघांनीं कडेकोट मग केला बन्दोबस्त
आणि ठेविली मार्जारांच्या गस्तीवरती भिस्त ! १५

एक माजरी सावध मोठी घेउनि तिजला संगें
खोलीमध्यें जाउनि पडलीं शय्येवरतीं दोघें १६

झोंप येइना परन्तु त्यांना, उठुनी दोघें बसलीं
फणिभय चित्तीं, तरी मण्यास्तव हांव तयांना सुटली ! १७

स्वयंप्रकाशी रत्न आपुल्या बागेमध्यें असतां
जाऊं द्यावें काय भयें तें ऐसें दिसतां दिसतां ? १८

साहस केल्याविण केव्हांही संपत्ती नच मिळते
वा संरक्षक सामर्थ्याविण असलेली नच टिकते. १९

तुर्कपठाणीं गोऱ्या लोकीं निर्धन आम्हां केलें
अनर्घ्य मणि तरि सविष थोरल्यापाशीं अजुनी उरले ! २०

मिळवावे ते त्यांच्यापासुनि योजुनि हिकमत कांहीं
गोऱ्यांपाशीं कटकट तेणें होइल भय हें नाहीं ! २१

लोभ मण्याचा विचार असले उठवी पन्तमनांत,
पन्तपत्निही असेंच कांहीं होती हळु सुचवीत ! २२

दोघांनाही धीर न झाला याया परि बाहेरी !
दोघांनींही भयें काढिली रात्र जागुनी सारी ! २३

दुसरे दिवशीं विचार अपुले कृतींत उतरायाला
पत्नीच्या उत्तेजक वचनीं धैर्य चढे पन्तांला ! २४

खणुनी माती, भिजवुनि मळुनी तीन तियेचे गोळे
नागोबाशीं लढावयास्तव तयार पन्तीं केले ! २५

भोमाडाच्या एका बाजुस ढेरंब्याचें झाड,
दुसऱ्या बाजुस उन्नतमस्तक जुनाट नारळमाड, २६

पन्त जुन्याचे अभिमानी परि सांप्रतच्या कार्यांत
जुन्या तरूचा मान राखणें त्या न वाटलें उचित. २७

"मंगल तरु हा !" म्हणुनि देउनी ढेरंब्याला मान,
तयार केलें त्यावरि पन्तीं बसावयाला स्थान. २८

सूर्यास्ताच्या आधीं तेथें नेउनि सारे गोळे
ढेरब्याच्या माचाळावरि पन्त जाउनी ठेले ! २९

जवळी काठी, जवळी कन्दिल, जवळि आगकाड्याची
पेटी त्यांच्या; पुटपुट वदनीं तरि आस्तिकमन्त्राची ! ३०

रात्र जाहली, तिमिर पसरला, चमकूं लागले तारे,
भोमाडावरि दिसूं लागलें तेव्हा लकलकणारें ! ३१

'आला ! आला ! शोधाया निजभक्ष्य थोरला आला !'
लकलकणारें बघुनि वाटलें देशभक्त पन्तांला. ३२

हिन्दभूमिचें स्मरण करोनी उचलुनि गोळा एक
लकलकणाऱ्यावरी टाकिला पन्तांनीं बिनचूक ! ३३

ओढुनि कांबळी, लावुनि कन्दिल, घेउनि काठी हातीं
पन्त बैसले तयार होउनि युद्धा वृक्षावरती ! ३४

थर थर कांपे अंग होउनी वीरश्रीसंचार,
नागोबाचा श्रवणीं त्यांच्या ये न परी फूत्कार ! ३५

रात्र संपली तरि न थोरला संग्रामाला आला !
आस्तिकमन्त्रा भिउनि आपुला घेउनि जीव पळाला ! ३६

सूर्य उगवला, पन्त उतरले वृक्षावरुनी खालीं;
पत्नी त्यांची सदनामधुनी सन्निध त्यांच्या आली. ३७

" फत्ते झालें काम ! " बोलले पत्नीलागीं पन्त,
" नाग पळाला ! मणी तयाचा ये अपुल्या कब्ज्यांत ! ३८

भोमाडावरि गोळ्याखालीं मातीच्या तो आहे
चल मजसंगें, काढुनि त्याला नेउं घरीं लवलाहें ! " ३९

मणि काढाया पतिपत्नी तीं भोमाडाशीं गेलीं
परन्तु दिसलें काय त्यांजला तेथें गोळ्याखालीं ? ४०

मणी त्यां दिसला नाहीं होता जो त्यांजला हवा,
दिसला बिनपंखांचा मेलेला एक काजवा ! ! ४१

---

# आळवणी !

" बाजिन्दी बिजली
खरी तूं
बाजिन्दी बिजली
चित्तवृत्ति मम, थै थै नाचुनि वरुनि तुवां हरिली !

येथें तुजसाठीं
सखे ! मी
येथें तुजसाठीं
उभा कधींचा, अरती येउनि दे तर मज भेटी.

चमक तुझी वरची
चंचले !
चमक तुझी वरची
करि विव्हल मज, लागुनि माझ्या हृदया जणु बरची

वरतीं मीं यावें
तुझ्यास्तव
वरतीं मीं यावें
कळे न मज परि शरीरबन्धन कैसें तोडावें !

येउनि तर अरती
झडकरी
येउनि तर अरती
ने मज माझें दृढ बन्धन हें तोडुनियां वरतीं.

करिशिल जरि कृत्य
एवढें
करिशिल जरि कृत्य
सौदामिनि तूं, तुझा सुदामा होइन मी सत्य.

विमानांत बसुनी
घनाच्या
विमानांत बसुनी
स्वर्लोकींचीं वेंचित पुष्पें स्वैर फिरू गगनीं !

दावुनि कधिं जगता
साजणी !

दावुनि कधिं जगता
सुदामनगरी सोन्याची ती रिझवू जनचित्ता !"
गीतें स्वर्गीय
गाउनी
गीतें स्वर्गीय
मुदित मनें तीं ऐकायाचें देउं धरे श्रेय !
कडाडुनी खालीं
उतर तर
कडाडुनी खालीं
जाळुनि माझें बन्धन झडकरि ने मज आभाळीं !"

* * * * *
* * * *

झालें चक्र ! कडाड शब्द उठला ! भूलोक हा कांपला !
आली आळवणी फळा ! प्रियसखीसंगा कवी लाधला !
झाला मुक्त जळून बन्धन, फिरे आतां सुखें अबरीं;
"मेला वीज पडून !" मूढ जनता बोले परी वैखरी !! १

---

# जिवंत मृत !

—१—

अरे ! अरे ! रे ! अरे ! अरे !
सांगा कोणी मला खरें !
लोळतसे निद्रेमाजी
ही देखा ललिता माझी

ग्रंथालय
४३५०

कुंकुं जाहलें काय हिचें,
  तें सांगा मजला साचें !
कुंकुं हिचें बघुनी गेलें
  शंकित हें मन्मन झालें;
कळत नसे माझें मजला,
  जिवन्त, कीं मी मेलेला;
जिवन्त मी मज जरी गणूं,
  कुंकुं जाहलें काय म्हणूं ?
समजुं कसा मी मला मृत ?
  जीव अजुनि या देहांत !

—२—

हां ! हां ! हां ! आलें कळुनी;
  देवाची अद्भुत करणी !
दाखवितो मज दयाघन
  जितेपणीं माझें मरण !
तिलकहीन माझी ललिता
  अधिकचि मोही मम चित्ता !
कृत्रिमता सगळी गळली,
  रूपरंगकलिका फुलली !
नैसर्गिक सौंदर्य हिचें
  या समयीं खुललें साचें !
जर माझ्या मरणेंच हिची
  सुन्दरता वाढायाची,
तर देवा ! दे खुशाल तूं
  या क्षणींच मजला मृत्यु !

—३—

काय मरण म्हणजे आहे ?
  जीव कुडी सोडुनि राहे.
मरुनी मी प्रेमोपासी
  राहिन सखिच्या सहवासीं,
गुणगुणेन तिचिया कानीं
  प्रेमाचीं शाश्वत गाणीं !
प्रेमसमाधी प्रिय सखिची
  चुंबनेंच भंगिन साची !
स्वप्न मनोहर मी बनुन
  निद्रेंतहि तिज सुखवीन !
येइल ललिते ! काय पण
  मत्सान्निध्य तुला कळुन ?
न तरी मृत्यु नको मज तो !
  जिताच तुज कवळुनि निजतों !

---

# झुंज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय !

गालातिल तव गोड हशाचा झिम झिम पाउस सदा पडे,
गुलाबमुकुलाहुनी मनोहर लाज गुलाबी तुझी गडे !
रसिक रशोले तुझे रिझाऊ बोल परिसतां भान हरे,
गळती शब्दागणिक मुखांतुनि तुझ्या सुन्दरी मोतिंहिरे !
कोमल पाउल तुझें चुरितसे लक्ष लक्ष हृदयें रमणी,
वेड अम्हाला तुझें, तुझ्या ही लीलांची अद्भुत करणी !
झुण्ड आमुची तुझिया मार्गी आजवरीत तुजला फिरते,
अजुनि कसें नवनीतकोमले ! चित्त तुझें नच गे द्रवतें ?

परस्परांचा हेवा दावा तुझ्याकारणें करूं जरी,
चढाओढिच्या खुशामतीचीं गीतें गातों तुझ्यावरी !
हावभाव हे पहा आमुचे, गीतें अमुचीं ऐक जरा,
भाग्यवन्त जो अम्हामधिल तो निवडुनि कर अपुला नवरा !
इतर तयाशीं झुंजुनि त्याला ठार करूं हें नको भय;
जरी झुजलों, झुज आमुचें कवीश्वरांचें शब्दमय !

---

# खंड पांचवा

# बालकवींचें गायन !

प्रात:कालीं एके दिवशीं झिमझिम पाउस पडे,
शोभती रानफुलांनीं कडे.
सृष्टीमध्यें नूतन जीवन वाटतसे कीं भरे,
चहुंकडे मोद तदा संचरे
गार वायुची झुळुक येउनी हिरव्या शेतावरी
लोळुनी नाना क्रीडा करी !
बालकवी तों उठला, बसला एकान्तीं जाउनी
रंगला नितान्त मधुगायनीं.
गान परिसतां भान विसरला पीन पयोवर क्षणीं
कोसळे खालीं गगनांतुनी !
तटस्थ होउनि कुरंग पाहे कविला निज लोचनीं;
गुंगली सरोवरीं कमलिनी !
गानसाधनें पख जयांचे पिवळे, हिरवे, निळे,
चकित ते भ्रमर मनीं जाहले !
वदति विस्मयें, " गुंजन अमुचें असें न लावी पिसें !
माधुरी याची त्याला नसे ! "
विचार करिती काय म्हणुनि हें हृदयंगम गायन,
शेवटीं कळलें त्या कारण.
पंखांवरतीं थरथरणारा हा नच गुंजारव
गान हें कविचें हृदयोद्भव
आलापाची ही न कवाइत, हृदय बोललें इथें !
गान हें हृदयाचें चालतें !

---

# समुद्र आणि कवि

ज्यांचा रंग करी विमोहित मना शुक्ती अशा सुन्दर,
लाटांनीं सहजीं दिल्या उडवुनी अंभोधितीरावर;
साना बाळ कुणी तयां उचलितां आनन्दतो अन्तरीं
ये भाण्डारचि त्याजला गमतसे रत्नाकराचें करीं ! १

ज्यांची जादु करी विमोहित मना, गाणीं अशीं सुन्दर
स्फूर्तीनें कविच्या दिलीं उडवुनी या बाह्य सृष्टीवर;
कोणी मानव त्यांप्रती उचलितां आनन्दतो अन्तरीं
ये भाण्डारचि त्याजला गमतसे काव्याकराचें करीं ! २

---

# माधुरी तयाला !

जरी स्वर्गींच्या चटक चांदण्यांनीं
तुला रात्रीं खुलविलें कटाक्षांनीं;
तुझ्या मंजरिचे करुनि शर सदैव,
करी जगता जरि विद्ध कामदेव, १

जरी आकारें असासि तूं विशाल,
रसिक तूतें जरि बोलती रसाल;
जरी ताफे तुजवरी कोकिलांचे
बसुनि घेती आलाप गायनांचे, २

नव्या लज्जेचें वस्त्र नवें ल्याली,
नवी तरुणी वल्लभें चुंबियेली,
तिच्या तेव्हां जी जन्मली कपोलीं
तीच खेळे तव फळीं जरी लाली; ३

नको आम्रा ! तरि करूं तिरस्कार
गरिब फणसाचा असा बेसुमार !
तिन्ही लोकीं सत्कीर्ति तुझी गाजे
तुला चतुरा ! अविचार हा न साजे ! ४

कृती थोडी, वाचाळपणा फार,
असे याचा फणसास तिरस्कार.
फळें पुष्पांविण येति तथा जाण,
करीं थावरुनी काय तें विधान. ५

सत्य कथितों तुज, रोष मनीं नाणीं !
जरी फणसावरि कवि न गाइ गाणीं,
जरी तत्फल धरि वरुनि कण्टकांला,
आंत तुजहुनि तरि माधुरी तयाला ! ६

---

# दिवे आणि आरसे

कां हे आणितसां दिवे मजपुढें ? अन्धार ज्यांच्या तळीं,
पापें जेथुनि उद्भवून जगतीं आहेत बोकाळलीं,
कोठें न्याय वसे, कुठें करितसे अन्याय तो ताण्डव,
कोठें ज्ञान असे, नकोच मजला जाणीव याची लव ! १

हे आदर्श तुम्ही सदा मजपुढें कां ठेवितां आणुन ?
व्यापी विश्व असत्य उद्भवुनियां यांच्याच ओठांतुन !
माझें तोंड कसें, कपाळहि कसें, डोकेंहि कैसे तसे,
सांगायास मला नकोत तुमचे हे मित्र हो ! आरसे. २

---

# खंड सहावा

# मोऱ्यांची मोहना.

ज्यावरि अपुलें रूप पहाया ओथंबे जांभुळ
घालुनि कुटरू थकला कवडा प्राशी ज्याचें जळ,
त्या डोहाच्या दक्षिणतीरीं उभी लोललोचना
शीरगांवच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

डाव्या बाजुस वाघजाइचें हांकेवर देउळ,
उजव्या बाजुस हांकेवरतीं खेमाचें राउळ,
मागें 'पोंकी धोंड' विस्मयें पसरी निज आनना !
कवडेकोंडावरी सांवळी मोऱ्यांची मोहना !

जिला पाहतां चित्त आपुलें कष्टानें आवरी,
शीरगावचा सत्ताधारी कृष्णाजी आवरी.
पंचक्रोशींतला जियेच्या तरुण न आला मना,
कवडेकोंडावरी आज ती मोऱ्यांची मोहना !

न कळे होती काय निरीक्षित डोहापैलीकडे,
जेथें हांसत उभीं पांढऱ्या पानाचीं झावडें;
तिकडुनि बालेभोंक पांखरू करी तियेला खुणा !
अर्थ तयाचा परन्तु नेणे मोऱ्यांची मोहना !

निरखित होती आतुरतेनें तथापि पैलीकडे,
भेणें बालेभोंक पांखरूं एकाएकीं उडे !
दुरूनी आली 'टीं ! टीं !' ऐसी टिटव्यांची सूचना,
अधिकचि तेणें उत्सुक झाली मोऱ्यांची मोहना !

शब्द जांभळीमागुनि आले अवचित दुसऱ्या क्षणीं,
मोहनेस अनुलक्षुन बोले वृक्षाआडुन कुणी
"पंचक्रोशींतला जियेच्या तरुण न आला मना
कुणाकारणें आज इथें ती मोऱ्यांची मोहना ?"

पाहुं लागली जांभळीकडे बाला न्याहाळुनी,
आला पुढतीं युवा एक तों त्या वृक्षामागुनी !
वदे, "तुझा मी मोहन, माझ्या ओळखुनी घे खुणा !"
ओळख पटली, आणि कांपली मोऱ्यांची मोहना !

"अये कांपसी !" म्हणे तिला तो पिशाच मज मानुनी !
मरणाची मम परन्तु वार्ता सत्य नव्हे साजणी !
असती ज्यांच्या जित्या वासना, मरणें त्यांना मना !
कशी न जाणे चतुर शहाणी मोऱ्यांची मोहना ?

"जिला माणकें म्हणुनि ओपिलीं वाळीचीं मीं फुलें,
'घे तानिवडें !' म्हणुनि घातलीं कानीं सोनावळें;
करमत नव्हतें घडी एकही जिला माझियाविना,
जिती वासना, ती मज व्हावी मोऱ्यांची मोहना !

"बारा वांवा सुंभ सोडिलें तरि न गावला तळ,
साळकाइंतिल काळडोहिंचें अथांग काळें जळ !
झटती तेथें सात आसरा रिझवाया मन्मना,
रिझे न मन परि जिथें न माझी मोऱ्यांची मोहना !

"इथें पातलों तुला न्यावया अपुल्या जळमन्दिरीं,
फणशीखालीं वारु उभा मम, चल तिकडे सुन्दरी !
कशास अथवा चालायाच्या तुज द्याव्या यातना ?"
बोलुनि त्यानें उचलुनि नेली मोऱ्यांची मोहना !

फणशीपाशीं नेउनि बसवी वारूवरतीं तिला,
धरुनि करीं तिज तिचियामागें आपणही बैसला
सुटला वारू वेगामध्यें टाकित मागें मना !
क्षणांत पाहे साळकाइला मोऱ्यांची मोहना !

बारा वांवा सुंभ सोडिलें तरि न गावला तळ,
साळकाइंतिल काळडोहिंचें अस्थिर गहिरें जळ;

वारु शिरे त्या जळीं धन्याची पुरवाया कामना !
जळीं बुडालीं मोहन आणिक मोऱ्यांची मोहना !
काळडोहिंच्या जळीं बुडालीं वारूसह तीं जिथें,
दुसऱ्या दिवशीं दिसूं लागलें जुवें मनोहर तिथें !
अजुनि तयावर विहरे रात्रीं वेडुनि निज मोहना
शीरगांवच्या मानकऱ्यांची मोऱ्यांची मोहना !

---

# महादेवशास्त्र्यांचा मृत्यु !

वार्ता न त्या लव भयंकर वादळाची,
होते समीप बसले जन जे तयांची;
जों क्षुब्ध सृष्टि अधिकाधिक होत गेली,
तों शान्तता अधिक तद्‌हृदयांत आली !

कापट्यपूर्ण जगता विटले बघून,
तच्चारुनेत्र गमतें मिटले म्हणून !
प्राणांसवें न सखिची प्रिय मूर्ति जावी,
वक्षीं जणो म्हणुनि दक्षिण हस्त ठेवी ! २

लीला अनेक दिसल्या हृदयेश्वरीच्या,
बाल्यांतल्या किति तशा किति यौवनींच्या,
तो एकदां बघतसे निज रोहिणीतें
हिन्दोलकीं बसुनि मंजुळ गीत गातें ! ३

येती पुढें कुरळ कुन्तल जे उडून
त्यांचें निवारण करें करिते मधून !
आघात भूवरि करी चरणारविन्दें
हिन्दोलका हलविते हंसुनी प्रमोदें. ४

पाहे पुनश्च तिजलागिं विवाहकालीं
लज्जाविनम्र परि उत्सुक फार झाली!
किंचित् सकंप मृदुहस्तयुगें सुशीला
अर्पी तयास हृदयासह पुष्पमाला! ५

कार्यांत दक्ष, परि चोरुनि यास लक्षी
ऐशी अधोमुख पुन्हा दिसली मृगाक्षी;
दृष्टींत दृष्टि मिळतांच सलज्ज झाली,
त्याची छटा चमकली क्षणमात्र गालीं! ६

होतां सती कुलवती करपाशबद्ध
ती लाजलाजुनि बळें करिते निषेध!
यत्नें यदा पतिभुजांतुनि होय मुक्त,
वेगें पळे परि मनीं अनुरागयुक्त! ७

ते भ्रूविलासहि पुन्हा दिसले तयाला,
ऐके सुधामय तिच्या वचनावलीला,
तें प्रेम, तो विनय, ती शुचिता सखीची
ये प्रत्यया तनुहुनी मृदुता मनाची! ८

वाचूनि मोह तिचिया कवितेस पावे,
चित्तांत आदर तिच्याविषयीं दुणावे;
तादात्म्य वर्ण्य विषयीं, प्रतिभाहि दिव्य,
कोणास मोहित असें न करील काव्य? ९

झाला विनोद करितां रुसवा सखीचा!
मानीपणा कळुनि ये मग मानिनीचा!
ते चन्द्रिकेंतिल विहारहि एकवार
त्याच्या पुनश्च घडले नयनांसमोर! १०

कण्ठूनियां दिन युगांसम विप्रयोगीं
निस्तेज तेविं कृश होय सुकोमलांगी,

होतां सतीस पतिदर्शन ये उमाळा,
ती अश्रुनींच वधतो करि पूजनाला! ११

सायान्हि ये परतुनी सदनासि नाथ,
मार्गाकडे निरखुनी म्हणुनी पहात!
जी वाम बाहुवरि वाम कपोल ठेवी
ऐशी समुत्सुक पुनश्च बघे स्वदेवी. १२

मन्दत्व ये पुनरपी तिज गर्भभारें,
झाले असह्य मग कष्ट सतीस सारे!
पाहे पुन्हा तिजसि ने स्वगृहास तात
हाही निरोप तिज दे अतिखिन्नचित्त! १३

'झालें सखीस' परिसे 'जरि पुत्ररत्न
ये क्षीणता बहु तिला, हरले प्रयत्न!
आशा तदीय उरली तिळमात्र नाहीं
तीचा परन्तु पतिदर्शनिं हेतु राही!' १४

पाहून यास सतिचें जरि चित्त धालें
याचें परी हृदय फाटुनि पूर्ण गेलें!
बाहेर तोंच तनुचा थरकांप झाला
निःश्वास एक अतिदीर्घ असा निघाला! १५

घाली उगाळुनि कुणी सभयज्ञ, मात्रा;
चाले परन्तु न तिची लवमात्र मात्रा!
जें आणणें घडवुनि प्रिय देवराया,
तेथें नरा! यश कसें तव ये उपाया? १६

त्या लागला मरणसूचक थोर घोर,
गात्रावली पडत चालिल थण्डगार!
यत्स्नेह सर्वहि असे विलयास गेला
त्या दीपसाच जन तो गमला मनाला! १७

शुभ्र प्रकाश दिसला नयनांस अन्तीं
शुभ्रांशुची बघुनि ज्या विरमेल कान्ति;
होता अपूर्व, गमला परि सौख्यधाम
त्याची तिथें रमुनि जाय मति प्रकाम. १८

प्रेमप्रपूरित जिचें मन ती निमाली,
कालोदरांत सुहृदावलि गुप्त झाली;
त्यांवीण जें दिसतसे नयना भयाण,
त्या एकलाच जगतांत बसेल कोण ? १९

स्पर्धा, अहंकृति, तिरस्कृति, कोप, रोष,
संताप तेविं दुसरेहि अनेक दोष,
देहासवेंच कलहप्रिया या जगांत
ठेवून तो धरितसे परलोकपन्थ ! २०

× × ×

भस्मावशेष शव होय जिथें तयाचें,
तेथेंच संप्रति शिवालय एक साचें;
त्याच्यापुढें करिति सांजसकाळ गान
बिल्वावरी बसुनि रम्य शकुन्त तीन ! २१

## गेले ! बालकवी गेले !

( ता. ५ मे, सन १९१८ )

खेळ खेळुनी फुलराणी
झुले निळ्या वातावरणीं !
अभिषेकिल निज गीतांनीं
कोणाची आता वाणी ?

“ गिरिशिखरें वनमालाही
दरी दरी घुमवित येई
पाखूंचीं हिरवीं रानें
झुलव गडे ! झुळझुळ गानें !
तूंच खरा कविराज गुणी
सरस्वतीचा कण्ठमणि ! ”
निर्झरास ऐसें वदुन
प्रोत्साहन देइल कोण ?
कोण अरुण, सन्ध्यारजनी
यांवरुनी गाइल गाणीं ?
सृष्टीचीं काव्यें गुप्त
कोण करिल आतां व्यक्त ?

× × ×

गगनश्री, ताराश्रेणी
खेळवि याला बालपणीं !
वदला पाहुनि चोहिंकडे,
“ आनन्दी आनन्द गडे ! ”
सृष्टिसती याची ताई
अंगाई याला गाई;
भाउबिजेला तिज हाही
ओंवाळणि घाली भाई !
बाल्यांतुनि तारुण्यांत
शिरतां उनपाउस होत
तरि गाई मंजुळवाणें
दिव्य अप्सरांचें गाणें !
वनदेवी वेड्या झाल्या
हर्षभरें नाचत वदल्या-

"बालकवी हा कविराजा!
कवितादेवीचा कलिजा!"

× × ×

काळ आणि जीवित यांचा
प्रीति धडा शिकवी साचा!
हस्तगत झाली शान्ति
प्रेमलेख अक्षय गमती!
पारायण त्यांचें चाले
निमग्न मन त्यांतचि झालें!
बाह्याचा पडला विसर
अन्तःसृष्टि रुचे रुचिर;
ताऱ्यांच्या तेथिल पंक्ति
अस्फुट मधु गीतें गाती.
चित्तवृत्ति त्यांनीं हरिली
हृदयीं तीं गीतें मुरलीं!
चित्तभिन्नता सर्व सरे
देहभिन्नता मात्र उरे;
गेली! तीहि लया गेली
सृष्टि कवी एकचि झाली!

× × ×

गेले! बालकवी गेले!
पंचत्वा मिळुनी गेले!
क्षीण हंसतमुख ती मूर्ति
आतां नच दिसणें पुढतीं!
स्फुरेल ती दिव्य स्फूर्ति
कोणाच्या आतां चित्तीं?

कोणाची उज्ज्वल कीर्ति
याच्यासम राहिल जगतीं ?
हा सृष्टीचा शाहीर,
हा कविरत्नांतिल हीर!
रसगंगा तरुच्या सुमनीं,
रसगंगा याच्या कवनीं!
तान्यांनो! पावा पतन!
भव्या! तुझें चालो रुदन!
ढाळ अश्रु लतिके बाई!
शोकमग्न माधव हाही.

---

# कविवर्य टिळक यांचें निधन!

(ता० ९ मे, सन १९१९)

—१—

मनामाजी, जनामाजी, वनामाजी फुलें सारीं!
फुलें सारीं घरींदारीं, फुलें उत्फुल्ल कासारीं!
फुलें पृथ्वीवरी साऱ्या! फुलें आकाशगंगेंत!
परी पुष्पांवरी आतां वदा गावें कुणीं गीत?
वनीं रुष्ट प्रसूनाला कुणीं सद्बोध बोधावा?
अतां जीवन्त पोवाडा प्रवृत्तीचा कुणीं गावा?
करावें तें कुणीं व्यक्त श्रमीं जें गुप्त सौंदर्य?
कथावें तें शकुन्तीच्या मुखें कोणीं नरक्रौर्य?
"उषा पोटीं तमिस्रेच्या जशी जन्मास ये नित्य!
निराशेच्या तशी आशा, त्रिकालीं हें असे सत्य."

जनांलागीं कुणीं द्यावा मला सांगा असा धीर ?
मृतीं चैतन्य आणाया नुरे कोठेंच शाहीर !
अहो ! किंवा उरोनीही फलप्राप्ती असे काय ?
मृताच्याही पुढें गेली समाजाची स्थिती ! हाय !

—२—

बरें माना ! न वा माना ! मला त्याची क्षिती नाहीं !
महाराष्ट्रीं नसे कोणा खऱ्याची ती परीक्षाही !
इथें कोल्हा अजाचर्मा लपेटूनी फिरे स्वैर !
इथें अन्याय बोकाळे ! नयाशीं जो करी वैर.
पिकेना तों कुणाचीही इथें स्वार्थाविणें पोळी !
इथें स्वार्थें स्वराष्ट्राची असे केली पुरी होळी !
कराया जो पुढें येई स्वराष्ट्राचा सुससार
स्वकीयांच्याच लाथांचा बसे आधीं तया मार !
गरीबांना पिळायाची वसे ज्यांच्या मनीं हांव
तयांचा या महाराष्ट्रीं सदा होई बडेजाव !
जळोनी जे पुरे गेले अनाथांच्या मुक्या शापें
तयांसाठीं रडायाला जनांचे या इथें ताफे !
शिवाजीच्या महाराष्ट्रा दशा जेथें अशी आली,
नव्हे आश्चर्य हें तेथें कवींलागीं नसे वाली.

—३—

कवे नारायणा ! मातें कळेना हें तुझें तत्त्व,
मनुष्यत्वा म्हणालासी कसा तूं ' सृष्टिदिव्यत्व ' ?
असे सीमा न क्रूरत्वा जयांच्या त्या मनुष्यांचीं
किती सांगू तुला नांवें सहस्रांनीं गणायाचीं ?
निसर्गानें उदारत्वें मनुष्यां जे दिले हक्क
जितांपासोनि जेते त्यां हिरोनी घेति निःशंक !

जळूसारें मनुष्यांचें मनुष्यें हीं पिती रक्त !
मनुष्यांना मनुष्यें बा ! किती खायास उद्युक्त !
कवे ! आज्ञेस देवाच्या विमानीलें कुणीं सांग
पृथक् स्वभू करोनीयां कुणीं फेडीयले पांग ?
अशा या मत्त दुष्टांना प्रभू दे अल्प दिव्यत्व,
तयायोगें जगीं आलें मनुष्यांना विशिष्टत्व.
म्हणोनी सृष्टिमाजी जें असे कृष्णत्व, दिव्यत्व,
तयाच्या मीं मिलाफाला दिली संज्ञा ' मनुष्यत्व. '

—४—

विकारें शुक्तिमत्स्याच्या जगीं मुक्ताफळें आलीं,
विकारें आदिभावाच्या जगें निर्माण हीं झालीं !
असे जो व्यक्त सृष्टीच्या स्वभावाचें प्रधानांग,
विकारा त्या विनाशाया कसें यावें ? मला सांग.
विकाराला वधायाचा अमोघोपाय जो शोधी
गणीं निःशंक कीं त्याची वरी भ्रंशाप्रती बुद्धि !
विकारी सृष्टिमाझारी मनुष्यांचा समावेश,
अपेक्षा कां विकाराचा तयांमध्यें नसो लेश ?
न जों झालीं मनुष्यें हीं अशा सृष्टीहुनी भिन्न,
विकाराची असायाची तिथें सत्ता अविच्छिन्न !
मनुष्यांची लढाई जी तुला भीतिप्रदा होई,
कविश्रेष्ठा ! निराळी बा ! विकाराहून ती नाहीं !
लढाईला वधायाचा अमोघोपाय जो शोधी
गणीं निःशंक कीं त्याची वरी भ्रंशाप्रती बुद्धि !

—५—

विकारी सृष्टि ही सारी जयांलागीं असे ठावें,
विकारापत्तितें तैसें कळे ज्यां केविं टाळावें,

जगीं या ते खरे ज्ञाते, खरे ते वैद्य लेखावे;
तयांलाची समस्तांनीं शिरीं घेवोनि नाचावें !
कवे ! भिन्न स्थलीं कालीं असे ज्ञानी असे वैद्य
किती झाले ! जगीं ज्यांचें सदा वाजे यशोवाद्य !
ऋषी माझे, तुझा येशू, खरे हे कोण ? तूं बोल !
जनांचे वैद्य हे सारे ! पटे का हा तुला बोल ?
समाजा देति हे मात्रा, शमे तेणें व्यथा त्याची,
व्यथानाशा परी मात्रा ठरे निःशक्त ती यांची,
मनुष्यांच्या समाजांची स्थिती जैशी समुद्रांची !
कधीं वृद्धी, कधीं बाधा क्षयाची त्यां असायाची !
भयाची जी गमे माता, 'लढाई' हें जिला नांव;
अरे ! रोगी समाजीं ती करी शस्त्रक्रिया देव !

—६—

किती पृच्छा तुला केली ! परी चाले तुझें गान !
तया रागामधें, संज्ञा जया आम्हीं दिली 'मौन' !
जयांपासोनियां झाला, महाभूतांस त्या देह—
दिला त्वां आपुला, आतां विदेही तूं, न सदेह !
महाराष्ट्रांतल्या साऱ्या कवींचा तूं महाराज
कसा गेलास सोडोनी तयां शोकार्णवीं आज ?
पहा ही शारदामाता ! महामूर्च्छा हिला आली !
कळेना आणखीं हीच्या रडायाचें किती भालीं !!
पुरे सामर्थ्य भाषेला, सरे भाषाहि भावांची !
दशा ऐशी कविश्रेष्ठा ! कवींच्या वन्द्य वृन्दांची !
जयां गावोनियां गाणीं क्षणीं उत्फुल्ल तूं केलें,
फुले कोमेजलीं सारीं ! हसें सृष्टींतलें मेलें !
कवे ! या शारदेसाठीं, कवींसाठीं फिरें मागें !
फुलाप्रीत्यर्थ ये मागें ! नको जाउं असा रागें !

—७—

अहा ! येशील तूं कैसा ? तुला आली महानिद्रा !
दिसायाची न या लोकीं तुझी गंभीर ती मुद्रा !
तुतारी देवदूताची दिनीं न्यायाचिया वाजे !
तदा होणार तूं जागा ! खुलोनियां नव्या तेजें.
स्वदेहा त्वां दिलें आजी महाभूतांचिया हातीं
करोनी दिव्य तो तूतें पुन्हा देणार तेव्हां तीं !
परी गाळील अश्रूंला बसे जी ही कविश्रेणी,
करावें तत्समाधाना कसें नारायणा ! कोणीं ?
कवींनो ! आसवें गाळा ! तयांचें शुद्ध तें वारी
करो वाहोनियां वेगें धरित्री पूत ही सारी
पुढें या दिव्य अश्रूंचीं फुलें स्वर्गीय होतील,
प्रमोदें स्वर्गहस्तीं तीं धरेचा हात देतील !
पदें पुष्पां चुराया त्या मदें जे मर्त्य येतील,
नको शंका ! सुवासा ते भुलोनी भृंग होतील !

---

# सन्त तुकाराम.

( तारीख १२ नोव्हेंबर सन १९२७. )

अफाट दर्यांत धांवती वारे बेफाम,
जयगडला जाया निघाली सन्त तुकाराम.
अदृष्टांत काय कुणाला ठाउक तें नाहीं !
भजन वरी करिती तुकोबा 'विठ्ठल-रखुमाई !'
"काय सन्तराया ! योजिलें निज चित्तीं आज ?

भजन करित ऐसे चाललां कुठे महाराज ?—
सोबति नित्याचा आज कां तुम्हां अन्तरला ?
कीं गोसाव्याला सोबती फकिर बरा गमला ?
नव्हे चन्द्रभागा नव्हे हें इन्द्रायणिनीर;
भवत्पदाखालीं उसळतो समुद्र गंभीर !
याच्यावरि झाला मराठी नशिबाचा खेळ !
लहरींतुनि याच्या उगवले गेले सर्वेल !
राजा उदकांचा वरुण जो वैदिक काळींचा,
तो सत्ताधारी आजला केवळ नांवाचा !
उदकांवरि सत्ता गाजवी आज निळावन्ती !
श्रावणि पुनवेच्या श्रीफळें तिज नाहीं तृप्ति !
तिच्या इन्द्रजालें आज हें उठलें काहूर !
तिच्या इन्द्रजालें आज हें जोंळ करी जोर !
तिच्या इन्द्रजालें जाहला अदृश्य रविराणा !
तिच्या इन्द्रजालें घालिती भूतें धिंगाणा !
नभ सडकी द्रुप्स जशी कुणि सडकावी रेंव !
घोंगावत धांवे प्रभंजन— रूप वायुदेव !
क्षुब्ध सृष्टि झाली जलांना रौद्रपणा आला;
तुफान दर्याचा नागवा नाच सुरू झाला !
कटाह सळसळता तसा हा दिसे सिन्धुराज !
बोटीचा झाला रज्जुविण पाळणाच आज !
कलण्डेल केव्हा तयाचा नेम नसे कांहीं,
तुमचें तरि चाले सारखें 'विठ्ठल-रखुमाई !'
काय न जाणवतो तुम्हाला हा वारा जोंळी ?
कीं जलराणीच्या मोहिनी मन्त्राची पडली ?
कीं भजनानन्दीं राहिली लागुनियां टाळी !
जाणिव बाह्याची आपुली तेणें मावळली ?"
पुढतीं बाजूला तडाखे दे वारापाणी

कापित तरि वाट चालली तुकयाची तरणी !
पर्वतसम लाटा मांडिती लोळण चौफेर,
व्यसनीं तिज बघुनी हांसती निर्दय भेसूर !
निघुनि जाय मार्गी जंजिरा हिरव्या हबशाचा,
श्रीवर्धन गांव तसा तो प्रधान पन्तांचा,
फेंकित तरि वरतीं धुराचे लोटांवरि लोट,
झगडत लाटांशीं चालली तुकयाची बोट !
सुवर्णदुर्गाला डावलुनि करि बन्दर जवळी
उतारुंना उतरू देइना परि वारा जौळी !
गांठावें पुढचें म्हणोली बन्दर तें थेट,
झगडत वाऱ्याशीं चालली तुकयाची बोट !
पुढतीं बाजूला तडाखे दे वारापाणी,
कापित तरि वाट चालली तुकयाची तरणी !
सुटेल ही आतां आपुल्या हातांतुनि पुरती,
करि म्हणुनी कावा चेटकी दुष्ट निळावन्ती !
लाटेवरि धुका राहुनी उभी पुरोभागीं
'ये, ये, ये इकडे !' खुणावी हालें नीलांगी !
मूर्ति तिची बघुनी जाहला भास फकीरातें,
उठला अळखांब सागरीं 'गिरगिरल्या वातें !
परतविली त्यानें भीतिनें बोट तुकाराम,'
निळावन्तिचें तें जाहलें सुलभचि मग काम !
विकट हास्य करुनी बोटिची पाठ तिनें धरिली !
फौज तिची सगळी तियेच्या मदतीला उठली !
वरुनी द्रप्सांचा सारखा अस्मानी मार,
झंझावातानें आपुला वाढविला जोर !
जीवांचे हाल बोटितिल वर्णावे काई !
वमले कुणि हिरवें, कुणाला शुद्धबुद्ध नाहीं !
देवाला हांका मारिती दीनपणें कोणी;

आयकुनी त्यातें  चेटकी  हांसे जळराणी !
तुकयाचा ज्यानें  जळांतुनि  उद्धरिला गाथा,
रुचे न त्या तरणी  तारणें  पंढरिच्या नाथा !
भजन वरी करिती  तुकोबा  'विठ्ठल–रखुमाई !'
उठति कालळाटा !  धांवते  मधुनि तुकाबाई !
चालाया शक्ती  शेवटीं  तिज नाहीं उरली !
खुंटुनियां चाल  तुकाई  शत्रुकरीं पडली !
जळरूपी जबडा  उघडला  खालतिं काळाचा !
क्षणीं तयें केला  ग्रास त्या  दुबळ्या तरणीचा !
उठली किंकाळी  मिळालें  पाण्याला पाणी;
वळि वेडनि अपुले  तोषली  उदकांची राणी !

*

*  *  *  *  *  *

*  *

सिन्धुतळीं बसलें  आजवरि  जाउनि जें कांहीं,
बाह्य जगीं शब्द  तयाचा  कधिं उठला नाहीं.
सन्त तुकाराम  बुडाली  परंतु ज्या ठायीं
शब्द अजुनि उठती  तेथुनी  'विठ्ठल–रखुमाई !'

———

# खंड सातवा

# भारतलक्ष्मी.

उच्चीचा ग्रह नसो एकही भारतवर्षाला,
असो भाग्यही तुच्छत्वानें झिडकारित याला !
मार्गीं याच्या असोत कण्टक असंख्य पडलेले,
निराश तरिही समजा भारतसुत नाहीं झाले !
स्वर्गांचे ग्रह बुद्धिबलें हे करितिल उच्चीचे
तेज तयाचें जाळुनि टाकिल तिमिराला साचें !
लोळण राहिल घेत भाग्य मग याच्या पायाशीं
कण्टक जाउनि पडतिल मार्गीं पुष्पांच्या राशी !
सात समुद्रापलीकडे जरि सात पहाऱ्यांत
भारतलक्ष्मी असली तरिही येइल ती येथ !
नसे काल तो दूर, तयाच्या ऐका या हाका !
स्वागत त्याचें करावया तर चला पुढें टाका !

---

# अग्रहायण आणि आर्यांचें मूलस्थान.

यहुद्यांच्या बाडावरुन
ठरलें सृष्टिवयोमान !
आड जरी शास्त्रें आलीं
आकुंचित दृष्टी झाली !
जगतीं जें जें प्राचीन
गणुनी तें अर्वाचीन
पाश्चिमात्य आचार्यांनीं
आर्यांची केली हानि !

परिसुनिया त्यांचे बोल
डुलले किति नन्दीबैल !
भारतीय विद्वद्वर्य
आचार्यांचा आचार्य
तिलकाचार्य सरे पुढतीं
राखाया पूर्वजकीर्ति,
अग्रहायणा ये वाचा
कळे काळ मग वेदांचा !
पाश्चात्यांवर ही मात
विश्व होय विस्मयचकित !
छत्रासम गर गर फिरती
आकाशस्थ जिथें ज्योती,
जिथें उषांची चारु तति
भ्रमण करी क्षितिजाभंवतीं,
प्रदक्षिणा भास्कर घाली
दीर्घकाल ज्याभवतालीं,
निरुद्ध करितां मार्ग वळें
कुण्ठित होती दिव्य जलें,
विचित्र भाषा वृत्राची
एक रात्र, शतरात्रींची !
अद्भुत त्या मेरूवरतीं
आर्यांची पहिली वसती;
आजकालचे देव जिथें
रविरूपें राजत होते,
अनर्थ परि दारुण आला
दुर्निवार वृत्रमाला;
करी येउनी हिमपूर
जीवसृष्टिचा संहार !

जाय हिमें आच्छादून
आर्यांचें आदिस्थान !
त्या प्रलयांतुनि जे सुटले,
दक्षिणेस पळुनी आले;
वंशज त्यांचे वसाहती
भिन्न भिन्न जागीं करिती;
वर्षंशतें अगणित गेलीं
स्मृतिलाही विस्मृति झाली !
स्मरणाच्या स्मरणांतून
जाय आर्यमूलस्थान !
विगतकालभेदक साची
सुतीक्ष्ण दृष्टि न कोणाची !
कुतर्क मग माजुनि नाना
स्वैर घालिती धिंगाणा !
द्रष्टा तिलक सरे पुढतीं
उजळाया सत्यज्योती
गत काळाच्या तिमिरांत
वेद तया दावी वाट;
अवेस्त्यास फुटली वाचा
प्रकाश पडला सत्याचा !
जगताला आलें कळुन
आर्यांचें मूलस्थान !
अस्मानीवर ही मात
विश्व होय विस्मयचकित !

मराठी ... ग्रंथालय
स्थळ प्रत

# कवि 'विनायक' यांस :—

सोडुनि जळत्या उच्छ्वासांना,
जाळिल दूषित वातावरणा;
कोण तुझ्याविण रे कविराणा ?
शुद्धिकारका ! कवि विनायका ! १

तूं राष्ट्राचा शाहिर खन्दा,
तू राष्ट्रीयत्वाचा बन्दा,
परवशतेच्या तोडिसि बन्धा !
बन्धमोचका ! कवि विनायका ! २

परंपरा जी शाहीरांची
अखण्ड पुढतीं चालायाची
प्रेरक तिज तव गीतें साचीं !
स्फूर्तिदायका ! कवि विनायका ! ३

मनही ज्यांचें दास परांचें
ध्वनी तयांना तव गीताचे
क्षणात करितिल धनी मनाचे !
चित्ततारका ! कवि विनायका ! ४

राष्ट्रद्रोहा खाक करोनी
राष्ट्रहृदीं ऊर्जस्वल गाणीं
नाचायाचीं तुझीं निशिदिनीं !
दिव्य गायका ! कवि विनायका ! ५

जड नीरस ही माझी वाणी !
गाऊं कसा मी तुजवर गाणीं ?
बोल शुष्क हे घे मानोनी !
कवननायका ! कवि विनायका ! ६

# गोविन्दाग्रजांची मुरली.

जेव्हां वांकुनियां परिस्थितिपुढें
आशा निराशा वरी,
जेव्हां होउनि मूढ, मूक बसते
वागीश्वरी सुन्दरी,
जेव्हा मंद चढूनिया विसरतें
कर्तृत्व कार्यांप्रति
दिव्यत्वा दडपून घोर तिमिरीं
भूतें यदा नाचती, १
न्यायाला तुडवूनियां पदतलीं
अन्याय बोकाळतो,
व्यक्तिस्वार्थ बलिष्ठ होउनि यदा
राष्ट्रास विध्वसितो,
गोविन्दाग्रज ! तेधवां मुरलिचा
स्वर्गीय तुझ्या स्वर
न्यायाला विलया अनिष्ट अवघें
राहेल गां ! तत्पर. २

# ये पुढतीं सरसावून !

ये पुढतीं सरसावून—वेडनी तन्तुवाद्याला !
तव ओजस्वी रणगीत—ऐकुनियां झालों थक !
शिवरायाचा शाहीर '—म्हणवाया तुजला हक्क !
पाडील तुझें संगीत—जनमनीं प्रकाशा लख्ख !

नैराश्या खाक करून
आशेचे पसरिल किरण
गा असें निरन्तर गान !
जागृती आण राष्ट्राला !
ये पुढतीं सरसावून—घेउनी तन्तुवाद्याला !

---

# खंड आठवा

# कवि किती कवनीं परि वर्णिती ?

घुसळितां इतिहास-महोदधि
मिळति निस्तुलमानवरत्नधी
कितिक साधु, नृपाल, किती सती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? १
नरपती चरणीं करिली नति,
फिरुनि देशभरी करि जागृती;
उचित नाम 'समर्थ' तयाप्रति
कवि किती कवनीं परि वर्णिती ? २
बुडत भू असता हरि उद्धरी,
जनहितास्तव राक्षस संहरी;
कृति तशीच करी शिवभूपति
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ३
धरुनि धिंड चमूतुनि काढिली
नयन फोडुनि जीभहि काटिली !
तरिहि धर्मिंच शंभु धरी मति
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ४
सकल घे अरि राज्य हिरावुन,
तरि न धैर्य जयें त्यजिलें क्षण
शिवसुत प्रभु राम महामति,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ५
पळ मनास शिवे न अहंकृति,
लवहि जीस रुचे न निज स्तुति,
अमरवन्द्यहि इन्दुरची सती
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ६

* * * *

देखावे गतकालचे निशिदिनीं दृष्टीपुढें नाचती !
त्यांमाजी नयनां असंख्य दिसती छायामयी आकृती !
कांहीं निद्रित भासती क्षितितलीं, कांहीं उभ्या निश्चल,
ज्या व्यक्ती इतिहासवास करिती त्या मात्र साऱ्या चल ! ७

---

# शिवराजस्तव.

अभिन्न नृपते ! तुझें वचन आणखीं वर्तन,
म्हणूनि रिपुही तुला करिति आदरें वन्दन !
तुझें यश करीतसे पतित मानवां पावन,
तुझें चरित देतसे विगतचेतनां जीवन. १

घडेल तव राजया ! स्मरण नष्ट राष्ट्रीं जरी,
स्फुरेल तरि चित्कला खचित रोमरोमान्तरीं !
समस्त जड वस्तुही करिल तेथली ताण्डव,
चराचर परस्परा गणिल आपुले बान्धव. २

तुझ्या रणधुरंधरा ! नच जगीं तुला कीर्तिला,
उदार तुजसारिखा कधि न पाहिला, ऐकिला !
गभीरतरमानसा ! नयपटो ! दयासागरा !
वदेल तुज सोडुनी कवण कोहिनूरा 'हिरा' ! ३

स्वशत्रुरमणी गणी परम पूज्य मातेसम,
कधीं जित रिपूसही अवगणी न जो सत्तम,
समस्त शरणागतां अभय दे उदाराग्रणी,
असा तुजविणें दुजा नृप न लाधली मेदिनी. ४

खराच अवतार तूं शिवनृपा ! शिवाचा जगीं,
कधींहि भगवद्गिरा नच ठरेल ती वाउगी,

प्रमत्त रिपु दण्डुनी, करुनि आर्यधर्मावन,
सुदुष्ट नर मारिले, सकल तारिले सज्जन. ५

तुझी स्मृति नरर्षभा ! स्मृति न ती असे जागृती !
तिच्यासह सुखें सदा विजय नीति हीं नांदती !
सुनाम तव ऐकतां तनुंत होय संवेदना,
चढे रुधिरबिन्दुना स्फुरण लागुनी चेतना ! ६

धरूनि हृदयीं तुला तव असे महाराष्ट्र हा !
'मरेन मरणें तरी तुजसि गात' ही या स्पृहा !
असो तव शुभाशिची सतत यावरी पांखर,
प्रसन्न मग या सदा सहज 'कृष्ण योगेश्वर' !

---

## शनिवारवाड्यापुढें !

"अश्रुहो ! कशाला आतां
करितसां आंधळे डोळे !"

—१—

विख्यात पुणें शहरांत—शनिवारप्रासादाशीं
विस्तीर्ण जीर्ण वटतरुच्या—पारावरि एके दिवशीं
पाहिली एक विधवा मीं—मूर्तीच जरेची ऐशी !
दुर्दशा बघुनि वाड्याची,
स्मृति त्याच्या गतविभवाची
धीरता दळवि चित्ताची
गहिंवरुनी वृद्धा बोले:–
"अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे !"

—२—

निरखिला दिल्लिदरवाजा—नेत्रांतुनि वाहे नीर !
भडभडुनी आलें हृदयीं—जाहला शोक अनिवार !
कांपली जीर्ण तनुयष्टी—अश्रूंना आला पूर !

चांदीचा सुन्दर पेला
तण्डुलीं पूर्ण भरलेला,
हातांतुनि गळुनी गेला !
उद्गार पुनश्च निघाले:—

" अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ! "

—३—

नयनीं न उरे जणुं पाणी—अश्रुचा पूर ओसरला !
करि यत्न पुढें बोलाया—भानावरि येउनि अबला !
कांपरे निघाले शब्द—सुटुनियां कंप ओष्ठांला !

" दुर्धर प्रसंगावलिला
करिल जी भग्न हृदयाला
अनुभविलें वेळोवेळां !
तेंव्हाहि जे न डबडबले

अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—४—

" व्हायाचें होउनि गेलें—कासया तयाचा शोक ?
विसरावें दुःख गताचें—चित्तांत धरूनि विवेक !
दृश्य तें नश्य जाणावें —सांगती शहाणे लोक !

ज्ञात्यांचें ऐका वचन,
येऊंच नका फिरफिरुन !

जा काळें तोंड करून !
(छे ! आले पुनरपि मेले !)
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—५—

" भरडिले धर्मशत्रूंनीं—जात्यांत जेधवा देव,
( हतभागि मना ! कां स्मरसी—तें महाराष्ट्र-दुर्दैव ?
त्या अपशकुनी काळाचें—घेऊंहि नये कधिं नांव !)
दाटलें तिमिर असतांना
फोडुनी अभ्रपटलाना
शोभला जिथें रविराणा,
तें स्थान पाहुनी झालें !
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—६—

" उन्मत्त महंमदखानें—पीडितां छत्रसालाला,
बाजीला बुन्देल्यांच्या—राखाया जेव्हां गेला
तो गाजी बाजीराय—द्वारालुनि याच निघाला !
त्या द्वाराला वन्दून
पाहूंदे डोळे भरुन !
कां उगीच करिता विघ्न ?
वैरीहि न चिन्तिल असलें !
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—७—

" लाडके पुत्र देवाचे—आम्हीच काय ते एक !
म्हणुनियां महाराष्ट्रीयां—गाजिती फिरंगी लोक;

त्यां जाई जो शासाया—वसईचा धरुनी रोख
त्या अप्पाचें हें सदन
घेऊंदे मज पाहून;
करूं नका वृथा थैमान
हें काय तुम्हा आठवलें ?
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—८—

“ उगविला भयंकर सूड—फोडुनी तक्त दिल्लीचें !
थरथरां कांपले यवन—पाहुनि तें साहस ज्याचें,
माजला वीर संग्राम—भूमीवर पानिपताचे !
त्या भाऊचें हें भवन
देखाया उत्सुक नयन !
घेउंदे तयां पाहून !
जरि परोपरी विनवीलें,
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—९—

“ अटकेला भगवा झेंडा—फडकविला ज्या वीरांनीं
योद्धयांस थंड देशींच्या—भाल्याचें दावुनि पाणी,
खळबळलें वातावरण—ज्यांचिया विजयघोषांनीं !
गंगेला घोडे ज्यांचे
न्हाले, हें स्थान तयांचें
कोण हें म्हणेल ‘ दुज्यांचें ’ ?
कां पिसें तुम्हा परि आलें ?
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे !

—१०—

“ बोलोत कुणी हा ‘वाडा’—सत्य न परि त्यांची वाचा !
हा जातिवन्त पोवाडा—पेशवे धुरंधर यांचा !
हा मूर्तिमन्त इतिहास—या महाराष्ट्र देशाचा !
तेजस्वी चैतन्यानें
या इतिहासाचीं पानें !
थवथवलीं वीररसानें,
तीं वाचायास मुकेलें,
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—११—

“ पाहिले जिथें जनतेनें—गजराज सुखें झुलतांना,
फुरफुरले जेथें तेजी—हालवुनी आयाळींना !
तेथुनीच आतां श्रवणीं—कटु घूकारव यावे ना ?
तूं हास निर्दया काळा !
हें स्थानहि हंसलें तुजला !
तव कृपा नको लव याला !
ईशें या गणिलें अपुलें !
अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ?

—१२—

“ शेळीसम व्हावें दीन—स्वप्नींहि न रुचलें ज्यांना
चातलें शत्रुरुधिराचें—स्नान नित्य समशेरींना,
आणिलें शरण तृण दांतीं—देउनी धर्मवेड्याना !
मिळविली धुळिस सुल्तानी
ज्या महाराष्ट्र–वीरांनीं

त्यांचीच वंशजा असुनी,
भाळीं या रडणें आलें ! ! !

अश्रुहो ! क........ ....      .      ...      . . . "

## १३

बोलूं न पुढें तिज देई—दारुण क्षोभ शोकाचा !
जाहला सडा भूभागीं—लोचनांतल्या उदकाचा !
तेथेंच उगम होणार—राष्ट्रीय काव्यगंगेचा !
प्रत्येक अश्रुचें कवन
चैतन्यें टाकिल भरुन
हें उदास वातावरण !
विरतील बोल मग असले:—
" अश्रुहो ! कशाला आतां—करितसां आंधळे डोळे ! "

# खंड नववा.

# चालवितों शाहीरगिरी.

साधायाला व्यक्तिहित
राष्ट्राचा करिती घात,
पद त्यांच्या देऊन शिरीं
चालवितों शाहीरगिरी !
सावधाऽन ! सावधाऽऽन !! साऽवधाऽन !!!
शाहीरांचें संगीत
समजुं नका रण्डागीत !
युगा युगाची नवलपरी
ही अमुची शाहीरगिरी !
अव्यक्तांतुनि जों व्यक्त
निर्माण करी भगवन्त,
उदय जाहला अरुणाचा
सृष्टीच्या शाहीराचा !
गातां तो अस्फुट गाणीं
जीव भरे भुवनीं भुवनीं !
चैतन्याची दिव्य झरी
ऊर्जस्वल शाहीरगिरी !
असुरपतीचा आचार्य
उशना कविकुलगुरुवर्य
मृत असुरां जीवन्त करी
चालवुनी शाहीरगिरी !
कच त्याचें करि शिष्यपण
झालें मग विद्याहरण !

सुर सारे झाले अमर
        लाधतांच त्यां शाहीर !
अखण्ड चाले परंपरा
        व्यास तिच्यांतिल दिव्य हिरा
भारतवीरां अमर करी
        चालवुनी शाहीरगिरी !
झंझावात किती सुटले,
        चक्रवात गरगर फिरले;
कालोदधिवरि अजुनि तरी
        नाचे ती शाहीरगिरी !
कर्मांचे जे दिल्जान
        कर्मयोग ज्यांचा प्राण,
त्यांच्यास्तव शाहीरांचें
        तन्तुवाद्य बोलायाचें !
स्वार्थांचा केला न्यास
        लोभाचे तोडुनि पाश,
त्यांच्यास्तव शाहीरांचें
        तन्तुवाद्य बोलायाचें !
निज राष्ट्राच्या उद्धरणीं
        रक्ताचें केलें पाणी,
त्यांच्यास्तव शाहीरांचें
        तन्तुवाद्य बोलायाचें !

*    *    *    *

दास्याचा दावेदार
        महाराष्ट्र पूर्वापार !
पर्जन्य पडो वज्रांचा
        उन्नत तरि माथा याचा !

मृण्मयही याची सेना
        शत्रूंची उडवी दैना !
मात करी याचा नृपती
        हुणहरिणसिंहावरतीं !
यदुवंशा उच्छेदूनी
        कितिहि गाजली सुल्तानी
तरि तिजला झाला काळ
        शिव सरजाचा करवाल !
प्रचण्ड हिमनगसम पुढतीं
        कोसळल्या जरि अ पत्ति,
तरि राष्ट्रा देई धीर
        रायरिचा खन्दा वीर !
त्याच्यास्तव शाहीरांचें
        तन्तुवाद्य बोलायाचें
कर्तव्याची हांक करी
        निनदित जेव्हां दरी दरी
रणिं भिडले छातीठोक
        मर्द मराठ्यांचे लेंक !
मोंगलशाही मस्त तरी
        उडे तिचीं ठिकरी ठिकरी !
सुल्तानीवर ही मात
        विश्व होय विस्मयचकित !
चळचळ कांपे बंगाला
        दख्खनचा बघतां भाला,
लढवय्ये जरि पिढिजाद
        गडबडले रजपुत मर्द !
अटकेवर वळल्या ढाला
        समरघोष 'हर ! हर !' झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा क्र. ४३५०

करि गिलच्यां नामोहरम
पानिपताचा संग्राम !
मरुनि मृत्युवर ही मात
विश्व होय विस्मयचकित !
स्वत्वाची झाली होळी,
फितुरीची पिकली पोळी;
अमर तरी मरुनी झाला
गोकलखां लढनेवाला !
त्याच्यास्तव शाहीरांचें
तन्तुवाद्य बोलायाचें !
शस्त्रांचा झाला न्यास
परवशता घाली पाश !
पोवाडे निःश्वासांचे
शेवटल्या शाहीरांचे
गुणगुणती अजुनी कानीं
जरि विरले वातावरणीं !
धारण त्यातें करुनि शिरीं
चालवितों शाहीरगिरी
सावधाऽन ! सावधाऽऽन !! साऽवधाऽन !!!

---

# शिवकालीन रायगड.

—१—

“ तुंग नगशिरीं दुर्ग कुणाचा हा झुलतो आहे ?
चन्द्रहीन हा ध्वज कोणाचा फडकत वरि राहे ?

मुकुट मस्तकीं सन्ध्या ज्याच्या सोन्याचा वाली,
गड कोणाचा वदा असे हा असा भाग्यशाली ? ”
‘ काय पुसतसां ? सह्याद्रीच्या बाळां जे काळ,
त्या काळांना काळ जाहला ज्याचा करवाल,
यश कैलासासम ज्याचें, जो आर्तांचा वाली,
रविप्रखरता, शशिशीतलता ज्यात एक झाली !
शक्तियुक्तिचें, नीतिभक्तिचें मीलन ज्यामाजी,
जिंकायाला समर्थ ज्याला नच झाले गाजी !
दुर्गराज हा गिरिशिखरींचा त्याच महात्म्याचा
शिवरायाचा, छत्रपतीचा, स्वराज्यदेवाचा ! ’
ऊठ शारदे ! डोळे भरुनी घे हा पाहून,
गा या मंगल कालीं यावरि मंगलमय गान !

—२—

“ गिरि सिंहासन, वरी विराजे दुर्गांचा राणा !
सिन्धुदुर्ग यापुढें वांकुनी देती नजराणा !
उभे राहुनी सह्याद्रीच्या भिव्या शिरीं कोणी
गड करिताती सेवा याची चवऱ्या ढाळोनी !
अभ्रांचें यावरी शोभतें छत्र शुभ्रवर्ण
अनिल यावरी गाउनि निववी रसिकांचे कर्ण !
असेल याला दृष्ट लागली कोणा पाप्याची,
उषा म्हणुनि यावरि ओंवाळी उडुरत्नें सार्चीं !
करितो सारें रामाच्या हा नांवानें कर्म,
स्वर्ग आणणें भूलोकावरि हा याचा धर्म !
कर्तव्याचें, कर्तृत्वाचें हा झाला धाम,
हा शौर्याला, हा धैर्याला वाटे विश्राम !
दुर्गराज हा रायगड महा-राष्ट्राचें हृदय !
हृदयाचें या हृदय महात्मा ज्ञानी शिवराय !

—३—

बुरुज हिरकणी मातृप्रेमा दाखवितो इकडे,
टकमक टकमक टोंक बैसलें अवलोकित तिकडे !
घन तिमिराला भेदुनि येतां दिव्य अरुणकिरण
प्रतिप्रभातीं करी भवानी त्यांमाजी स्नान !
आग्नेयीला जराच पुढतीं श्रीगोन्दा गेलें,
कुशावर्त नजिकट, तयाच्या उदकीं कमलकुलें !
सप्तर्षींचें मण्डल, हिमकर, तारांच्या माला
गंगासागरसरीं उतरती रात्रीं स्नानाला !
राष्ट्रीं चाले चळवळ, तीचें हें केन्द्रस्थान,
भक्तोद्धारक भगवन्ताचें येथ अधिष्ठान !
कर्तव्याची हांक हालवी सह्याचलसानु
चैतन्यानें स्फुरले तेव्हां येथिल अणुरेणु !
अनन्तभास्करयुक्त निशेच्या गणी न परिवारा,
रायगडाला वन्द्य सर्वदा दिवसाचा तारा !

—४—

श्रीजगदीश्वररम्यमन्दिरीं घण्टांचा नाद
होतां त्याचा उठे शिवाच्या हृदयीं पडसाद.
बल राज्याचें दाखविती या अष्टादश शाला,
व्यक्त द्वादश कोश करीती राज्यैश्वर्याला !
अरिला खड्गें, मना संयमें जिंकियलें ज्यांनीं
त्या वीरांची इथें विराजे ही सौधश्रेणी !
राष्ट्रकुटुंबी शिवरायाच्या विश्वासा पात्र,
चिन्ता चित्तीं राष्टहिताची ज्यांस अहोरात्र,
सदनें हीं त्या नृपसचिवांचीं, सुनीतिमन्तांचीं,
गुणवन्तांचीं, श्रीमन्तांचीं, राज्याधारांचीं.

उदात्ततेचें, मंगलतेचें हें वसतिस्थान,
जलदेवींना, स्थलदेवींना याचा अभिमान !
अलकावति ! तव गजान्तलक्ष्मी रायगडीं रमली,
अमरावति ! तव अनुपम शोभा रायगडें वरिली !

—५—

विधुप्रकाशीं चमकति रात्रीं श्वेत प्रासाद,
कोठें गायकसदनीं निघती वाद्यांच नाद;
कोठें चाले विठ्ठलकीर्तन, कुठें रामभजन,
भूषणकविचें परी चाललें शिवगुणगणगान !
पुष्करिणीवर बसले कोणी शीतल शशिकिरणीं
कोणाला मोहून टाकिलें धारायन्त्रांनीं !
कण्ठीं आला माळ घालुनी शशि नक्षत्रांची
तें न साहुनी कुणी काढिली माला मोत्याची,
घालुनि कण्ठीं निज दयितेच्या हळुच वदे तिजला,
‘ प्राणवल्लभे ! तव वदनानें शशांक लाजविला !
शत्रुपताका भूषविणाऱ्या या क्षयरोग्याला
चारुमुखींनो ! रोज लाजवा ! शासन हें याला !
रायगडींच्या रमणींपाशीं रजनीचा नाथ
सौन्दर्याची करो याचना पसरुनियां हात ! ’

—६—

नन्दनवनिंच्या सुखां वितरिलें उपवन रायाचें
शीतल निर्मल उदक तयांतुनि खेळतसे साचें !
कुठें नारळी, कुठें पोफळी पवनीं डुलतात,
कोठें चंपक, अशोक कोठें पुष्पीं खुलतात;
कोठें चन्दय, अनन्त कुरवक, बकुल पारिजात
कुठें बिल्वतरु, गुलाब, तुळशी, कुन्द असंख्यात !

सुन्दर मण्डप ठायीं ठायीं नाना लतिकांचे
तेथुनि युवती नृत्य पाहती मत्त मयूराचें !
शुकचचूंतुनि डाळिंबाचे दाणे जे गळती,
माणिक्यें मरकतीं तसे ते हरित तृणीं खुलती !
वसन्तकाळीं आम्रतरुवरी कोकिल गातात,
आनन्दोर्मी हवेंत साऱ्या तेणें उठतात !
अनन्त असतां विशाल तरुवर, मधुर फलें ज्यांचीं
कां कोकिल हो ! गीतें गातां एका आम्राचीं ?

—७—

सुवर्णकदलीपर्णें हलवित चारु मन्द पवन
ये फुलवाया तरुलतिकांच्या कलिकां चुंबून !
मुकुलकुलाचा परिमल घेउनि करि पुढतीं गमन
कोठें, कैसा, कधीं कुणाला टाकिल मोहून ?
पुष्पदलांवरि नीहाराचीं मोत्यें विखरून
रविप्रकाशाआड बैसती नक्षत्रें लपुन !
वेंचित मोत्यें तीं स्वकरांनीं रवि चढतो गगनीं
कोठें, कैशीं, कधीं, कुणावर देइल उधळोनी ?
सुमगर्भींचा सुधासमधुररस पिउनी सानन्द,
वातावरणीं सुखें तरंगे मधुपांचा वृन्द !
गाणें गातो वृत्ति तयाची होउनि उत्तान,
कोठें, कैसें, कधीं कुणाचे निववील तें कान ?
परिमळ, मोत्यें, दिव्य गान तें जरि कोणा व्हावें
तरी तयानें शिवरायाच्या रायगडीं यावें !

—८—

वर्षाकालीं कृष्ण घनांच्या थकलेल्या पंक्ति
प्रासादाच्या शिखरांवरतीं घेती विश्रान्ति !

सन्तत धरुनी विमल जलाची दुर्गशिरीं धार
वाटे हलका करिति आपुला दुर्वह जलभार !
इन्द्रधनूचें सांजसकाळीं तोरण बांधून
दुन्दुभिनादीं गर्जित अपुलें देती मिळवून !
स्पर्धा धरुनी नवयुवतीच्या चचल नयनांशीं
चंचलता चपला आपुली दावितसे त्यांसी
श्यामपयोधरपटलाच्छादित तार्‍यांच्या श्रेणी
लक्षावधि खद्योत नाचती हर्षभरें म्हणुनी !
सिन्धु मन्थुनी, करुनि अरण्यें अवघीं उद्ध्वस्त
प्राकारांशीं झुजत राहे खल झंझावात !
झंझावाता ! विझवायाला तुज नाहीं शक्ति
रायगडींची सदा जागती स्वातन्त्र्यज्योति !

—९—

अगस्ति तारा अन्त सुचवितो वर्षाकालाचा,
भगवा झेंडा अन्त सुचवितो दुर्मद राजांचा !
रहा अगस्ते ! सदैव चमकत नील अंबरांत,
फडकत राहिल भगवा झेंडा येथ अविश्रान्त !
विरल विरल कर सजल घनाचे गगनीं समुदाय !
करिल अरींना विरल भूतलीं सरजा शिवराय !
कार्पासाच्या जागोजागीं जणुं रचिल्या राशी,
दिसोत ऐसे मेघ येउनी शुभ्रपणा त्यांसी !
दिसेल मग ही महाराष्ट्रभू स्वर्गासम सारी,
राष्ट्राचा संसार कराया सजतिल नरनारी !
अरविन्दांवरि मिलिन्द गुंगुनि करोत झंकार,
पोवाडे शिवदेवावरुनी गातिल शाहीर !
कन्या दख्खन तुझी अगस्ते ! तिजला चिरकाल
प्रतापशाली शाहसूनु हा शिव होवो ढाल !

—१०—

हें एकाचें नव्हे कुणाचें, स्वराज्य सकलांचें,
सुसंस्कृताचें असंस्कृतांचें, श्रेष्ठकनिष्ठांचें !
प्रवृत्ति आणिक निवृत्ति यांचा येथें संयोग,
ज्ञाननदीचा यांतुनि वाहे सन्थपणें ओघ !
परधर्मीयां लेश न येथें धर्मांचा जाच,
धर्मप्रसारवेताळाचा येथें नच नाच !
रिपुरमणींवर कधीं न होतो येथ बलात्कार,
जित शत्रूंचा करिती येथिल जेते सत्कार !
महाराष्ट्र हा तनय पार्वतीपरमेश्वर यांचा,
द्वेष याजला जन्मापासुनि जुलमी सत्तेचा !
विनाश याचा करावयाला येइल जरि कोण,
शाण्णव कुळिंचे भूपति यास्तव देतील प्राण !
'फड फड' शब्दीं बजावीत हें अरिला चिरकाल
राष्ट्रपताके ! कविस्फूर्तिला हलवित तूं डोल !

—११—

प्रयाग, काशी, मथुरा, वृन्दावन हीं कोणाला ?
नसेल ठावा रायगड जया, त्या हतभाग्याला !
हा क्षेत्रांचें क्षेत्र रायगड, तीर्थांचें तीर्थ !
गंगासागरकृतिस कराया गंगा असमर्थ !
उडति थुइथुई कारंज्याच्या जेथें जलधारा,
जलबिन्दूंशीं जिथें खेळतो स्वच्छन्दी वारा,
निकट तयाच्या एक विराजे भव्य प्रासाद,
सजवुनि त्याला आंत लाविला जडिताचा चांद;
मन्द वायुनें हलति झालरी मोत्यांच्या मधुनी
चमकुनि अपुलें हिरेमाणकें दाखविती पाणी;

वरतीं छतावरि बसला बहुविध रत्नांचा थाट
सभा खालतीं नररत्नांची बसली घनदाट !
सेवक मागें, पुढें प्रजाजन, पार्श्वीं उमराव,
मध्यें शोभे सुवर्णासनीं दुर्गराजदेव !

—१२—

हा भीष्मासम समरधुरन्धर, कर्णासम दाता,
धर्मनृपासम हा पुण्यात्मा, धर्मात्मा, ज्ञाता !
समर्थांचिया सद्बोधाचें या कळलें मर्म,
नरतनुधारी परमोज्ज्वल हा महाराष्ट्रधर्म !
हा सन्तांना, हा योग्यांना पूज्य महाभाग,
हा योगेश्वर कृष्णाचा निष्कामकर्मयोग !
शिवस्वरूपी सदाशिवाचा हा नृप अवतार,
पतितोद्धारा ! शिवा ! उदारा ! तुला नमस्कार ! ”

*    *    *    *    *

*    *    *    *

गातां गातां देवि शारदे कां वरिलें मौन ?
टपटप गळती अश्रु असे कां हे नयनांतून ?
वीणा पडली भूमितलावर हातांतुनि गळुनी,
तारा गेल्या सर्व तियेच्या अश्रूंनीं भिजुनी !
रुद्ध जाहला कण्ठ, हुन्दके येती फिरफिरुन,
इथेंच आतां विराम तर हें पावूं दे गान !

---

# छत्रपतींचें पत्र.

सूर्यप्रभा, प्रभुकृपा न जयांस ठावी,
जन्मान्ध, नास्तिक असे जग नित्य दावी !

ऐसा परी क्षितिलीं हतभाग्य कोण
दिल्लीश्वरातुलकृपा विदिता जया न ? १

सम्राट्कृपा निरुपमा, हृदयीं ठसावें;
तद्धन्यते निशिदिनीं स्वमनीं स्मरावें;
जीतें सुपात्र जगतांतिल जीवमात्र,
हा दैवहीन ! म्हणुनी ठरला अपात्र ! २

आग्रापुरीं जरि निवास बडे त्रिमास,
ये एकदाच पददर्शनयोग यास !
आज्ञेविणें त्यजुनि ये जरि राजधानी,
सेवानुरक्त तरि सेवक हा इमानी. ३

स्वप्नांतही स्मरत सेवक सेव्यभाव
सेवा अखण्ड करणें बनला स्वभाव,
साम्राज्यकार्य अपुल्या पदसेवकानें
केलें किती, अखिल भारतवर्ष जाणें ! ४

'सद्धर्मपालक' दिगन्तरिं कीर्ति गाजे
ज्यांची असे प्रबल थोर अनेक राजे !
सेवा तयांसहि असे महशूर साची
या भारतेशचरणांबुजसेवकाची ५

गंभीर सिन्धुसम चित्त नृपोत्तमांचें,
घेई हिरोनि विभवास हिमालयाचे !
ज्या आर्तदुःख दिसतां द्रव फार यावा,
त्यालाहि ही अविदिता न असेल सेवा ! ६

होईल शुष्क अपुला न कृपाप्रवाह,
विश्वास यास दृढ हाच जहापनाह !
ये मानसीं बहुत धीर म्हणून याला
हा नम्र अर्ज चरणीं गुदरावयाला ! ७

पाळी नय प्रबल मोंगलबादशाही,
ऐसा हिचा सतत हा अभिमान वाही,
वार्ता परन्तु पडली श्रवणीं अनिष्ट,
ती दे अहर्निश मनास असह्य कष्ट ! ८

येतांच हा स्वजन घेउनि दक्षिणेंत
खाविन्द चालविति याजविरुद्ध बेत !
सिद्धिप्रती सकल ते मग न्यावयास
राज्यांतले करिति रिक्त समस्त कोश ! ९

आकण्ठ ते त्वरित कोश भरावयाला
हिन्दूंवरी बसविलें जिझिया कराला !
योजीयले प्रखर तद्ग्रहणीं उपाय,
दीन प्रजा म्हणुनियां करि 'हाय ! हाय !' १०

सतप्त लोहरस मच्छूवणीं न त्यांनीं
कां ओतिला ? कळविलें मज हें जयांनीं,
दिल्लीश ! हा पथ नव्हे नयपाळनाचा !
हा खून होय ढवळ्या दिवसा नयाचा ! ११

गाजे 'अजातरिपु' नाम जगीं जयाचें,
चित्तीं स्मरा चरित त्या प्रपितामहांचें,
ते जाहले परमवन्द्य महानुभाव
धर्मीं समस्त सम ठेवुनियांच भाव ! १२

धर्मीं समस्त सम ठेवुनियांच भाव
केलें जिहीं निज 'जहांगिर' सार्थ नांव,
त्याही स्मरा सुचरित स्वपितामहांचें
मर्धे न लेश खळलें नयदान ज्याचें १३

जातां प्रिया, हृदयिं दारुण शोक झाला,
भूदेविचा मुकुट त्यांतुनि दिव्य आला !

ते तीर्थरूप अपुलेहि शहाजहान
धर्मां समस्त सम देत सदैव मान. १४

गेले तिथे त्यजुनि ते तनु चक्रवर्ति,
त्यांची अबाधित तरी जगतांत कीर्ति !
हा हिन्दु, हा यवन, भेद तिहीं न केला,
ते तातसेच गमले अवघ्या प्रजेला. १५

' देशांत या विविध धर्म जरी जनांचे,
गातात ते सुयश एकचि ईश्वराचें;
येणें न भेद उरला रयतेंत कांहीं. '
ग्वाही अशी सकलिकां दिधली तयांहीं. १६

होते न ते अणु उणे जरि विक्रमांत,
अन्याय त्यां तरि दिसे जिझिया करांत;
निःशेष मानव मुलें जगदीश्वराचीं
ही भावना सतत त्या नृपसत्तमांची. १७

सद्भावना कटु फलांस न दे कदाही,
विस्तारली सहज मोंगलबादशाही !
शत्रूंस दुर्धर धुरन्धर उग्र योद्धे,
दिल्लीश्वरांपुढतिं ते नमले शिसोदे ! १८

तेव्हां सदैव धनधान्यसमृद्ध देश,
होते सुवर्णपरिपूर्ण समस्त कोश;
सम्राट् सदा रत जनप्रतिपालकर्मीं
होत्या प्रजा ससुख नांदत भिन्नधर्मी. १९

तो भाग्यकाल परि जाय लयास आतां,
आतां अहर्निश मनीं रयतेस चिन्ता !
आतां सुरक्षित न जीवित वित्त कांहीं !
दिल्लीशचित्त परधर्मसहिष्णु नाहीं ! २०

धर्मप्रसार करणें करुनी जुलूम,
हें कोणता नृप नयज्ञ करील कर्म ?
‘ हा ’ बोलती सकलही जन ‘ मार्ग वाम ! ’
खाविन्द आधुनिक त्याविषयीं सकाम ! ! २१

इस्लाम धर्म वरणें न रुचे जयांना
गांजावयास सजला जिझिया तयांना !
ऐशापरी छळुनियां दुबळ्या प्रजेला
सपक्ष आजवरि भूपति कोण झाला ? २२

खाविन्द मानिति जया शिरसा प्रमाण,
ईशप्रणीत कथि पावन तें कुराणः—
“ अल्ला जगांतिल असे अवघ्या जनांचा. ”
अल्ला न केवळ महंमदपन्थियांचा ! २३

होवोनि नम्र मशिदींत महंमदीय
सद्भावपूर्वक करी स्तवना यदीय,
पूजी तयाप्रतिच हिन्दुहि भक्तिभावें
देवालयीं प्रतिदिनीं सकलास ठावें ! २४

जो निर्मितो जगतिं मानव भिन्नवर्ण
निर्माण तोच करि धर्महि भिन्न भिन्न;
एकाभिमान धरुनी छळणें दुज्याला,
होणें न हें प्रिय तया परमेश्वराला ! २५

सामर्थ्य थोर भवदीय जरी दळांचें,
साधुच्छलीं विफल तें परि व्हावयाचें;
संत्रस्त दीन दुबळी जनता स्वशापीं
हानी करील, न तशी अरिहि प्रतापी ! २६

अन्याययुक्त तरि हा कर नष्ट व्हावा,
धाकें न धर्म अपुला कधिं वाढवावा !

येणेंच रक्षण भवत्कुलसद्यशाचें,
संतुष्ट चित्त अनरूप जनार्दनाचें. २७

याहीवरी जरि कथील कृपाळु चित्त
'हिन्दुप्रजाच्छल असे नयपूर्ण कृत्य!'
तो राजसिंह तरि हिन्दुजनावतंस
घावें तयें प्रथम या जिझिया करास. २८

मेवाडभूप कर हा करितांच मान्य
आज्ञा नसेच इतरां करणें अमान्य!
आम्हीं असूं मशकवत् जन, भारतेश!
आम्हास नष्ट करुनी महती न लेश! २९

दिल्लीश्वरांप्रति असो अनुकूल दैव!
साम्राज्यसूर्यहि तसा द्युतिमान् सदैव!
इच्छा अशी करित जागृतिसुप्तिमाजी
हा नम्र अर्ज चरणीं गुदरी शिवाजी. ३०

---

# शाहूचें दक्षिणेंत आगमन.

महाराष्ट्रा! तूझे सकल पुरले आण नवस
महाराष्ट्रा! आता तव न उरले दैन्यदिवस;
महाराष्ट्रा! आली अविरत तपस्या तव फळा,
महाराष्ट्रा! होती खचित तव पुण्याइ सबळा! १

सुधावर्षावाला करित रजनीनाथ गगन
क्रमी, येई हर्षा उधळित सदा देव अरुण!
जरी तारा दिव्यें अमित करिती अर्पण जगा
महाराष्ट्रा! केलें लवहि तव त्यांनीं न हित गा! २

नद्यांनो, सिन्धूंनो ! करुनि जयघोषाप्रति महा,
महाराष्ट्रस्तोत्रें गुणगुणत रात्रंदिन रहा !
असे आलें आतां नवयुग, नुरे काळ पहिला !
करा तत्सन्देशा सुकविजन ! जाहीर सकलां. ३

स्वराष्ट्रस्वातंत्र्यास्तव समर आतां न पुढतीं
महाराष्ट्रीयाना रिपु न उरला एक जगतीं !
पुन्हा सह्याद्रीचीं निखिलगगनाधार शिखरें
महाराष्ट्रीयाच्या कधिंहि नच न्हातील रुधिरें ! ४

जयें धर्मासाठीं गणुनि तृणवत् शीर्षकमला,
बलि स्वप्राणांचा यवनपतिकोपाग्निस दिला !
अहो ! राष्ट्रासाठीं तृणसम गणी जो स्वतनुला,
तया श्रीशंभूचा तनय निजदेशा परतला ! ५

स्मृती होतां ज्याची स्फुरण रणभीरूंतहि भरे,
स्फुरे चैतन्यानें वपु, अधर वेगें थरथरे !
सजीवां निर्जीवां करि सहज जो कार्यनिरत
पहा ! हा आला त्या शिवनृपतिचा पौत्र परत ! ६

उषांनो ! सन्ध्यानो ! जलदततिची झालर करा !
प्रभा आदित्यांनो ! जगतिं अपुली मंगल भरा !
प्रसन्नत्वा विश्वीं पसरित दिशांनो निशिदिनीं
शुचित्वा दिव्यत्वा वितरुनि करा स्वर्ग अवनी ! ७

महाराष्ट्रीयांनो ! प्रमुदित मनें उत्सव करा !
चला ! व्हा सामोरे ! सुटुनि तुमचा ये नृप वरा !
गुलाल प्रेमाचा प्रभुवरि कुणी द्या उधळुनी !
कुणी ओंवाळा त्या नयनजलसन्मौक्तिकमणि ! ८

पयोदेवी नृत्या करिति वनदेवींसह जिथें,
जिथें आनन्दाचें चिरसमय साम्राज्य झुलतें,

जयामाजी ऐशीं सुखकर सरित्तीरपुलिनें,
पहा स्वदेशा, त्या कर नमन राया नत मनें. ९

जयांच्या रक्ताच्या क्षितितल नद्यांनीं भिजविलें,
जलींही राष्ट्राच्या उजळ इतिहासास लिहिलें;
महाराष्ट्रेशा ! ते बघ भरुनि डोळे निज जन,
भुकेले त्यांचेही तव मुख पहायास नयन ! १०

तयां भूपा ! तूंचि प्रिय गुरु, सखा, नायक खरा,
असे राज्याची या तुजवरिच आतां गुरु धुरा !
वसो कर्तव्याची सतत तव जाणीव हृदयीं,
असो श्रीरामाच्या समचि अनुरक्ती तव नयीं ! ११

पुरा श्रीहर्षांचा करुनि रणरंगीं परिभव
जयांनीं लीलेनें बहु मिळविलें वैभव नव,
ध्वजा ज्यांच्या नेलें मिरवित जगीं यादवनृपीं
महाराष्ट्रीयां ते विगत दिन दावीं पुनरपि ! १२

* * * *

गिरीच्या गर्भींचे विरघळुनियां हीरकमणि
तयांचे स्वच्छन्दें विहरति इथें निर्झर वनीं;
लताकुंजीं येथें करि मधुर गाना मधुकरी,
स्वराज्याचें ऐशा चिर नरवरा ! पालन करीं ! १३

# शाहुराजाचा उमराव.

## ( पोवाडा. )

—१—

आंग्र्याचा मुलुख, घाटाखालीं तळेकोंकण । नारळपोफळजांभुळवन ॥ आमांरानें शोभा आंग्र्याच्या मुलखाला । बंदरोबंदरीं झुलती ढाला ॥ विजयदुर्ग सुवर्णदुर्ग रामालक्षुमणाची जोडी । दर्यावर्ती केली कोंडी ॥ फिरंगि, इंग्रज, पाण्यांत सत्तावीस पाच्छाही । त्यांसानिं आंग्र्याची मनाई ॥ फुटेना कोंडि क्रोध आला इंग्रजाला । लाल झाला भोरा डोळा ॥ बसला इंग्रज ममइ जंजिऱ्यांत मजलशी । म्हणे दाउं हिस्का आंग्र्यासी ॥ खरखर कागद लीहिला । लखोटा मोहरबन्द केला । इंग्रजानें हेजीब बोलाविला । लखोटा त्याच्या ताबिन केला ॥ मचव्यामधिं बैसुन । जावें अलिबाग बंदराला ॥ ढवळा बावटा घेउन । जावें आंग्र्याच्या सदरेला ॥ येवढा लखोटा देउन । यावें चाच्यांच्या नायकाला ॥ हुकुम इग्रजाचा ऐकुन । उडालि हेजिबाची गाळण ॥ ही नग नग कामगिरी । मारलि धरणीला लोळण ॥ तो चाच्यांचा नाइक । आग्रा माजा घेइल प्राण ॥ दर्यांत खादेरी पुण्ड किल्ला । थत न्हेउन बुडविल मला ॥ त्याचा कुणीं सांगावा नेम । जाइल सागरगडा घेउन ॥ भयाकार वादरटोंकावरून । टाकिल कडेलोट करून ॥ जे जे आग्र्याम्होरे गेले । ते ते त्यानें ठार केले ॥ असा आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—२—

बघुन काळ्या हेजिबाच्या घाबरगुंडिला । गोरा इंग्रज खवळुन गेला ॥ खुर्शि सोडुन हात मेजावर्ता मारिला । पाय आपटित थैमान केला ॥ चढवा खोडा म्हणे या हरामखोराला । हा फितुर ल्योकाचा आंग्र्याला ॥ याला जगेल इतकें अन्नपाणि देउन । ठेवा कोठडींत कोंडुन ॥ दावुन हिस्का आंग्रा आणुं रुजवातिला ।

तवां सजा फर्माबूं याला ॥ नेमला मग इंग्रजानें वकील आपला जात-वाला । जायाला आंग्र्याच्या मुलखाला ॥ करील दर्यांमधीं अडथळा । धूळ फुंकुं त्याच्या मुलखाला । सांगा कान्होजी आंग्र्याला । तूं नसुन वाग आम्हांला ॥ वकिल पोपट पढविला । लखोटा त्याच्या ताब्नि केला ॥ मचव्यामधिं बैसुन । वकिल चालला अलिबागेला ॥ सोडला ममईचा जंजिरा । आला खांदेरिच्या वाऱ्याला ॥ किल्लेदारानें मचवा पाहिला । गोळा मनाइचा सोडिला ॥ नाखव्यानें मचवा उभा केला । ढवळा बावटा दाखविला ॥ आले वलवित घेउन होडी । किल्लेदाराचे नावाडी ॥ सवाल किल्लेदारानें केला । मचवा जातो कंच्या बंदराला ॥ नाखवा बोले किल्लेदाराला । द्यावा पायलाट आम्हांला ॥ माजा ममईचा मचवा । आला सर्खेली मुलखाला ॥ ही इंग्रजाची वकिलात । जायाची अलिबाग बंदराला ॥ ह्मत आंग्रा कान्होजीराव । शाहुरा-जाचा उमराव ॥

—३—

किल्लेदारानें नाखव्याला पायलाट वाटाड्या दिला । मचवा म्होरे चालू झाला ॥ तीन कोसांची सफर, वाटाड्यानें सा कोसांची केली । वकिलात अलिबागेला न्हेली ॥ आवळिं औजारें, पावडा नाखव्यानें टाकिला । बंदरांत मचवा उभा केला ॥ होडिंत बसुन इंग्रज वकिल लागला कांठाला । संगातिं वाटाड्या घेतला ॥ ढवळा बावटा दावित वकिल चालला सदरेला । आला किल्लेदर्वाजाला ॥ सत्रा संगिन हुड्यांचा कुलाबा किल्ला जंजिरा । चुन्यावांचुन सांधला चिरा ॥ उडवीत बावटा फडफडा । बोले इंग्रज वकिल फांकडा । कुठे कान्होजीराव रणगाडा । चला दावा त्याचा मला वाडा ॥ मी वकिल ममइवा-ल्याचा । आलों आंग्र्याच्या भेटिला ॥ वर्दि गेलि कान्होजी आंग्र्याला । दर्यांसा-रंग सर्खेलाला ॥ आला इंग्रज वकिल भेटिला । सल्लागोष्टी बोलायाला ॥ राव कान्होजि आंग्रा बोलला । आणा वकिलाला भेटायाला ॥ महादर्वाजा ओलां-डिला । वकिल किल्ल्यामधीं आला ॥ दुसरा दर्वाजा ओलांडिला । वकिल रावळाहारीं आला ॥ राउळ माघारें टाकिलें । आला सर्खेली वाड्याला ॥

शोभिवन्त उमदा वाडा । गोष्टि सांगे अस्मानाला ।। वकिल सदरेला जंव आला । सदर देखुन भांबावला ।। मिळाले सदरेला सारंग । दर्यावर्दी समशेर-जंग ।। मधिं आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ।।

—४—

धीर करून आंग्र्याला सलाम वकिलानें केला । बोले कान्होजीरायाला ।। आम्हि इंग्रज उदमि म्हातों तुमच्या शेजाराला । तुम्हि तों कोंडि केलि दर्याला ।। कराया उदिम आलों समुन्द्र ओलाडुन । घेतलें बाच्छाही फर्मान ।। बाच्छाही मुलुख समदा हिंदुस्तान दख्खन । मांडलें तुम्हीं चांचे-पण ।। देव बर्कत देइना कधिं चांच्याच्या तल्वारिला । तुम्हि भलेपणानें चाला ।। धरूं हत्यार नाहिंतर नाइलाज होउन । कराया उदमाची राखण ।। करिल दर्यांमधीं अडथळा । धूळ फुंकुं त्याच्या मुलखाला ।। ठराव यून साहेबानें केला । लखोटा तुम्हांला हा दिला ।। लखोटा आंग्र्यानें वाचिला । आंग्रा खद्-खदां हांसला ।। हंसुन वकिलाला बोलला । सागा तुमच्या साहेबाला ।। देव बर्कत देतो कोणाला । कळेना तुम्हांला आम्हाला ।। जुन्या बाच्छाहीच्या गोष्टी । सांगता आंग्र्याला काशाला ।। चार बाच्छाया गाडुन खालीं । बांधला शिवरायानीं वाडा । त्या वाड्याचा सर्खेल । आंग्रा तुमचा घेतो झाडा ।। इतका लांब उदमा-पायीं । कोण येउन व्हाइल वेडा ।। तुमच्या उदमी पेशामागें । म्होकला बंदू-कीचा तोंडा ।। जाणतो चोराला सावाला । जाणतो आंग्रा इंग्रेजाला ।। उगिच गुर्कावण्या काशाला । खुशाल यावें झुंजायाला ।। तयार आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ।।

—५—

हातिं गोळा देउन लावला इंग्रज वकिल वाटेला । झालें आवातण झुजाला ।। बोले मग कान्होजि आंग्रा आपल्या लोकांला । इग्रज येतो झुजायाला ।। दिलि खबर आमच्या हेरणारांनीं आम्हांला । इंग्रज येतो विजयदुर्गाला ।। किल्ल्यामधिं किल्ला आमचा विजयदुर्ग जजिरा । झळके सर्खेलीचा तारा ।। विजयदुर्गावर्ता इंग्रजाचा हांवरा डोळा । औस्तात् येउन घालिल घाला ।। ओंबलावाणि चिकट

मोठि इंग्रज वाण्याची जात । पाडिल गोळ्यांची बसांत ॥ तरि ठोकुं तागडिवाल्याला । पाणि पाजु खाडिचें त्याला । आम्हि जातों विजयदुर्गाला । जंवर इंग्रज नाहिं थत गेला ॥ दिली ताकिद तांडेलांना । गलबतें गोदीबाहेर आणा ॥ रवळनाथ बेगी बेगी । जाउंदे सुवर्णदुर्गाला ॥ सेनावन्ती बेगी बेगी । जाउंदे जैगड बदराला ॥ दर्यांजंग विजयदुर्गाला । जाईल घेऊन आम्हांला ॥ लिहिलि किल्लेकऱ्यांना फर्मानें । इंग्रज येतो सावध व्हाणें ॥ उठेल हबशी साधुन वळें । जागा डोक्यांत घालुन तेल ॥ रवळनाथ सोनावन्ती । फर्मानें घेउन चालू होती ॥ निर्विला किल्ला मथुराबाइला । निर्विलें आमार शेखोजिला ॥ निर्विलि फौज राणोजिला । नाळकर संगातिं बोलाविला ॥ नारळ भवानिला ठेविला । निरोप समद्यांचा घेतला ॥ निघाला आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—६—

उठिवला नागर, दर्यांजग चालला आंग्र्याला घेउन । निशाण हिरवें फडकावुन ॥ उभार्लिं शिडें, चाळीस वल्हीं चालु झालिं जोसांत । चाले दर्यांजग गलबत ॥ दोन बाजुंला दांतावाणि दिसति तोफांच्या हारी । धांव दर्यांजगाची भारी ॥ दुर्बि घेउन, चढुन बसला पिंजऱ्यामधीं पांजरी । बघतो हेरुन दर्यांवरी ॥ जागोजाग शेवाळाच्या काळ्या तरल्या जाळ्या । आडव्या वाटेवर्ल्या आल्या ॥ मच्छिमार होड्या भेटल्या कोळि लोकाच्या म्होरे । होत्या मारीत म्हावरें ॥ कोर्लईं माघारा टाकिला । मुलुख हबशि याचा लागला । किनारा तीन कोस दूर राखिला । देव मावळुन काळोख झाला ॥ दर्यांजग जोसांत चालला । थड् थड् पाणि मारि नाळिला ॥ कांसा किल्ला डावलिला । इतक्यांत चन्द्रम ऊगावला ॥ खबर नाहीं हबशी याला । दर्यांजंग म्होरे चालला ॥ मुलुख हबसाण मागें टाकिला । आला सर्वेली मुलखाला ॥ गेला सुवर्णदुर्ग माघारा । गेला गोपाळदुर्ग माघारा ॥ गेला जैगड माघारा । गेला रत्नागिरि माघारा ॥ गेला पूर्णगड माघारा । गेला यशवन्तगड माघारा ॥ नाळ लागलि विजयदुर्गाला । दर्यांजग जोसात चालला ॥ आला विजयदुर्ग बदरीं । दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या पारीं ॥ दिलि सलामि दुर्गानें त्याला । किल्लेदार सामुरा आला ॥ उतरे आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—७—

मेव्यान् मेटें, हुड्यान् हुडा फिरले सर्खेल आंग्रे धनी । केलि दुर्गांची पाहणी ।। तपासुन बगालिं समादिं दारुगोळ्याचिं कोठारें । तोफजि बोलावले सामुरे ।। दिलि ताकिद, इंग्रज नाहिं टिकावा किल्ल्याम्होरे । अचूक ऐसे साधा मारे ।। लाहि फोडुन माघारा फिरवा गनिमाला । पोशाक जरबाबी तुम्हांला ।। बोले मग आंग्रा आमारि सुभेदाराला । दावा दर्यावन्ति आम्हांला ।। जहाजात जहाज नूरेल्बहार होतें अघाडिला । त्यानें सलामि दिली आंग्र्याला ।। दे सलामि अवघें आमार । वाजलिं भाडिं नाहिं सुमार । झांकलिं जहाजें इतका झाला धुर । जबर दर्यावन्ति आमार ।। खलाशि खार्वि, कोळि, गाबिद । होते दर्यावन्तीवर ।। तुरुक, अरब दर्याझुंजार । होते दर्यावन्तीवर ।। सराइत उपरकरी, हेटकरी । होते दर्यावन्तीवर ।। सुर्वे, मुणगेकर, जावकर । शूर आमारी सर्दार ।। पाटकर, पाटील, भीवदे । दर्यावरले अंमलदार ।। बिर्जे, गजने, तोडणकर । कीर हुकमाचे नोकर ।। आंग्रा जहाजा जहाजावर गेला । भेटला आमारी लोकांला ।। दुर्गांवर इंग्रज वाण्याचा डोळा । औस्तात् येउन घालिल घाला ।। इंग्रज नाहिं टिकावा किल्ल्याम्होरे । लाग माग रोखा सारे ।। मार देउन घालवा गनिमाला । पोशाक जरबाबी तुम्हांला ।। सांगे आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ।।

—८—

गोळा घेउन हिकडे वकिल गेला ममइला । भेटला बूनइंग्रेजाला ।। गोळा म्होरे ठेउन जबाब आंग्र्याचा कळविला । बोले तयार आंग्रा झुजाला ।। बून इंग्रज म्हणे माजा बेत पहिला काइम । उरकु घेरियांचि मोहिम ।। अव्वल जाउन आपला बावटा लावुं घेरियाला । जवर वार्ता नाहिं आंग्र्याला ।। घेरिया किल्ला येतां आपल्या कबजाला । होइल आंग्रा लुला पांगळा ।। कुलाब्यावर्ता औस्तात् घालुं मग घाला । बेडि ठोकुन आणुं आंग्र्याला ।। केला हुकुम कामोढोराला ।

१ घेरिया=विजयदुर्ग. याला परकीय लोक ' घेरिया ' म्हणजे गिर्ये गावचा किल्ला म्हणत.

२ कामाढोर=कॉम्मोडोर. ( आमारी काफिल्यावरचा अधिकारी ).

केला हुकुम कप्तान लोकांला । केला हुकुम गोलदाजाला । जावें घेरिया किल्ला घ्यायाला ॥ सजले इग्रजाचें आर्मार । दीडशें तोफा आर्मारावर ॥ तीनशें तोफजि आर्मारावर । सवा हजार खलासि लढणार ॥ दीड हजार काळें लष्कर । अडीच हजार गोरे झुंजार ॥ निघाले घेरिया किल्ला घ्यायाला । किनारा चार कोस दूर राखिला ॥ पांचव्या दिवसाच्या रामपारीं । आले घेरियाच्या नस्ताला ॥ कामाढोरानें किल्ला पाहिला । भर दर्यांत वरवा केला ॥ निरोप किल्लेकऱ्याला धाडिला । करावा किल्ला आमच्या हवाला ॥ लढाइ होइल वेडेपण । साधावें जल्माचें कल्याण ॥ निरोप आंग्यानें ऐकिला । जबाब कामाढोराला धाडिला ॥ निरोप किल्लेकऱ्याला काशाला । आहे गिर्यांच्या किल्ल्याला ॥ हजर आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—१—

आइकलि खबर, आंग्रा हजर घेरिया किल्ल्याला । कामाढोर चपापला ॥ गुपित बेत आमचा कसा ठावा झाला आंग्र्याला । दिसतो सैतान अनुकूळ त्याला ॥ असोत अनुकूळ त्याला असे साडेतीनशें सैतान । बावटा किल्ल्याला लाविन ॥ धरुन आंग्रा त्याला आधिं चाबकाखालिं झोडिन । न्हेइन ममईला बांधुन ॥ करु मुलुखगिरी तागडि म्होरे दावुन । घालुं थ्रियमीला पालाण ॥ आम्हि इग्रज उद्मि जेवलों समद्यांच्या बारशाला । आंग्रा कंच्या झाडाचा पाला ॥ बावटा चढाइचा चढविला । नांगर आर्मारनिं उठविला । तराण्डें देफाय्-च्येस बिन्दिर्ली । हिंगुंळ, हांकें मागल्या बाजुला ॥ चाललिं हांतरें, रिवार्ज तारवें । सूड आंग्र्याचा घ्यायाला ॥ वीकतुरी, फ्येम गलबतें । निघालिं किल्ला जिंकायाला ॥ आलिं किल्ल्याच्या वाऱ्याला । गोळा किल्ल्यावर टाकिला ॥ लागला भोंत्रीच्या टिक्शीला । टिक्शि उडवुन पार झाला ॥ दुसरा गोळा जो टाकिला । लागला माडाच्या शेंड्याला ॥ शेंडा कड्कडा मोडला । पर्शा भण्डारी कोपला ॥ बोले आऊत हातिं घेउन । तोडिन गनिमाची गर्दन ॥ पडले फोकटे जेवढे पोइचे ।

---

३ डिफायन्स. ४ बिनी ५ ईगल. ६ हॉक् ७ हटर ८ रिव्हेन्ज. ९ व्हिक्टरी. १० फेम.

पाडिम मुडदे दुस्मानांचे ॥ उगारुन आऊत धावला । राव आंग्यानें पाहिला ॥ फुकाचा बळी पडेल गोळ्याला । अडवा ! अडवा ! त्या वेड्याला ॥ बोले आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—१०—

तोफजि आंग्र्याचे तयार होते बुर्जाबुर्जावर । भरुन भांड्यांमधीं बार ॥ उत्तरच्या तोफजिनीं पाहिले इंग्रजाचे मनवर । वाघोटणेच्या तोंडावर ॥ दोन गोळे इंग्रजाचे नाहिं झाले कारगर । त्याचा म्होरें आला येल्गार ॥ तोफजिनीं पाहिलें माऱ्यांत आलें इंग्रजाचें आर्मार । डागल्या तोफा पहेदार ॥ झालि सलामि, जुंपलि लढाइ इंग्रज-आंग्र्यांच्या तोफांची । जैशी पंचानन—व्याघ्रांची ॥ गडगडे, जोंवे, माजला धूर, पडला अंधार । चाले तोफांचा भडिमार ॥ खालुन तोफ इंग्रजी बोले । खाडिंत आर्मार इंग्रजी डोले । वर्तुन येलि आंग्र्याचे गोळे । कामाढोर चोळितो डोळे ॥ दोन तावांच्या डोल्काठ्या । मोडल्या आंग्र्याच्या गोळ्यांनीं ॥ कड्कडुन पडल्या पाण्यांत । उडालें उसळुन वरतें पाणी ॥ एका जहाजाचीं औजारें । झालिं फाटुन चिन्ध्यांवाणी ॥ खलाशि पस्तिस झाले ठार । रंगले रणपोत असुदांनीं ॥ जोर कान्होजि आंग्र्याचा मार । करी चिन्ता कामाढोर ॥ युगुत काढलि कामाढोरानें । मारा करित घुसूं जोसानें ॥ गांठुन बेगि बेगि बंदर । उतरु पाइक घोडेस्वार ॥ करु काबिज किल्लेदर्वाजा । पकडु चांच्यांचा हा राजा ॥ केला हुकुम कप्तान लोकांला । चला बन्दर कबजांत घ्यायाला ॥ फणशि औंबलि तोफा लावुन । म्हाउंदे दर्वाजा रोखुन ॥ पळेल आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

—११—

मारा करित आर्मार आलें इंग्रजाचें बंदराला । लागलें उतराया फौजेला ॥ गोळ्यामागुन गोळा वर्तुन आंग्र्यानें टाकिला । गुमान त्याचा नाहीं केला ॥ घोडा, राउत, पाइक मिळून दोनशें लागले कांठाला । लागले आणिक उतरायाला ॥

---

११ प्रिन्सेस ॲमेलिया

उतरतो इंग्रज बघुन क्रोध आला आंग्र्याला । डोंब आगीचा ओतिला ॥ बुडवल्या होड्या, पाजळें खारें पाणि फौजेला । केला दोनशांचा शेणकाला ॥ आलि दर्यावन्ति मारा करित त्याच वक्ताला । होति न्होकुन आडोशाला ॥ विजयदुर्ग उजव्या बाजुला । दर्यावन्ति डाव्या बाजुला । टाकति गोळ्यामागुन गोळा । मधिं इंग्रज जळचर गावला ॥ त्याचि गोळ्यांची बसांत । झालि कुचकामी वेळेला ॥ सवा हजार खलाशि लढणार । झाले कुचकामी वेळेला ॥ दीड हजार काळें लश्कर । झालें कुचकामी वेळेला ॥ अडीच हजार गोरे झुंजार । झाले कुचकामी वेळेला ॥ आलि दर्यावन्ति धांवुन । भिडाया इंग्रजाच्या जहाजांला ॥ दर्याजंग चाले बिन्दिला । नूरेलबहार मागल्या बाजुला ॥ हांक, हिंगूळ गांठिले । मारा होक्यांचा तो केला ॥ चढले जहाजांवर भरभर । जैसे रानांतले वांदर ॥ सराइत भण्डारी रणशूर । मारलि मर्दांनीं तलवार ॥ केलें खलाशांचें शिकांण । घेतलें इंग्रजाचें निशाण ॥ बधे आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

## —१२—

हरले उपाय, सुचेना विलाज कामाढोराला । ढवळा बावटा दाखविला ॥ नरमाइचा निरोप धाडला राव कान्होजि आंग्र्याला । सुखानें जाउं द्यावें आम्हांला ॥ कुपनिचे बन्दे आम्हिं हुकमाचे नोकर । तहाचा नाहिं आम्हां अक्त्यार ॥ जहाजांतला देतों बतेला एक तुम्हांला । सुखानें जाउं द्यावें आम्हांला ॥ बोले आंग्रा तुमचा बतेला नलगे आम्हांला । सुखानें जाउं देतों तुम्हांला ॥ करावे घोडे तुमचे अबलख आमच्या हवाला । सुखानें जाउं देतों तुम्हांला ॥ धूळ फुकित आमच्या मुलखाला । खासा बून नाहिं कसा आला । सांगा निरोप बून खाशाला । भुकेला आंग्रा तुझ्या भेटिला ॥ घोडे इंग्रजाचे घेतले । सुखानें इंग्रज जाऊं दिला ॥ पटेरा इंग्रजाचा बावटा । जामदारखान्यांत ठेविला ॥ कडीं सोन्याचीं वांटिलीं । पोशाक जरबाबी लोकांला ॥ लढाइंत पडले जे झुंजार । त्यांच्या माणसांचा समाचार ॥ घेतो कान्होजी सांवळा । दिलासा कुल् फौजेचा केला । कागद साताऱ्याला धाडिला । शाहुमहाराज संतोषला ॥ नांदे साळकाईकांठाला॥ कोंकमकुसरीच्या राइला ॥ तळेकोंकणचा शाहीर । कुशा केसू गिर्वणकर ॥ त्याचा

संबळ वाजला । पोवाडा आंग्र्याचा गाजला ॥ कृपा पर्शुरामदेवाची । फत्ते कान्होजी आंग्र्याची ॥ गाजे आंग्रा कान्होजीराव । शाहुराजाचा उमराव ॥

---

# इन्द्रोजी कदम.

१५ ता ११३८

कोठें अखण्ड जयघोष महोदधींचा !
कोठें प्रलाप मदपूरित ओहळांचा !!
कोठें सुवर्णनगकान्ति मनोभिरामा !
कोठें शरद्घनततींवरला मुलामा !! १

लोकीं विशेष तरिही उथळां खळाळी !
तैशीच औट घटिच्या विभवा झळाळी !
गंभीर विस्तृत उदात्त मनें जयांचीं
अत्यन्त भिन्न जगतीं चरितें तयांचीं. २

श्रीशाहुला स्वविभवें दिपवावयाचा
हेतू मनीं कदम एक धरी सुख्याचा;
वाटे अविन्धचरणां नमिलां न लाज;
बन्दा कदीम ' अभिधा परि ' इन्द्रराज ' ! ३

तो तुच्छ बान्धव गणी अपुले मराठे,
त्या वन्दनीय शिवभूपहि निन्द्य वाटे !
स्वातन्त्र्य त्यासि न रुचे, न रुचे स्वराज्य !
त्या ' पातशाहि चकती ' गमली सुराज्य. ४

दास्यार्जित स्वविभवें प्रभुवैभवाला
झाला उतावीळ मनीं दिपवावयाला !
कार्यें त्वरें म्हणुनि लावुनि सर्व विल्हे
आले सुपें परगण्यांत मशारनिल्हे ! ५

शाहूस वृत्त कळलें, नृप तुष्ट झाला,
प्रेषी सुप्यांत मग सत्वर हेजिबाला;
हेजीब फेंकित निघे भरधांव वाजी
दावी त्वरा उचित ती नृपराजकाजीं. ६

होती घरांमधुनि लागत सांजवात
जाऊनि तो तव जवें थडके सुप्यांत.
आयास लेश न तिथें पडले तयाला
इन्द्रोजिचें सदन तें हुडकावयाला. ७

अस्वस्थ अश्व अवनी करिती विदीर्ण,
हत्ती उभे फडफडां हलवीत कर्ण,
तंबू सुशोभित सभोंवतिं जागजागीं
इन्द्रोजिचें सदन शोभत मध्यभागीं. ८

आदर्श-दीपक-विभूषित शामियाना
जो भासला मयसभाच सुपेकरांना !
साख्यासनीं कदम तेथ विराजमान
नेचा करीं धरुनियां करि धूम्रपान ! ९

दे येउनी खबर सेवक तोंच त्याचाः—
" बाहेर थैलिसह हेजिब राजियांचा ! "
इन्द्रोजि ती खबर ऐकुनि तुष्ट चित्तीं,
बोले परी वरुनि दावित भिन्न वृत्ति ! १०

" शाहींमधीं उभयही वसतो सलूख,
केला म्हणूनि जवळी अपुला मुलूख;
येथील वास मम दुःसह राजियांना,
झाला गमे म्हणुनि हेजिब हा रवाना ! ११

आम्हांस येथ करणें न फिसाद फन्द,
कां भीतिचा मग मनास शिवेल गन्ध ?

जा हेजिबास तर सत्वर आत आणा !
या पाहुं काय लिहितो मज शाहुराणा !" १२

लावी वदून इतुकें नलिका मुखाला,
मारूनि एक झुरका पसरी धुराला !
केले व्यवस्थित तयें मग कण्ठहार,
येवोनि होय नत हेजिब तों समोर. १३

स्वीकारिला स्मितलवें मुजरा तयाचा,
योग्य स्थळीं बसविला जन राजियांचा;
थैली खुली करुनि वाचुनि पत्र पाहे,
इन्द्रोजि नेत्र मिटुनी क्षणमात्र राहे. १४

"आलें समीप चिरवांछित तेंच !" बोले,
वाची पुन्हा लिखित तें उघडून डोळे;
पाहूनियां वर म्हणे मग हेजिबाला,
"जावें उद्यां परत घेउनि उत्तराला." १५

होतांच भोजन बसे जमवून मन्त्री,
सल्ला तदीय मिळवी तितुक्याहि रात्रीं !
जेणें मिळेल यश, राहिल आबदाब,
त्यानें नृपाप्रति असा लिहिला जबाब. १६

"पाचारिती मजसि भेटिस शाहुराजे,
मालीक मोंगल परी महशूर माझे,
जोडीन त्याविण दुज्यांपुढतीं न हात,
भेटेन माफ जरि होइल कुर्निसात. १७

सीमेवरी करुनि बन्द सदा नगारे
सातारियांत शिरती सरदार सारे,
सर्दार मी, परि न नौकर राजियांचा,
सैदोन बन्द अपुला न करावयाचा" १८

घेऊन पत्र परते नृपदूत मार्गे,
थैली नृपापुढतिं ठेवुनि वृत्त सांगे;
ऐकूनि तें, नृपति वाचुनि उत्तराला,
बोले " धन्यास्तव खरा अभिमान याला ! " १९

इन्द्रोजिच्या करुनि मान्य अटींस दोन्ही
भूपाल त्या कळवि " भेटिस या निघोनी. "
मावे न हर्ष गगनीं मग इन्द्रजीचा,
केला तयें त्वरित बेत निघावयाचा २०

न्यारें यदीय चमके नयनांत पाणी
घोडा असा चपल सुन्दर कोचलाणी;
त्या चांदिचे प्रथम मारुनि नाल झाले,
इन्द्रोजिराव नटुनी थटुनी निघाले ! २१

हत्तीवरी ध्वज पुढें हिरवा फरारे,
हर्षे हयांवरुनियां झडती नगारे;
सैदोन शब्द अपुला घुमवीत गाजे,
वाजन्त्र, शिंग, करणा, सरफाहि वाजे ! २२

ताशावरी कडकडे द्रुत मन्द चाल,
नाचे तसा पटु-तुरंगम कोतवाल;
डौलें बिनी धरुनि बन्दुक दाट चाले,
मार्गे किती मिरवती करवाल भाले ! २३

स्वारींत त्या जन असा नव्हताच कोणी
ज्याचें शरीर न विभूषित भूषणानीं;
हा थाट यापुढतिं या दिसणें न ठाया
आले त्वरें म्हणुनि गांवकरी पहाया. २४

खुर्दा पुढें उभळि नौकर माहरूण,
ये मागुनी धरुनि जाफर सूर्यपान,

इन्द्रोजिचा मधुनि चालत कोचलाणी
ग्रामस्थनेत्र दिपले कद्मा बघोनी. २५

मन्दील भर्जरि शिरीं कलगीतुऱ्याचा,
कर्णीं झुले चवकडा सित मौक्तिकाचा,
अंगीं झगा किरमिजी खुलला तमाशी,
पायीं विजारहि तशी किनखापि नामी. २६

माणीक, नीलमणि, लीलम, मोतिं, याचे
वक्षस्थळीं रुळति हार सुढाळ साचे;
शोभे हिरेजडित अगठि अंगुळात,
तेजस्वि हेमवलयें हलती करात. २७

स्वारी अशी क्रमित मार्ग ससैन्य चाले,
मुक्काम सात तितुक्याहि पथांत झाले !
शेखीं तया दुरुनि दुर्ग अजींक्यतारा
होऊन दृश्य सुचवी जवळी सतारा. २८

माळावरी तळ दिला नगरानजीक
राजाकडे प्रथम धाडुनि दूत एक,
होती उतावळ जरी कद्मास मोठी,
झाला तृतीय दिन मुक्रर भेटिसाठीं ! २९

विश्रान्तिमाजि पहिला दिन घालवून
तो सिद्धता करि दुज्या दिवशीं झटून !
“ मार्गांतला सकल थाट फिका पडावा,”
बोले, “ नवा लखलखाट असा दिसावा ! ” ३०

पोशाख भर्जरि दिला निज सैनिकाला
अंगावरी जड जवाहिर घालण्याला.
घे आपणास्तव असा निवडून साज
ज्या पाहतां दिपुनि जाइल शाहुराज ! ३१

आला अखेर दिन इष्ट मुलाखतीचा
उत्साह वाढवित उत्सुक इन्द्रजीचा!
झालें तयार नटनागर सैन्य सारें
झाले सुरू गमनसूचकही नगारे! २२

शृंगारिला बहुपरी हय कोचलाणी
भांगारमण्डित मनोहर भूषणांनीं;
आरोहणा करि तयावरि इन्द्रराज
अंगावरी अखिल घालुनि दिव्य साज. २३

चाले अपूर्व अपुला मिरवीत थाट
सैदोन शाहुनगरातुनि वाजवीत!
श्रीमन्तिनें चकित नागर लोक केले,
मार्गांत राव पुतळ्या उधळीत गेले! २४

वाड्यापुढें सकल जों समुदाय आला
ताकीद दे कदमराव नगारजींला;
"तोडीन हात जरि लेश पडेल खण्ड
सैदोन वाजवित येथ रहा अखण्ड!" २५

सौधप्रवेश करुनी सदरेंत गेला,
इन्द्रोजिराव नटवा निरखी सभेला,
तेथें तयास दिसले रणधीर नामी
जो बादशाहि चकती धरिती लगामीं! २६

कैलाससा धवल तो दरबार सारा
यत्कीर्तिचा चहुंकडे झडतो नगारा!
जैसा सुवर्णकमलावरि राजहंस
सिंहासनस्थ नृप तेथ कुलावतंस. २७

इन्द्रोजिला बघुनियां दिपला न राजा
इन्द्रोजिराव दिपला परि राजतेजा!

तेजासि त्या जरि न जोड जवाहिराची
राजर्षि शाहुवरि दृष्टि ठरे न त्याची ! ३८
येतां अतर्कित तयावरि ही विपत्ति
झाला अधोवदन तो शरमून चित्तीं !
सैंदोन तों फुटुनि बंद पडे तयाचा,
तेणें उडे अधिक गोंधळ तन्मनाचा ! ३९
दास्यार्जित स्वविभवें प्रभुवैभवाला
आला उताविळ मनें दिपवावयाला;
होतां अकल्पित परी उलटाच डाव
कर्तव्यमूढ मणिमण्डित इन्द्रराव ! ४०
बैसावया नृप तया करि खूण हातें
संकेत तो नच परी कळला तयातें.
"व्हा आसनस्थ !" मग भूप तयास बोले
होता उभा थिजुनि तो तरिही न हाले ! ४१
त्याचा तदा चतुर नौकर मागहून
त्यातें हळूच करि सावध हालवून;
पाहे वरी वळवुनी निज दृष्टि राव
ये प्रत्यया फिरुनि तों प्रभुचा प्रभाव ! ४२
आता तदीय हृदयीं पडला प्रकाश
कर्तव्यमार्ग सुचला रुचला तयास,
चित्तीं म्हणे "मणिगणाविण जो सतेज,
तो वन्दनीयचि मला प्रभु शाहुराज !" ४३
गेला उडून लटिका अभिमान त्याचा
झाला पुढें करुनि निश्चय तो मनाचा
तक्तापुढें सकलही उतरून लेणें
केला नृपालचरणीं प्रणिपात तेणें ! ४४

---

# तारापुरचा संग्राम

“ तुडुम् तुडुम् हा झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
मर्द मराठे ! उठा ! उठा तर !
गर्जत ‘ हर ! हर ! ’ चला करा सर
बुलन्द बांका गड तारापुर ! १

तीन बाजुंला खन्दक खोल,
चवथ्या बाजुस पाणी लोल;
आंत जिवांचें घ्याया मोल
उड्डाणोत्सुक आयस गोल !
भय न तयाचें तुम्हास तिळभर
आद्यशक्तिचे तुम्हीं किंकर,
उठा ! करा सर गड तारापुर ! २

धर्मरक्षिका माराष्ट्रांची
प्रसन्न अंबा तुम्हां साची;
वर पुण्याई शिवरायांची
भीति न उरवी फिरंगियांची !
सैतानी औलाद भयंकर
कहर उडवितें करुनि इथें घर
करा तिचा सर गड तारापुर ! ३

अर्यरत्नांची तमा कुणाला ?
कचदिल पापी नादानाला !

अर्थशास्त्राची तमा कशाला
शिवशाहीच्या रणमर्दाला ?
सुल्तानी जे धर्म जगावर
अन्य धर्म ज्यां सह्य न पळभर,
गुलाम त्यांचे चिरा चराचर ४

महाराष्ट्रसद्धर्मरक्षणीं
वेंचुनि गेले तनु मन वाणी,
बघति तुम्हा ते पूर्वज वरुनी
दावा त्यां पुरुषार्थ करोनी !
पहावया हा अपूर्व संगर
वर वर चढतो नभीं दिवाकर !
मर्द मराठे ! उठा ! उठा तर !" ५

* * * *

खाडीमधल्या माडीमाजी
सूत्रधार रणधीर चिमाजी,
असंख्य त्याच्या ताबिन गाजी
" करूं अरीची " म्हणती " भाजी ! "
पवार, शिंन्दे, शूर होळकर,
फौजबन्द सर्दार मातबर
एल्गाराला उठले सत्वर ! ६

एकामागुनि एक अन्तरें
सुरंग नामी उडती सारे,
बन्द गढाचीं दोन्ही द्वारें
तटास पडलीं परि खिण्डारें !
हालु लागला गर्जत 'हर ! हर !'
मराठियांचा सेनासागर
डुबवायाला गढ तारापुर ! ७

सुरंगनिर्मित दारीं दारीं
निघे घुसाया सेना सारी;
गनिमाचा परि मारा भारी
करुनि करामत दावी न्यारी !
वरुनि कोसळे आग भयंकर
थबकुनि बोले मराठि लष्कर,
" अजिंक्य बांका गड तारापुर ! " ८

तुड्डुम् तुड्डुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा !
चढलें तेणें स्फुरण अनावर
गर्जत चाले पुनरपि लष्कर
करावया सर गड तारापुर ! ९

खन्दकांवरी सांकू पडती,
त्यांवरुनी रणधीर धांवती !
किती अधोगति जाता घेती
तसेच परि सांवरुनी उठती
गर्जत ' हर हर ! जय हर शंकर ! '
माराष्ट्रांचें धांवे लष्कर
करावया सर गड तारापुर ! १०

गाडी बिनीचे हिंमतदार
क्षणांत झाले खन्दकपार !
सुगम न एकहि परि खिण्डार
वर्षति गोळ्या तिथें अपार !
अगणित होके उडति भराभर
ओतित राहे आग निरन्तर
बुलन्द बांका गड तारापुर ! ११

गोळ्यांची त्या तमा कुणाला ?
कचदिल पापी नाशनाला !
होस्यांची त्या तमा कुणाला ?
पिण्डचि ज्यांचा गुलाम त्यांला !
        शाण्णव कुळिंचे समरधुरन्धर
        खिण्डारांतरि घुसले सत्वर
        करावया सर गड तारापुर ! १२
करीं घेउनी फिरंग नंगी
धावत आला मस्त फिरंगी !
खिण्डारीं रण माजवि जंगी
ख्रिस्तगुरूचा चेला ढंगी !
        तळहातावर घेउनियां शिर
        लढे फिरंगी, दावी क्षणभर
        अजिंक्य बाका गड तारापुर ! १३
तुडुम् तुडुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !
        भगवा झेंडा उडे फरारा
        एल्गाराचा देत इशारा !
        तळहातावर घेउनिया शिर
        लढति भवाचे भगवे किंकर
        करावया सर गड तारापुर ! १४
फिरंगियाचा तुटरे ताठा,
हटे न मार्गे मर्द मराठा !
असेल ज्याचा सन्त करण्टा
अपेश त्याचा ठरला वांटा !
        रणांत पडले किती वीरवर,
        खिण्डारीं तरि झुंज मातबर;
        बुलन्द बांका गड तारापुर ! १५

उपाय सारा करी अपाया
सीमेपरतें माणुस जायां!
तरीहि ईर्ष्या मनीं शिपायां
भगवी दीक्षा गडास द्याया!
इरेस आलें मराठि लष्कर,
तटास लावुनि शिड्या भराभर
झटे घ्यावया गड तारापुर! १६

करावयाला मर्दांमर्दी
शिड्यांवरोनी झाली गर्दी!
शिड्याच लोटुनि तों रिपु दर्दी
खचवि मराठी हिंमत अर्धी!
"विजयवन्त नित सन्त झेवियर!"
फिरंगियाचें गर्जे लष्कर,
"अजिंक्य बांका गड तारापुर!" १७

तुडुम् तुडुम् तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा!
भगवा झेंडा उडे फरारा
एल्गाराचा देत इशारा!
चेव येउनी उठले बेडर
शिवशाहीचे ढंबर हंबिर
करावया सर गड तारापुर! १८

समर्थ गुरुचे समर्थ चेले,
एल्गाराला तयार झाले!
बर्कन्दाजी दुरुस्त चाले,
फिरंगियाचे फिरले ताले!
रक्षुं शकेना सन्त झेवियर!
धुतोड दुस्मन् मरुनि भराभर
शिडी लागली पुनरपि सत्वर! १९

निशाण भगवें घेउनि हातीं
चढे तटावर एक पदाति;
लागुनि गोळी परी ललाटीं
गतप्राण तो पडे खालतीं !
        चढले दुसरे जंगबहाद्दर
        ठरे न एकहि तरी तटावर
        बुलन्द बांका गढ तारापुर ! २०
मर्दांने बहु आले कामीं
क्षणभर पडली शिडी रिकामी !
गाजवावया तोंच मर्दुमी
धीट धारकरि उठले नामी !
        उदार होउनि निज जीवावर
        चढुनि तटावर करिती सत्वर
        भगवा दीक्षित गढ तारापुर ! २१
ढालेवरतीं झेलित गोळी
काबिज केली प्रथम सफेली !
ढालेवरतीं झेलित गोळी
गढांत शिरले उतरुनि खालीं !
        गनिमाला तव चिरुनि चराचर
        खिण्डारांतुनि घुसलें लष्कर
        करावया सर गढ तारापुर ! २२
आंतिल मेढेकोट फोडिला,
उगारला अरि सर्व तोडिला !
जवामर्दिनें बुलन्द किल्ला
फिरंगियाचा काबिज केला !
        विजयानन्दें गर्जे लष्कर
        " असो कितीही पसद्द मातबर,
        दशा अखेरिस हीच तिची पर ! " २३

जासुद सुटले कळवायाला
छत्रपतींला, श्रीमन्तांला,
" धर्मद्वेष्टा कटुनी मेला,
स्वामींच्या यश तलवारींला !
भगवा झेंडा धरुनि शिरावर
शिवशाहीचा बनला किंकर
बुलन्द बांका गड तारापुर ! " २४

---

# मस्तानी

—:—

मुठानदीच्या तटीं दुमजली विशाल थाटाचा
वाडा शोभे शिवशाहीच्या प्रधानपन्तांचा.
दिवाणखाना एक सुशोभित त्यांत कलन्दानी,
लावण्याची तिथें दीपिका माशुक मस्तानी.
गिळितां व्हावा ताम्बूलाचा रसहि दृश्यमान
नाजुक इतुका कण्ठ मुलायम तनु गोरीपान.
मोहक गहिरी नजर नाचरी नित पाणीदार,
आणि अमेच्या काळोखाहुनि काळा कचभार.
विरक्तांसही अनुरक्तीचे दास करी वाणी,
प्राणांहुनिही प्रधानपन्तां प्यारी मस्तानी !
वाहत होतें आज तिच्या परि नयनांतुनि नीर,
सोडित होती दीर्घ उसासे ती वारंवार !
श्रीमन्तांसह विलास केले जेथ तिनें नाना
महाल झाला तोच आजला तिज वन्दीखाना !
दुरावले प्रिय रमण तियेचे प्रधान रणशूर,

दुरावला समशेरबहाद्दर सुत चिमणा वीर !
परिवारातिल सखी न सन्निध जीवाभावाची,
आंत एकटी चित्तचोरटी प्रधानपन्तांची !
हालचालिवर तिथें तियेच्या जरि नव्हते हेर,
द्वारीं द्वारीं खडे पहारे बसले बाहेर !
दिवस जाउनी रात्र पसरली भूमितलावरतीं
शोक करित सरुदार सुन्दरी तरि पडली होती !
दिवा मिणमिणा एक लागला तिच्या महालांत,
पडलें येउनि आणि निवाल्या अन्नाचें ताट !
अवलोकुनि तें, छताकडे ती लावुनियां डोळे
खिन्नपणें नवनीतकोमला मस्तानी बोले:—

"उगीच आतां कशास आशे, पाडिसि मज भूल ?
काय न झाला अजुनि पुरेसा घातक तव खेळ ?
उचल चित्रपट मोहक अपुले अग्नीवर घाल !
भस्म तयाचें चचुंनि अगीं राहिन चिरकाल !
नाजुक चरणीं मरण यावया उत्सुकता ज्याची
पसरूं नको तीं पर्थी अतःपर फुलें गुलाबाचीं !
प्रेमपुरींतिल राजमार्गही भरले कांट्यांनीं
जगा वंचिसी त्या काट्यांवर गुलाब विखरोनी !
रंग चारुतर, सुवास मधुतर जया गुलाबाचा !
तीक्ष्णपणा अधिकचि त्याखालीं लपल्या कांट्याचा !

"आशेला तरि वंचक म्हणुनी कां द्यावा दोष ?
अजुनि वंचना तिनें न माझी केली लवलेश.
फसवी प्रीती—छे ! तिजला तरि कां द्यावा दोष ?
मजसाठीं तर तिनें जिंकिला माझा हृदयेश !
प्रथम दर्शनीं पन्नानगरीं उद्भवली चित्तीं,
ठाउकही मज नव्हतें तेव्हां नांव तिचें 'प्रीति'

अहा ! अजुनि रमणीय चित्र तें नवख्या प्रीतीचें
जुनेंच तरिही नित्य नव्यानें दृष्टिपुढें नाचे !
“ प्राशित होती ‘ द्रवमय माणिक ’ सोनेरी सांज
अंगावरतीं चढवुनि सारा सोनेरी साज !
सोनेरी किरणांत तियेच्या चमकावित भाला
दिल्दर्या, दिल्पाक मोहरा दख्खनचा आला !
आला होउनि काठेवाडी वारुवरी स्वार,
संगें होते मोहबतींतिल बावन सर्दार !
शर्थ करुनि रणमस्त जिरविला घजन्फरेजंग
भगवा बाणा मिरवित आला हिरवा रणरंग !

शोभिवन्त सर्पेच शिरावरि, गळयांत मणिहार,
अंगीं हिरवा निमा, पांढरी पायीं सुर्वार,
लाल मियानीं कटीस लटके फत्ते करवाल
रणिं इस्माइल, शम्स जगींचा दख्खनचा लाल !
दर्शनमात्रें आनन्दाला येउनिया भरती
कृतज्ञ पत्नानगर तयावर उधळी मणिमोतीं !
झरोक्यांतुनी पाहत होतें प्रमुदित नयनांनीं
सतेज माणिक मीहि तयावर दिधलें उधळोनी !

तेंच नेमकें जाउनि त्याच्या अंगावरि पडलें
मणिहारीं अटकून शेवटीं हृदयावर ठरलें !
पाहे मज साहेब पेशवा वर करुनी नयन,
लाजुनि गेलें ! परी विसरलें झांकाया वदन !
चित्त थरकलें ! अपूर्व कांहीं स्पर्श करी त्याला !
अपूर्व संवेदना राहिल्या व्यापुनि हृदयाला !
बेमालुम मुल्खांत दिलाच्या शिरुनि अकस्मात
गाउं लागला गझल मुशाफर वासन्तिक वात !
गझल तयाची जादु आपुली उधळी भंवतालीं

जादूतुनि त्या प्रीति गुलाबी जन्माला आली !
भीरु लाजरी म्हणुनि बैसली हृद्‌बागीं लपुनी
चुगली केली परि गालांनीं चहाडखोरानीं !
परस्परांना खुणवुनि माझ्या धूर्त सख्या कांहीं
हांसुं लागल्या, कळुनि मला तें तरि आलें नाहीं !
विनोदतत्पर सखी अमीना मग पुढतीं सरली,
हलवुनि मजला हांसत हासत विनोदपर वदली

'मघांच गेला निघुनि पुढें प्रिय सुहैल गुल्जार !
मार्गी आतां काय निरखिते नादी गुल्नार ?'
स्पर्श तिचा करि जागृत माझें निजलेलें भान !
शब्द तिचा करि जागृत माझे निजलेले कान !
कळून आलें भारुनि गेला नजर पुरी माझी
वजीरजादा, वजीर उमदा, बाजी रणगाजी !

"सरतां पुढतीं मैफलींत मी गायाला गान
छत्रसालजींसमीप दिसला माझा दिल्जान !
बावरलें मन, वर्तनही मग विचित्र ये घडुन,
अभिनय चुकला, आणि जाहली कंपाकुल तान !
सोडुनि अर्धे बुन्देल्याचें प्रिय चम्पतगीत
प्रेमगीत अभिजात राहिलें नकळत मी गात !
न कळे पडला काय दिलाशीं बोलांचा मेळ,
गान रंगलें, सभा दंगली, निभावली वेळ !
उधळु लागले विविध बक्षिसें बुन्देले वीर
मन्त्रमुग्ध परि होउनि राहे माझा सर्दार !
चमकत होते अश्रु तयाच्या तेजस्वी नयनीं
चरखारींतिल चारु हिऱ्यांचें लाजवुनी पाणी !
कल्पनाहि मज नव्हती गायन होइल परिणामी,
तें तर नयनीं करी प्रियाच्या अश्रु उभे नामी !

त्या अश्रूंचे बिन्दु गळुनि मग ओघळले चार,
पदकस्थानीं आर्द्र जाहला तेणें मणिहार!
गान सपतां तोच हार मज दे बाजीराज!
दिव्य देणगी मीहि तयाची केली शिर्ताज!

"बुन्देल्यांच्या महाबळींनीं ओपुनि नजराणा
बोलविला जइ बाजबहाद्दर दख्खनचा दाणा,
होउनि आलें मीहि तयाची रूपमती प्यारी!
आयकिलें, मज पाहुनि दिपल्या दख्खनच्या नारी!

मुठानदीच्या तटीं—हाच तो—महाल शनिवार,
इथेंच बसलें मुठींत माझ्या राखुनि सर्दार!
परी होउनी नाचत केव्हां बहार उडवावी
फुलेंच केव्हां हसत तयावर मोदें उधळावीं!

चषकनर्तकी द्राक्षकन्यका आदरुनी थोडी
दावावी प्रियकरास केव्हां गझलाची गोडी!
कण्ठीं बळकट घालुनियां निज बाहूंच्या पाशा
प्रकट करावी कधीं प्रीतिची शब्दाविण भाषा!

भ्रूमध्यीं सप्रेम चुंबुनी मज वारंवार
काढावे प्रियकरें माझिया हे प्रेमोद्गार:—
'जन्नत जगतींतलीं दावितें दिव्य तुझें गान!
गुलिस्तानची परी गुलाबी तूं 'मेरी जान!'

"ऐषमहालीं नवलपरीचा फुलवुनि फुलबाग,
स्वारींतहि जिवलगासवें मज फिरवी अनुराग!
तिथें प्रीतिच्या ढालेवरतीं प्राणान्तक गोळे
झेलुनि विजयी बाजबहाद्दर मीं माझे केले!

"गाठ रेशमी परस्परांच्या प्रीतीला पडली,
मातृपदाप्रत भाग्यें माझ्या मजला चढवीली.
वीरकन्यका, वीरवल्लभा, जननी वीराची,

मानित होतें मजसम ऐशी दुजी न भाग्याची.
मत्सर आला परी आडवा, तो नडतो अजुन,
ताईबाई ! तुझेंच ना हें वद कारस्थान ?
आपा, नाना, पुढें होउनी उडविति जरि वार,
तुझाच मजवरि दिसे तरी हा गैबीचा मार !
ओळखिली तूं अजुनि न पुरती परन्तु मस्तानी,
हें बुन्देली, नव्हे दिखाऊ दख्खनचें पाणी !
यवनकंचनी म्हणुनि नको करूं भलतें अनुमान,
करील ही जिवलगाकारणें जानहि कुर्बान !
वाण सतीचें प्रथम घेतलें होता अनुरक्त,
धमनीमधुनी याहि वाहतें हिन्दूचें रक्त !
रायावरतीं अधिकचि माझी तुझ्याहुनी प्रीति !
सत्य वदाया हवी कशाला आपाची भीति ?
देइल आपा कैदेहुनि या अधिक सजा काय ?
कैदेमध्यें नव्हे तयाच्या ही गोगलगाय !
प्रयाणसमयीं साधिलात जरि करुनि दगा डाव,
पाटसगांवीं वाट पाहतो तरि माझा राव !
हांक तयाची या हृदयाला येते ऐकाया !—
—आलें ! आलें ! विलंब नाहीं मजकडुनी राया ! ''

*         *    .    *         *

बोलुनि इतुकें मूर्च्छित पडली मस्तानीबाई,
दुसऱ्या दिवशीं कुठेंच कोणा परि दिसली नाहीं !
पाटसगावीं मात्र जाहला एक चमत्कार,
श्रीमन्तांच्या भेटिस कोणी आला सर्दार,
तंबूमध्यें श्रीमन्ताच्या प्रविष्ट तो झाला,
भेट घेउनी तिथुनि पुन्हा परि बाहेर न आला !

---

# "सर्खेल सबळ आंगरे!"

शंकर गेले वनात म्हणुनी मनांत गिरिजा झुरे,
वेष घेउनी भिल्लिणिचा मग वनोवनीं संचरे;
सह्याद्रीच्या तळीं उतरली गौरी विरहाकुल
गेन्द गळाले, आणि अश्रुसह नयनांतिल काजळ!
फुलें तयांचीं बनुनि पसरलीं हासत चोहींकडे,
अजुनि पहा या मण्डित त्यांनीं तळकोंकणचे सडे!

पाणियांतल्या पातशहांवर इथें राजकारण,
इथें रंगला दर्यावरला दावा रात्रदिन!
इथें झगडति न घाटावरले कजाग कल्गीतुरे,
कविगीताचे विषय इथें 'सर्खेल सबळ आंगरे'!

अस्मानाच्या घुमटाखालीं दर्या लोळे निळा,
तो विहराया छत्रपतींनीं सर्खेलाना दिला;
तेव्हापासुनि जलसागरां कांपवीत थरथर,
सर्खेलांचे अबलख वारू फिरती दर्यावर!
शिवशाहीचे अनेक सेनासागर जरि भूवरी,
शिलेदार सर्खेल आंगरे एकचि रत्नाकरीं!
दर्यावरला हुशार तर्यां असा न दुसरा कुणीं,
सरंजाम जमविला शहामतपनाह तळकोंकणीं!
अलिबागेंतिल गुलबाईचा प्रसाद धरुनी शिरीं
बजाविती सर्खेल आपुली पाण्यांतिल चाकरी.
करिता गगनीं सन्ध्यादेवी जडिताची लावणी,
जलनिधिलहरींमधुनी मजुळ मोहक उठती ध्वनि,
शाहिर दर्यानूर आपुला सूर त्यात मिळवुनी,
निळावन्तिच्या शृंगाराची गुणगुणतो लावणी;

सर्खेलांचा बीरमाल परि गर्जति कवि कोंकणीं
साळकाइतिल काळडोहिंच्या द्वीपाधांचे धनी;
जिंकुनि पाणी, वाणींतहि सर्खेल फिरति आंगरे
भयें पाळरे बरघाटींचे चावट कलितुरे !
राव कन्हय्या परजित निज समशेर समुद्रावरी
निळावल्लिची करुनि निमाले निष्फळ जादूगिरी;
तरतें, हलतें, फिरवित, मिरवित डोलकाठिचें बन
सखाराम बनबीर पावले विराम करुनी रण !
क्षुब्ध सागरीं कल्पान्तींच्या नाचुनि रुद्रासम,
कल्लोलावरि कोरुनि गेले शंभुसिंग विक्रम !
धीरधिंग रणशिंग वाजवित आले त्यांमागुनी
तुळाराम रणकाम आंगरे ध्वजवृन्दाचे धनी !
निमगोरी तनु, नीटस बांधा, पुरुष भव्य देखणा,
दर्शनमात्रें मूर्तिमन्त ये शौर्याची कल्पना !
शत्रुविनाशक चमके करिं समशेर समरखेळिनी,
व्यापाराच्या स्वामित्वाची वसे वासना मनीं;
रुबाबदारी प्रेक्षकवृत्ती सादर निमिषीं करी,
नांवचि नुसतें परिसुनि धडकी भरे अरीच्या उरीं !
'समुद्रराजा' सहज जयांनीं टाकियला बुडवुन,
आदिलशाहिस पोंचविला शह गोमान्तक जिंकुन,
'मूर' मर्दुनी सलील केली वसई साष्टी सही,
चढुनी धर्मोन्माद भिजविली मानवरुधिरें मही;
फिरगि 'पुतळे आगीचे' ते सर्खेलांच्या भयें
गोव्यामध्यें लपुनि बैसले वार्ता त्यांची न ये !
कृष्णरदाची कृष्णलोचना वृद्ध तरी सुन्दरी,
कुवार राणी झुरुनि निमाली ढवळ्या बेटावरी,
तिचे प्रजाजन सोडुनि अपुली धीवरवृत्ती जुनी,
तराजु घेउनि जग जिंकाया फिरती नौकातुनी !

'नव कुलपांचें तारूं' तयांचें मुंबइचा जंजिरा
वचैस्वाला सदा हांवरा, परि झाला घाबरा !
मुलुख घालुनी अंगाखालीं, बदलुनि अपुले धनी,
शल्य जाहले शिवशाहीला हबशी तळकोंकणीं;
बरा नतीजा देउनि त्याना करुनी दुबळे पुरे,
दख्खनच्या दुनयेंत गाजले तुळाराम आंगरे !
जवामर्दिनें अजनवेली काबिज करितां स्वयें,
आर्त जनांचीं अखिल निवटितां अभ्यस्थानीं भयें,
नवलाईनें नटला जेथें नवलाईचा कडा,
आंख मारुनी भुलवि पाखरा नकटा नट फांकडा !
वाघजाइचा वाघ दुर्गींतिल डुरकत करि पाहरा
फिरत गिरिवनीं, रेडेरानीं, राखी कोतापुरा;
शिरेविरेचे बारा तेरा पाट वाहती जिथें,
ध्वजवृन्दांच्या नव्या धन्यांचें राज्य जाहलें तिथें.
करितां हल्ला रत्नागिरिचा किल्ला झाला सर,
अमात्यसैनिक पळुनी गेले गगनबावड्यावर !
भिलकवड्याच्या भयें पारवा जिथें कपारीं दडे,
कुक्कुटकुंभा कुंभ्यावरुनिच ' तूप ! तूप ! ' ओरडे;
कासाराला अतुल आपुलें दाखवावया बळ,
खर नखरांनीं जिथें फाडिला वाघानें कातळ,
चिंचेचें घनदाट माजलें बन जेथें सुन्दर,
अभिनव यश हें तिथें वर्णिती खेर सदा सादर !
प्रसन्न झाली भार्गव-माता सह्याचलवासिनी,
बसला अंमल सखेलाचा कुल दक्षिण कोंकणीं.
बळ दुबळें हें करावयाची धरिति वासना मनीं
शिवशाहीचे सेवक नाना प्रधानचूडामणि !

---

# आंग्र्यांचें आरमार

दोन बाजुला हुकमी बन्दे शौर्याचे सागर
मर्द खडे यशवन्त, देवगड वाराया चामर;
मध्यें विलसे घेर तिहेरी कोटाचा घालुनी
बांका बर्कन्दाज घेरिया राजा तळकोंकणी !
सर्खेलांची वरी निशाणी पांचजन्य जरि खुले,
ढालकाठिवर शिवशाहीचें निशाण येथें झुले.

झुले खालतीं दर्यावन्ती आरमार तळवटा,
धवल यशाचा स्वस्तिकमण्डित फडकावित बाहुटा !
संगरनौकास्तंभीं हलती सफेत, हिरव्या, निळ्या,
वाऱ्यावरतीं झिळमिळ झिळमिळ आनन्दी झिळमिळ्या.

गलबत, मचवा, फत्तेमारी, मारुनि फत्ते करी
सर्खेलांची दर्यावन्ती यशवन्ती सागरीं !
सावधान तिजवरी सर्वदा रणशौर्यीं आगळे
कर्णधार, तलवारबहाद्दर, भण्डारी आवळे.

वीर जावकर, दूरदृष्टिचे चपल धीट पाजरी,
समरधुरंधर करिति पराक्रम सुर्वे दर्यावरी !
चिरित गहारे, तोडित पाणी नागरिला सागर,
दर्यादौलत करुनि ठेविली बटिक घेरियावर !
वलन्देज बुडवून झोडिले फरासीस फांकडे
प्रतिनौकेवर त्या विजयांचा अजुनि चौघडा झडे !

दर्यावरल्या करुनि उद्दडां रणार्थ आवाहन,
ठायीं ठायीं करिति जहाजें लगमागराखण;
हिंमतगडचा हिंमतवाला कडव्या हबशावरी
नजर अखण्डित जरि 'सावित्रीप्रसाद' राखी पुरी,

कनकदुर्गाची तरिहि ' कालिका ' चालित पिंगा फिरे
हबसाणातिल थरर कांपवित गड किल्ले जंजिरे !
तरते किल्ले फोडुनि पाजुनि हिरवें खारें जळ,
सिन्धूचा दाविला जयानें निळ्या जाकिटा तळ,
जंगी ' फत्तेजंग ' निघे तो सत्वर तिजमागुनी
पाल, गुराबा, घेउनि संगें सुवर्णदुर्गाहुनी;
' बूम ! बूम ! ' भडिमार तयाचा घुमतां दर्याभर,
चळचळ कांपति कभिन्न काळे शिद्दि जंजिरेकर !
चण्ड चण्डिकामाता जाउनि जिथें भुयारीं बसे,
आदिलशाही कौशल्याची साक्ष मशिद देतसे,
तिथें अंजनाहृदयावरतीं पावुनि आन्दोलन,
' पत्ती अंजनवेल ' घालिते रिपुनयनीं अंजन !
पाणससाणा वरुनी फेंकित नजरेची लालडी,
बुचड्यांतिल लक्षितो जियेच्या चांफ्याची रावडी,
वेंची दर्याफुलें जिथें ती गोमी दर्यावरी,
तुफान वारा, तुफान पाणी, तुफान नवती तरी;
तेथें धाया दर्यांचरल्या दांडगाइला सजा,
' राजहंस ' फडकावित राहे सर्खेलांची ध्वजा !
सुबक शुक्तिच्या चिमण्या नौका न्हाल्या मुक्तारसें
वर पखांचीं मृत शलभांच्या औजारें राजसें,
त्यांतुनि झटती जलचर मांत्रिक याया भूमीवरी
प्रसन्न हंसरी जिथें जयन्ती झुलते पाण्यापरी,
' जयगड रावा ' घालित घिरट्या त्यांस पळवितो परी
ध्वजवृन्दाच्या शूर धन्यांचें निशाण धरुनी शिरीं !
पाणियांतल्या पातशहांची जिरवुनियां खुरखुरी,
तिवरीतीरासमीप तिकंटि तारू वरवा करी !
द्रोणाद्रीचा तनय पहुडला जेथें मिर्यागिरी
औषधि ज्याच्या दुरुनि भासती रात्रीं दिवट्यांपरी,

जिथें दुर्गशिरिं उभी भगवती, विघ्नरक्षणा करी
नाचे निर्भय म्हणुनि 'पारवळ घुम्मत बुर्जांवरी'
मनवारीचे पख उघडुनी तिथें समुद्रावरी
गस्त अहर्निश घालित फिरतो तरता 'रत्नागिरी'!
आतषबाजी निळावन्तिच्या बन्द करुनि मन्दिरीं
ताण्डव 'दर्यामौज' मांडिते पूर्णगड बन्दरीं!
जैतापुरची वारि राखितो 'बगळा राजापुरी'
द्वीप विराजे जेथें माणिकपाचूचें सागरीं;
सावन्तावरि लक्ष्य ठेवुनी दक्षिण सीमेवरी
देवगडीचें दक्ष तराण्डें कोतवालकी करी!
बळ दुबळें हें करावयाची धरिति वासना मनीं
शिवशाहीचे सेवक नाना प्रधानचूडामणि!

---

# पानपतच्या मैदानावर!

होत्या तोफा सुटत असकृत् तोफखान्याच्या धडाडा!
दुस्मानांचा करित सुटले शूर शिन्दे चुराडा!
मस्तानीचा तनय अरिंना छोडुनी क्रुद्ध हाणी,
नाटोपे तो तरिहि खलधी क्रूरकर्मा दुराणी! १
शौर्याचा जो निधिच जणुं त्या उग्र इब्राहिमानें—
केलीं दीन स्वरिपुवदनें आपुल्या विक्रमानें!
आवेशानें तुटुनि पडला भारचा धीर राव
त्या वीराचा सदसि गिलच्यां दाखवी स्वप्रभाव! २
"स्वर्लोकाचें उघडुनि महाद्वार ये वृत्रहन्ता!
मृत्यु स्वर्गा, विजय विभवा दे, करा शर्थ आतां!"

बोलोनी हें अतुलबल तो शत्रुंचे कण्ठनाल
योद्धा दाणी चरचर चिरी दीर्घ खड्गें कराल ! ३

" हाणा ! मारा ! " वदुनि वदुनी कोरडा कण्ठ झाला,
विश्रान्तीची परि न रुचली कल्पनाही जयाला,
होता भाऊ स्फुरवित रणोत्साह सेनेंत सर्व
" कल्पान्तींचा " म्हणति जन, " हा मूर्तिमान् काय शर्व ! " ४

वर्षावाला करिति अवघे चापधारी शरांच्या !
आरातींचे असु खपविती बन्दुकी गारद्यांच्या !
अंगीं भाले घुसुनि हरिती जेधवां सर्व ताठा,
येई तेव्हां कळुनि गिलच्या काय आहे मराठा ! ५

पादालागीं पद भिडवुनी एकमेकां पदाति
शस्त्राघाता अधर रदनीं चावुनीयां करीती !
वीरांच्या त्या खण खण असा नाद ये आयुधांचा,
खड्गांतूनी उडति ठिणग्या, मूर्त तो त्वेष साचा ! ६

अंगांतूनी सतत रुधिरस्राव चाले भटांच्या,
झाल्या राशी अगणित रणीं जागजागीं शवांच्या !
सर्वांठायीं वडुनि समरोन्माद कांहीं दिसेना !
घायाळांना तुडवित पुढें चालल्या मस्त सेना ! ७

श्वेताद्रीचे तनय कडवे शौर्यशाली पठाण,
नांवा ज्यांच्या परिसुनि अरी होति कंपायमान;
सह्याद्रीची कणखर तशी सन्तती हे मराठे,
यत्नामाचा चचक अवघ्या शत्रुवर्गास वाटे. ८

युद्धोत्साही कटक अटकेपार ज्यां न्यावयाचें,
वांच्छा चित्तीं अखिल–रिपु–निर्मूलनाची जयांचे,
यत्खड्गांनीं मद जिरविला धर्मवेड्या जनांचा;
आला त्यांशीं समय गिलच्यां आज झुंजावयाचा. ९

आर्यावर्तीं शिरुनि कितिदा जेविं कीं टोळधाड,
केलें ज्यांनीं सकल सुखसंपन्न देशा उजाड,
विध्वंसाचे सहचर तसे शत्रु जे संस्कृतीचे,
सह्याद्रीच्या कणखर सुतां कार्य तन्मर्दनाचें १०

झुंजारांनीं करुनि अपुली पाहियेली कमाल,
कोणालाही परि न विजयश्री वरी दीर्घकाल;
निर्वाणीचें उभयहि दळें मांडिती युद्ध जेथें,
अल्पायासें विजय कवणा प्राप्त होणार तेथें ? ११

---

# वजीर शहावलीखान

श्रीमन्तांचे तुटुनि पडले स्वार कोपायमान,
तच्छस्त्रांनीं अमित विगतप्राण केले पठाण !
वाहूं लागे खळखळ नदी शोणिताची रणांत,
इस्लामाचे पळत सुटले दास तेव्हां क्षणांत ! १

“ अद्रिश्रेणी–सित–हिम–धुनीयुक्त शीत प्रदेशीं
जन्मा येती रणविमुखता ठाउकी ना तयांसी ! ”
दर्पोक्ती ही यवनपतिचा नित्य बोले वजीर,
देती त्यातें पळुनि गिलचे विस्मयातें अपार ! २

नेत्रांचाही क्षणभरि तया ये न विश्वास साचा,
पाहे वस्तुस्थिति तरि वदे, “ दोष हा लोचनांचा ! ”
सैतानाची अशिवमय ही भासली त्यास माया,
तो अल्लाचें व्यसनहर घे नाम तन्नाश व्हाया ३

“ तोबा ! तोबा ! ” करितचि तदा फौज आली समीप,
झाला धूळी उडुनि गगनीं भास्कराचाहि लोप !

म्लेच्छाधीशध्वज शशिकलायुक्त कोठें दिसेना !
सैरावैरा पळति गिलचे सोडुनी स्वाभिमाना ! ४

गेली भ्रान्ती अखिल विलया, सत्य आलें कळून,
गेला सारा मद उतरुनी, जाहलें प्राप्त भान !
“ अल्ला ! अल्ला ! ” अडखळत तो बोलला दीन वाणी,
“ द्यावें का रे ! अपयश तुझ्या सेवकां काफरांनीं ? ” ५

कर्णी आली ‘ हर ! हर ! ’ अशी गर्जना तोंच घोर !
कांपे वातावरण अवघें होउनी क्षुब्ध फार !
वाद्यांचाही गजर अरिच्या जाहला त्याच काळीं,
चेतोवृत्ती परिसुनि तया होय त्याची निराळी ! ६

चावोनीयां रद करकरां, मुष्टि वेगें उगारी !
खड्गालागीं उपसुनि, हया टांच तो म्लेच्छ मारी.
होवोनीयां त्वरित अपुल्या आडवा सैनिकांना,
दापी त्यांतें विविध वदुनी मर्मभेदी वचांना, ७

“ कां भ्याडांनो ! रणविमुख हो ! औरता जाहलां ना ?
येतें तेणें फसगत न ही पाहणें लोचनांना !
नामर्दांनों ! असा बुडवुनी शौर्यशाली शहाचें
जातां कोठें ? पुढतिं तर या ! छेदितों कण्ठ साचे ! ८

“ झाले भीतिप्रद बहु जयां पत्थराचे पुजारी,
जानाची ज्यां गमत परवा या जिहादींहि सारी,
केली ज्यांनीं पळुनि समरीं बेइमानी शहाशीं,
तच्छीर्षांच्या रचिनचि इथें पर्वतप्राय राशी ! ९

“ हिन्दुस्तानीं अखिल रिपुंना तीक्ष्णखड्गप्रभावें
केलें ज्यांनीं हतबल तया केविं भीरुत्व यावें ?
गेला युष्मत्स्मृतिंतुनि कसा तो महंमूद शूर,
चौहानाचा गनिम कडवा तेविं घोरीहि घोर ? १०

" ज्यां ' अल्लाहू अकबर ! ' असा दे न आवेश घोष,
इस्लामाचे म्हणविति वृथा दास त आपणास !
मूर्तिद्वेष प्रखर भिनला रोमरोमीं न ज्यांच्या,
माता व्यर्थ प्रसवुनि तयां भागल्या मात्र त्यांच्या ! ११

" चित्तामाजी सळसळ करी तीव्र धर्माभिमान,
पावित्र्याचें सदन शिरसा वन्द्य तुम्हां कुराण,
मुर्दाडांनो ! तरि मग कसे शत्रुशस्त्रप्रहार
घेतां पृष्ठीं ? समर म्हणजे धर्मवीरा विहार ! १२

" दुस्मानाला उलट फिरुनी दाखवा स्वोग्रतेज,
गाजो गाजी म्हणुनि अपुला संगरीं भूप आज !
जिंकायाची मनिं धरुनि ये हाव जो रूमशाम,
दुर्गी त्याचें यवनपतिच्या शीर्ष पावो विराम ! १३

" तोंडें कैसे अजुनि बघतां ? यार हो ! ' दीन ' बोला !
हल्ला वेगें चढवुनि करा तुष्ट पैगंबराला.
होतां जेते मिळतिल हुरी, दौलता दुस्मनांच्या !
येतां मृत्यू, पडतिल गळां स्वर्गरंभोरु साच्या ! " १४

लज्जा, भीति, स्फुरण, समरोत्साह सेनान्तरंगीं
वीराचें त्या वच निपजवी भिन्नभिन्न प्रसंगीं !
संग्रामेच्छा सकल गिलच्यां होउनी दुर्निवार,
रक्तें त्यांचीं धमनिधमनी भासलें भेदणार ! १५

सैन्यांतूनी अगणित शतें शस्त्रधारी करांचीं
एकाएकीं उठुनि धरिती लालसा ताण्डवाची !
प्रावृट्कालीं चमकति विजा अंबुदाच्या समाजीं
अर्युच्छेदोत्सुक असिलता तेविं अर्काशुमाजी ! १६

ये आरोळी, " लढुनि समरीं आज मारूं, मरूं वा !
बेहेस्तीं वा स्वरिपुशिबिरीं म्लेच्छ वीरा विसांवा !

होवोनीयां हतबल रणीं शत्रुहस्तीं पडावें,
जावें युद्ध त्यजुनि अथवा हें अविन्धां न ठावें ! ”   १७

राहे स्तब्ध क्षणभरि चमू मूर्तिविध्वंसकांची,
त्यांवी व्योमीं नयन करुणा भाक्तिांना खुदाची;
येई स्फूर्तिप्रद मग मुखें गर्जना सैनिकांच्या:—
“ सद्धर्मांचा विजयचि सदा साधु पैगंबराच्या ! ”   १८

“ होवो अल्ली ” वदुनि अवघे “ आमुच, पाठिराखा ! ”
घाया वेगें उलटति महाराष्ट्रवीरां तडाखा !
नीलाकाशीं जलधर जवें जेविं पर्जन्यकालीं
सेना तेवीं उभय भिडुनी थोर माजे धुमाळी !   १९

---

# पानपतचा सूड !

—१—

काय रोहिले ! बसलां पाहत ?
क्षितिजावरि जें दिसतें काळें
‘ सजल मेघ ते ’ म्हणतां ‘ आले ! ’
चकचकाट जो मधुनी चाले
गमे तुम्हा ती बिजली चमकत !
चक्रवात हा समजा आला !
घुसळित साऱ्या महोदधींला,
फेंकित गगनीं प्रचण्ड शैलां
गहन वनांचे धुडके उडवित !
याच्यावरि आरोहण करुनी
कोण तुम्हावर येति चालुनी

पहा एकदा त्यास निरखुनी
        दुस्मन तुमचे तुम्हा न अविदित !
ओळख त्यांची पटवित नसला
ध्वज तुमच्या जर हा दृष्टीला
ऐका तर या जयघोषाला !
        पटविल ओळख तो तुम्हांप्रत !
पुरें न अजुनी तपहि लोटलें
तुमचें तोंचि स्मरण लोपलें,
परि न मराठे तुम्हा विसरले
        स्वप्नींही त्यां स्मरे पानिपत !
वध्य पशूंसम वधिलें जेथें
सह्याद्रीच्या प्रिय पुत्रांतें
खरा मराठा विस्मरेल तें
        कल्पान्तीं तरि केविं पानिपत ?
पानिपतीं जें रक्त सांडलें
'सूड ! सूड !' तें म्हणत आटलें
अजुनि अस्थिचे पर्वत तिथले
        'सूड ! सूड !' या शब्दां गर्जत !
महाराष्ट्रभूनिःश्वासांतुन
अश्रुजलाच्या बिन्दुबिन्दुंतुन
पानिपतीं गळल्या रुधिरांतुन
        वीर निघाले तुम्हां हुडकित !
तुमच्या रुधिरास्तव तान्हेले
नाचति त्यांच्या करांत भाले,
त्वेष चेतवित निशाण हाले !
        दिसे न आतां तुमची धडगत !
अविन्धांवरी गदाच आली
म्हणुनी केलें ज्याला वाली

कोठें आहे तो अब्दाली
        राखायाला तुम्हां सांप्रत ?
काळोखाचें गाळा गव्हर !
लपुनी बैसा त्यांत हवे तर !
किंवा स्मरुनी अलि पैगंबर
        करा शत्रुचें समरीं स्वागत !
करा समर, वा बरा पलायन,
पाताळीं जरि बसलां जाउन
तरी पालथी पृथ्वी घालुन
        तिथेंहि रिपु हे येतिल धुण्डित !
स्मरा आपुल्या घोर कृतींना,
स्मरा आपुल्या पापाचरणा,
आणि सुखें व्हा तयार मरणा!
        तुम्हां मरणाविण न दुजी गत !

— २ —

        वीर मराठे आले गर्जत !
पर्वत सगळे कंपित झाले !
बिनिला शोभविती बिनिवाले,
शिन्द्यांचें दळ मागुनि चाले
        दांत आपुले कर कर चावित !
धूळ शत्रुला चारायाला
होळकरांचा उत्सुक झाला !
येति कानडे राखायाला
        निज राष्ट्राचें नांव सलामत !
छत्रपतींचें, श्रीमन्तांचें,
राष्ट्राच्या अत्युग्र तपाचें

प्रखर तेज हें आलें साचें
        जाळाया घन तिमिरा धांवत !
समरगर्जना ' हर ! हर ! ' झाली,
रिपुहि तिकडुनि दे आरोळी,
उभय दळांची गांठ न पडली
        धडाड तोफा तोंचि धडाडत !
शुक्रतालची घोर लढाई
तलवारींची टिप्परघाई
अश्वदळाचा मार सवाई
        रोहिल्यांस दे पुरती दहशत !
पत्थरगडचे पत्थर फुटले
क्रुद्ध मराठे गर्जत उठले
कोट छातिचा करुनी घुसले
        रिपुरुधिराचे पाट वाहवित !
शिरस्त्राण नच कामीं आलें !
        अभेद्य कवचहि फुटुनी गेलें !
तलवारींचे तुकडे झाले !
        रणीं रोहिले पडले अगणित !
अजिंक्य पत्थरगड झाला सर
होय गर्जना पुनरपि ' हर ! हर ! '
दख्खनचे समशेरबहाद्दर
        शत्रुशिरांवर थै थै नाचत !
प्रेतें तुडवित मार्ग काढुनी
नजीबखांच्या अस्थि उकरुनी
केलें त्याचें चूर्ण जाळुनी !
        गुलालसम तें गर्जंति उधळित !
दत्ताजी ! हा तुझ्या वधाचा,
जनकोजी ! हा तुझ्या वधाचा,

इब्राहिम हा ! तुझ्या वधाचा,
सूड राष्ट्र घे पहा तयाप्रत !
रहा मराठे ! गर्जत ‘ हर ! हर ! ’
शत्रुशिरीं पद देत निरन्तर !
कर्तव्याचा बोला ‘ हर ! हर ! ’
राष्ट्राचें चैतन्य जागवित !
“ अधमत्वाचें हें निर्मूलन,
असुरत्वाचें हें उच्चाटन,
स्वत्वाचें हें पुनरुज्जीवन ! ”
सांगे भगवा झेंडा फडकत !
भरपाई ही अपमानाची,
शौर्यकथा ही अभिमानाची,
ज्योत जागती नव तेजाची
राहिल जगता देत इशारत !

---

# जिवबादादा बक्षी

—१—

समशेरीला समशेर—गनिमाची अजुनि न भिडली,
गर्जना न एकहि अजुनी—गगनाला फाडित उठली,
राजांची मैदानाच्या—पहिलीच सलामी झडली !
सैन्याचें काळिज मूर्त
जरिपटका ध्वज विख्यात
घेउनी रणांतुनि पळत
नादान तोंच हा कोण ?

—२—

यदुवंशविलासनृपांनीं—आसेतु करुनि थैमान
लाविलें द्रविडराजांना—ज्यापुढें कराया नमन,
जो मिरवित भाऊरायें—हालविलें हिन्दुस्तान,
हालत्या वज्यांवर ज्याच्या
मसनदी हलति यवनांच्या,
त्या ध्वजास निज राष्ट्राच्या
कालिमा कोण हा लावी ?

१९३२

—३—

पळपुट्या राउताला या—गांडुनी ओढुनी खालीं
दावील जरीपटक्याला—रण पुन्हा असा बलशाली
सुत एक महाराष्ट्रींची—माय काय नाहीं व्याली ?
दासींचे सगळे पोर
दास्यची जयांना प्यार
काय हे असे झुजार
झुंजाया जमले समरीं ?

—४—

निर्जीव परी राष्ट्राचा—जीव तें निशाण निघालें !
एकाहि तरी धमनींत—नाहींच रक्त सळसळलें !
थंडेच जागच्या जागीं—सर्वही मराठी भाले !
विस्मरण न हें स्वत्वाचें,
हें मरण राष्ट्रधर्माचें !
हे भावि गुलामगिरीचे
डोहाळे समजा पहिले !

—५—

पण नको अशुभ ही वाणी—आल्याच दुरुनि या हांका !
ये दौडत दौडत वेगें—भालाइत कोणी बांका !
कोण हा महाराष्ट्राच्या—इभ्रतिचा पाठीराखा ?
रोधिलें पुढुनि मार्गाला
अडविला पलायनवाला !
हिसकिलें जरीपटक्याला,
थुंकुनी मुखावर बोले:—

—६—

" नेशील कुठें नादाना !—चेतना महाराष्ट्राची ?
जोंवरी जागती ज्योत—जीवाची या जिवबाची;
जा खुशाल आता पळुनी—परवा न कुणाला त्याची !
नवतिचा न हा हंगाम,
हा नव्हे सुरतसंग्राम,
हा सर्वस्वाचा होम
राष्ट्रास्तव रणकन्द्यांचा !

—७—

" पळशील किती रे पळुनी—अति नाजुक तूं उमराव !
शिन्द्यांच्या तोफांमार्गे—जा लपुनि बैस ! वांचीव
निज राष्ट्राहुनिही प्यारा—आपुला अमोलिक जीव !
तान्हेल्या शस्त्रां आजी
रिपुरुधिरें पाजुनि ताजीं
एकलाच राखिल बाजी
हा जिवबा शिवशाहीची !

—८—

" अकलेचें शहर पुण्याच्या — वाजलें दिवाळें खास !
भरितात घरें मुत्सद्दी — दौलतिचा करुनी नाश !
सर्दारी म्हणुनिच असल्या — ये राड्या राघोजींस !

गुल्जार असे सर्दार
संगरीं काय करणार ?
एकची खांब खंबीर
दौलतिचे दौलतराव ! "

—९—

इतुकेच बोलुनी बोल — मारिली टांच अश्वाला,
एकदांहि वळुनी मागें — पाहिलें न त्या भ्याडाला !
रणकेसरि हरिपन्ताला — रणभीरु कारटा झाला,

म्हणुनियां व्यथित जरि चित्त
फौजेंत परतला त्वरित;
फडकत्या ध्वजासह शिरत
चैतन्य नवें दळभारीं

—१०—

फडफडे जवें जरिपटका — तडफडे शत्रु त्वलाहीं
तोफांच्या मारगिरीनें — यवनांची फुटली लाही !
तुटुनियां शिरें किति पडलीं — गणतीच तयांना नाहीं !

चेतलें युद्ध घनघोर
लागला निजामा घोर !
स्वाधीन करुन मश्रूर
श्रीमन्तां आला शरण !

—११—

धन्य धन्य जिवबा मर्द—मर्दुमकी त्याची न्यारी !
धन्य ते तयाचे वीर—धन्य तीहि कर्तबगारी !
हा जरिपटका ध्वज धन्य—धन्य ही यशस्वी स्वारी !
या महाकालिका धन्य !
हे विजयी भाले धन्य !
समरघोष ‘ हर ! हर ! ’ धन्य !
धन्य ही धन्य शिवशाही !

—१२—

सजवुनि दलबादल डेरे—दरबार भव्य भरवोनी
सत्कारुनि जिवबालागीं—गौरविलें श्रीमन्तांनीं !
केला मग जयजयकार—दरबारी उमरावांनीं !
“ शौर्याचा पारावार
शिवशाहीचा आधार ”
गर्जले मराठे वीर,
“ हा जिवबादादा गाजी ! ”

—१३—

जरि अन्याच्या उत्कर्षी—असहिष्णु आजवरि झाले
चमकले तेहि परि आज—नानाचे हिरवे डोळे !
मारुनी मिठी जिवबाला—फडनवीस नाना बोले:—
“ आणोनी परत निशाण
रक्षिला न केवळ मान,
परि वांचविला रे प्राण,
जिवबा त्वां शिवशाहीचा ! ”

---

# सवाई माधवरावाचा मृत्यु !

श्रीमन्त पेशवे धनी
ते पाटिल वीराग्रणी
मौजेंत दंग होउनी
रंग खेळले पुण्यांत, गेला तो न अजुनि वाळुनी ! १

जीवांचे करुनी घडे
रुधिरांचे शिंपुनि सडे
गनिमास चारिले खडे
दिग्विजयाचे त्याहि न झाले बन्द अजुनि चौघडे ! २

आकाश कोसळे तसें,
तों अघटित घडलें कसें ?
रायास लागलें पिसें !
कुणि वैऱ्यांनीं मूठ मारुनी वर उगविलें असें ३

कधिं बरळे वेड्यापरी,
कधिं उदासीन अन्तरीं,
कधिं वृत्ति दिसे बावरी,
वैतागुनि शेवटीं टाकिली उडि कारंज्यावरी ! ४

आळविलें देवां जरी
औषधेंहि नानापरी
हकिमांचीं झालीं, परी
पत्थर ठरले देव ! आणखीं दुबळे धन्वन्तरी ! ५

लेशाही न आला गुण,
अति निष्ठुर करुनी मन,

शोकांत बुडवुनी जन
अखण्डनिद्रामग्न जाहले नारायणनन्दन ! ६

आक्रान्त उडाला क्षणीं
शहरांत विलापध्वनि
ये सदना सदनांतुनी
दिनदुनयेचा पालनवाला अन्तरला ऐकुनी ! ७

बोलती कुणी बखरी
“ हा दैवा ! केलिस खरी
मात ही प्रयत्नावरी
अस्मानींची वीज पाडुनी शिवशाहीच्या शिरीं ! ” ८

रायाचें वेडहि कसें
हें विचित्र तरि हो ! असें ?
जें जगास लावुनि पिसें
यशोदेस ठरवून अपेशी रायाला नेतसे ! ९

पुरवील कोण तुजविण
राया ! तव आश्वासन ?
“ भाग्यास राष्ट्र चढविन
इस्तंबुलच्या किल्ल्यावरतीं जरिपटका रोवुन ! ” १०

ग्रह अनिष्ट अंवमानुन
दायाद पुण्ड मोडुन
जो करी राज्यरक्षण
व्यर्थ असे त्या नानाचें रे ! शहाणपण तुजविण ! ११

तूं कठोर वज्राहुनी,
परि अधिक मृदुत्वीं गुणीं
पारिजातपुष्पाहुनी;
पडली म्हणुनी मन्त्राविण रे ! राया तव मोहिनी ! १२

कांपले शत्रु चळचळ,
सगरीं न ठरले पळ !
जळचरीं काढिला पळ !
बालवयांतहि हालविलें त्वां खेळत भूमण्डळ ! १३

नवखण्डधरित्रीवर
संचार करी लष्कर
घुमवीत घोष ' हर ! हर ! '
महिसुरचाही व्याघ्र मराठी भाल्यांनीं जर्जर ! १४

खड्यांचें करुनी रण
रिपु मस्त जसे वारण
चौफेर तयां वेढुन
निजाम अली शरण आणिला देउन दांतीं तृण ! १५

अपयश तें मागिल दडे
नदि अटकेच्या पलिकडे !
मग बोल बोलतां खडे
होनाजीचा प्रभाकराचा पुण्यांत डफ कडकडे ! १६

होवोनी वैभव दुणें
रंगलीं प्रजेचीं मनें
चाललीं नृत्यगायनें !
गुणी जनां छपन्न देशिंच्या आश्रय झालें पुणें ! १७

तें रसिक विलासी पुणें
शौर्यादि गुणींहि न उणें,
जरि अलंकार दक्षिणे
भयाण भासे आज सवाई राया ! तुझियाविणें ! १८

किति तुझे आठवूं गुण ?
गहिंवरुनि जातसे मन

नावरे शोक हा क्षण !
मुक्तकण्ठ आक्रन्दन आतां, आणि अश्रुमोचन ! १९

* * * *

मावळला येथें नय !
आशेचा झाला क्षय !
आकांक्षा पावे लय !
प्रलय यापुढें दिसे दृष्टिला, शिवशाहीला भय ! २०

सोन्याचे सरले दिन !
येतील पुन्हा कोठुन ?
दाटला तिमिर दारुण !
गतभाग्याचे दिवस आठवुन समाधान येथुन ! २१

---

# अपूर्व किंकर !

—१—

“ शरण तुला मी सकरुणहृदये ! अनन्यभावें जरी
छळिसि तरि अजुनिहि कां सुन्दरि ?
काळ्या भुंवया करुनि कमाना नयनबाण जंजिरी
सोडिशिल किति आतां मजवरी ?
लक्ष्य तुझें तव चरणावरतीं आणुनि जरि वाहिलें
तया तरि म्हणसि न कां आपुलें ?
मधुर चुंबना मरन्दवतिच्या मधुप भुकेला जसा
रसाळे ! मीहि तुझ्या गे तसा.

हेतु मनींचा मदनमञ्जरी ! बहु दिवसांचा असा
लुटावें तव अधरींच्या रसा !
तारुण्याची हसत नव्हाळी गात्रागात्रांतुनी
बहरली पूर्ण तुझ्या साजणी !
शहर पुण्याच्या सगनभाउची मोहक जशि लावणी
तशिच तूं गहिना माझी गुणी !
सुमशय्येवरतीं दृढतर आलिंगनीं
होउ दे मला रत अधरामृतसेवनीं;
कर पूर्ण कामना मम इतुकी कामिनि !
इन्द्रलोकचीं सर्व सुखें मग सान मला होउन
तुच्छ मी गणीन नन्दनवन !

—२—

झुरा तुरा आनन्दवल्लिचा साम्राज्यांतुनि करी
मुशाफरि मदनाच्या सुन्दरि !
इष्काच्या लज्जतिचे प्याले पिउनि मारितो मजा,
मारितो कुलजांच्या भारजा !
बेपरवा खेळतो जसा तव गळ्यांत गे ! तन्मणि
तसा हा सदैव रमणीगणीं !
नवलपांखरें नाचवितां हा बघुनि सगुण पोपट
बोलले भोळे भाविक भट:—
' गोकुळांत गोवळा कन्हय्या मुरलीमोहन हरि
गोपिकांसंगें क्रीडा करी ! '
गोपिकांत त्या आजवरि परी नयनहृदयमोहिनी
राधिका नव्हती गहिने ! कुणी.
शृंगाराची गवसलीस तूं परन्तु मन्दाकिनी,
तुजपुढें राधा हरिची उणी !

सानन्द खेळती विलास मीनांसम,
हा श्वास सुगन्धी मन्द समीरोपम,
हा स्पर्श करितसे पुलकित अंगें मम !
जिवन्त घ्याया इथें समाधी अधीर झालें मन !
नको गे ! केवळ अवगाहन !

—२—

' फन्दफितुर करुनियां स्वराज्यीं ताम्रमुखी जलचर
गिळाया शिवशाही तत्पर !
परिस्थितीच्या कृष्ण घनांचें माजे अवडंबर ! '
बोलते जनता चिन्तातुर !
परवा त्यांची सवाइ बाजी करी न हा रतिभर,
धीमतां काय असे दुर्धर ?
अधचतुर तो तरिही नाना टोपीवाल्यां खडे
चारुनी वालवि दर्यांकडे !
अर्धवटाचे त्या मनसोबे हतबल ज्याच्यापुढें
काय त्या तांम्रांचें सांकडें ?
चतुर्वेद षट् शास्त्रें भरिती सदनीं ज्यांच्या जळ
पूजिले ब्राह्मण ते सोज्ज्वळ,
पाउस त्यांच्या शुभ आशींचा शिरीं ज्याच्या पडे
काय त्या तांम्रांचें सांकडें ?
पण नको ! निपुण मम सर्दारचि बावन
उडवितिल रिपूंची राळ, माजवुनि रण,
दर्यांतिल दौलत आणितील ओढुन !
बेगुमान मी तरीहि राहिन सेवित हा सुन्दर
तुझा रसपूरित बिंबाधर !

—४—

राघवमत्स्य काय जिंकितिल झिंगे जळचर तरी ?
मनीं हें आण सुभग सुन्दरी !
झिंग्यांस्तव त्या नको यावया किमपि विलासीं उणें,
जिणें निस्सार विलासांविणें !
किन्तु न उरला लेशहि आतां, साक्ष मनोमय असे,
सरसि तरि का मार्गे राजसे ?
राधिकेस निज वेष देउनी क्रीडा करि माधव
तशिच का वांच्छा चित्तीं तव ?
खुदकन आलें हंसें ! नको तें मुख घेऊं झांकुनी
जाणिला हेतु तुझा साजणी !
निज वेषा अर्पूनि मीहि तुज बसविन गादीवरी,
नव्हे हें लटिकें हृदयेश्वरि !
पेशवाइ पोषाख तमामी घे तर हा झडकरी
कराया धारण अंगावरी.
साजेल साज हा अभिनव गडणी ! तुला,
या नूतन वेषीं तव रूपा नच तुळा !
निज केशांचा तरि कलाप कर मोकळा !
तंग चोळिवर चमके ऐना, ठेव तीहि काढुन,
क्षणभरी करिं उघडें यौवन !

—५—

नवलाई नव शिंपुनि पिकवूं स्वर्गसुखांचा मळा !
गडे ! मी वसन्त, तूं कोकिळा !
कर्णभूषणें, कण्ठभूषणें नकोत तव हीं मुक्ीं,
नथहि ती कर नाकावेगळी !

जरीकिनारी सुरवारीला दे कटिभागीं स्थळ,
लपिव तें महेश्वरी पातळ !
गोल छातिला झांक तमामी निमा चढवुनी गडे !
घाल हे कानांमधि चौकडे !
रुळत उरोजीं हार असूंदे मोत्यांचा साजिरा
जयाच्या चमके पदकीं हिरा !
मरकतमाळा गळां घालुनी तयार हो झडकरी;
चढिव हा मन्दिल शिरिं भर्जरी !
करिं देतों घे पेशवाइची मूर्तिमन्त थोरवी
अशी ही समशेरहि नागवी !
ये बैस येउनी गादीवर सुन्दरि !
भ्रूविलास आता विसरुनि जा क्षणभरी;
पण्डित प्रधानां उचित वृत्ति ती धरीं !
वारिल चवरी श्रीमन्तांवरि अपूर्व हा किंकर !
करावी करुणा दासावर !"

---

# गोकलखां

—.o:—

हा कोण इथें पडलेला ?
गोकलखां लढनेवाला !
स्वातन्त्र्यसूर्य अस्ताला—पावतां महाराष्ट्राचा
अर्घ त्यास अर्पुनि ज्यानें—आपुल्या उष्ण रुधिराचा,
चढविला रक्तिमा रम्य—तद्बिंबावरतीं साचा !
शत्रूंवर पडला तुटुन
शौर्याची शर्थ करून
समरांत वेंचिले प्राण,
विदित तो नसे कोणाला—गोकलखां लढनेवाला ? 1

तिमिर तेज एके समयीं—वसतिल का त्याच ठिकाणीं ?
असिलता नांदणें दोन—शक्य केविं एके म्यानीं ?
प्रभु दोन महत्त्वाकांक्षी—राहणें न हिन्दुस्तानीं !
कलह थोर म्हणुनी माजे
युद्धाचा डंका वाजे,
वीरनाम सन्तत गाजे,
वीर हा परी शेवटला—गोकलखां लढनेवाला ! २

अष्ट्याच्या मैदानांत—लागला अखेर निकाल !
बन्दुकींवरी बोथटले—जरि कराल तरि करवाल !
पाश्चात्यसंस्कृतीपुढतीं—पौरस्त्यपद्धती फोल !
खड्गांचा गेला काळ,
स्वत्वाला विसरे ढाल,
भालेही कवडीमोल !
घायाळ होउनी पडला—गोकलखां लढनेवाला ! ३

प्रेतांच्या जागोजाग—राशींवर पडल्या राशी !
रक्ताचें घडलें स्नान—अष्ट्याच्या रणभूमीसी !
लोळल्या ध्वजा धूळींत—मुकुनियां पूर्वविभवासी !
कोरडा कण्ठ होवोनी
घायाळ शिपाई कोणी
करिताती ‘ पाणी ! पाणी ! ’
चावी परि अधरोष्ठाला—गोकलखां लढनेवाला ! ४

वीरोचित शय्येवरतीं—पहुडला पुन्हा न उठाया !
अरिला न ज्यामुळें निद्रा—तो सजला निद्रा घ्याया !
पातला जरी कल्पान्त—तरि अन्त न निद्रेला या !
रक्ताचा वाहुनि पूर
ये दुर्बलता अनिवार;

ग्लानीही वारवार;
दृढ तरी धरी खड्गाला—गोकलखां लढनेवाला ! ५

शेवटला आशातन्तु—शेवटल्या श्रीमन्तांचा,
अवशेष उग्र तेजाचा—निःशेष आज व्हायाचा !
हा अस्तंगतरविकिरण—क्षणमात्रें लोपायाचा !
कांपरें सुटे अंगाला
शत्रूंच्या, बघतां ज्याला,
गृध्रांचा त्यावरि डोळा !
चित्तीं न परी गडबडला—गोकलखां लढनेवाला ! ६

इहलोकांतिल उत्कर्ष—हा दिव्य राज्यनिष्ठेचा !
हा अखेरचा कल्लोल—दाक्षिणात्यशौर्याब्धीचा !
हा शेवटचा उच्छ्वास—श्रीस्वतंत्रतादेवीचा !
आचके अखेरिस आले
एकदां शरीरहि हाले,
पांढरे जहाले डोळे !
निष्प्राण होउनी पडला—गोकलखां लढनेवाला ! ७

मर्दुमकी गेली सारी—वरपगडा अधमत्वाचा !
ही स्वराज्यनिष्ठा मेली—सुळसुळाट घरभेद्यांचा !
विहगेश्वर विगतप्राण—हर्षघोष काकोलांचा !
दुष्कृत्यफलां भोगाया
मन्दभाग्य बाजीराया !
हो तयार जन्मांतचि या !
आधार तुझा हा तुटला—गोकलखां लढनेवाला ! ८

खणखणाट तलवारींचा—आतां न पुन्हा व्हायाचा !
यापुढें न भगवा झेंडा—कोठेंही नाचायाचा !
समरघोष 'हर ! हर !' ऐसा—श्रवणीं न कधीं यायाचा !
शान्तीचें बसलें ठाणें

आता न कधीं मैदानें
रङ्गतील नररुधिरानें !
समशेरबहाद्दर गेला—गोकुळखां लढनेवाला ! ९

संपला इथें इतिहास—शिवराजाच्या राज्याचा !
आतां न राहिला काळ—मर्दांनी पोवाड्यांचा !
आटला झरा येथून—चैतन्ययुक्त वाणीचा !
अष्ट्याचें तरि मैदान
स्फूर्तिप्रद गातें गान !
आठवतो तेथिल अजुन
वृक्षलतापाषाणांला—गोकुळखां लढनेवाला ! १०

---

# रावबाजींचें राज्यदान !

“ मिळविलें कर्मवीरांनीं
सोडितों तयावर पाणी ! ”

—१—

“भोजनीं मात्र जे वीर—संग्राम केविं करणार ?
भेद ज्यां आपपर नाहीं—जे स्वजनाही लुटणार,
पळणारे बारा वाटा—तोफेचा सुटतां बार !
भ्याड हे असे उमराव
भ्याड हाहि बाजीराव !
युद्धाची तरि त्या हांव !
अग्नि आज तिज देवोनी
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—२—

" कां मना ! वंचना आतां—व्यर्थ तूं आपुली करिसी ?
पसरिसी अजुनि कां आशे !—आपुल्या इन्द्रजालासी ?
झुंजसी यत्नवादा ! तूं—अजुनि कां दैववादाशीं ?
व्हा सुदीर्घ निःश्वासांनो !
नराश्य मानसीं बाणो !
खळखळां वहा अश्रूंनो !
ओंजळींत तुम्हां धरुनी,
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—३—

" भडकला द्वेषदावाग्नि—ओतिलें तयावर पाणी !
जा चित्तांतिल अभिमाना !—सोडिलें तुझ्यावर पाणी !
चल निघुनि महत्त्वाकांक्षे !—सोडिलें तुझ्यावर पाणी !
शस्त्रांचा झाला न्यास,
आशेचा तुटला पाश !
घेतला कर्मसंन्यास !
श्रेयस्कर तोचि निदानीं;
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—४—

" चाण्डाल, दुरात्मा, पापी,—अधमाधम बाजीराव !
हा बाजी कसला ? पाजी !—कपटपूर्ण याचा भाव !
होवो या अपशब्दांचा—मजवरी सुखें वर्षाव !
शिवशाही नष्ट करोनी,
निजपूर्वजयश मळवोनी,

बैसलों राष्ट्र बुडवोनी !
सम निन्दा स्तुति मज दोन्ही !
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—५—

" वंशांत शूर बाजीच्या—जन्मलों मीच नादान !
मजलागिं शापवचनांनीं—पूजितील सारे तरुण !
थुंकतील आयाबाया—घडतां ममनामश्रवण,
जेथें न एक सोपान
त्या स्थलीं पावलों पतन !
हें मरणाआधिंच मरण !
टाका मज जाळुनि कोणी !
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—६—

" हा मरणाआधिंच मेला !—या टाका जाळुनि याला !
अत्युष्ण निजोच्छ्वासांनीं—जाळा मज मेलेल्याला !
मेलों मी तरि जगणार—विदित हें असो सकलांला !
कोणत्या महाभागाला
होइल मम विस्मृति, बोला !
कल्पान्त निकट जरि आला,
अमरत्व आज मिळवोनी
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—७—

" जा प्रभाकरा, शाहीरा !—करुं नको शोक तू लेश !
ज्यां उत्पत्ति स्थिति त्यांचा—होणार कधींतरि नाश;
विदित हें तुला सुज्ञाला—सकल तूं कवींचा ईश !

हें राष्ट्र जिचें अभिमानी
जीवन्त अशी तव वाणी
दगडांतुनि काढिल पाणी !
परम मी अमंगल म्हणुनी
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—८—

“ श्रीशाहुनृपाचें तक्त—यापुढें सलामत राहो !
स्वसौख्य महाराष्ट्रीय—दीर्घकाल आतां लाहो !
निन्दुनी पेशवाईला—जग पुरवो अपुला लाहो !
स्थिति इष्ट महाराष्ट्राला
प्राप्त तीच त्या अनघाला !
तद्वियोग न घडो त्याला
रविचन्द्र जोंवरि गगनीं !
मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !

—९—

“ पालकत्व शिवशाहीचें—सोडिलें तयावर पाणी !
नेतृत्व महाराष्ट्राचें—सोडिलें तयावर पाणी !
स्वामित्व पेशवाईचें—सोडिलें तयावर पाणी !
अरिचरणीं शरण रिघोनी
सर्वस्वावरती पाणी
सोडिलें राव बाजींनीं !
बोलो न यापुढें कोणी:—
‘ मिळविलें कर्मवीरांनीं—सोडितों तयावर पाणी !’ ”

---

# आमची शाहीरगिरी

युगा युगाची नवलपरी
        ही अमुची शाहीरगिरी;
युगां युगांतुनि जायाची
        चैतन्या उधळित साची !
युगां युगांचे सन्देश
        युगां युगां करणें ज्ञात,
सुप्तांना जागृति देणें,
        आणि शवांना उठवीणें;
व्रत उज्ज्वल हें सदा हिचें
        जगताला जगवायाचें !
अस्मानी वा सुल्तानी
        करिल हिची लेश न हानी !
दास्यशृंखला जोंवरतीं
        जितजनतापदिं खळखळती,
अविरत तोंवरि जगावरी
        चालणार शाहीरगिरी !
जोंवरि जगिं अस्तित्वांत
        रक्तवर्ण जुलमी तक्त,
अविरत तोंवरि जगावरी
        चालणार शाहीरगिरी !
सुल्तानीचा सैतान
        करिल जोंवरी थैमान
अविरत तोंवरि जगावरी
        चालणार शाहीरगिरी !

राष्ट्रघातकी जन दुष्ट
जोंवरी न झाले नष्ट,
अविरत तोंवरि जगावरी
चालणार शाहीरगिरी !
राष्ट्राचे कट्टे भक्त
पावतील जोंवरि कष्ट,
तोंवरि नच शाहीरांचें
तन्तुवाद्य थांबायाचें !
अनीतिच्या जहरें पूर्ण;
शुद्ध न जों वातावरण;
तोंवरि हें शाहीरांचें
तन्तुवाद्य बोलायाचें !
न ये व्यथा व्यक्तहि करितां
मूक अशी जर्जर जनता;
नेऊन तिचें लवलाहीं
गाऱ्हाणें देवापायीं
आर्तांचें करुनी त्राण
न्याय जगीं संस्थापून
युगा युगाची नवलपरी
विरमणार शाहीरगिरी !
परमधाम परमेशाचें
स्थान ह्विचें विश्रामाचें;
गीत तिथें शाहीरांचें
अन्तीं लय पावायाचें !

# निर्वाणींचें निवेदन

शस्त्रास्त्रें गळलीं, धुळीस कवचें गेलीं मिळोनी मम,
झालीं चूर्ण समस्त गंजुनि शिरस्त्राणेंहि तीं सत्तम,
मेले सर्व विकार, सोडुनि मला गेली विचारावली,
न्यायान्यायविवेकबुद्धि मम ही आतां असे आंधळी. १

आतां भीषण हास्य नृत्य न करी कल्लोलमालेवर,
झालें वादळ शांत, शान्तचि असे गंभीर रत्नाकर,
आतां शान्त, नितान्त शान्तित पुरें गुंगून गेलें मन,
शान्ताकार अनन्त सन्निध सदा आहेच नारायण. २

# खंड दहावा

# एका प्राचीन महर्षींची प्रभूस प्रार्थना

"वाङ् मे मनसि प्रतिष्ठिता, मनो
मे वाचि प्रतिष्ठितमाविरावीर्म
एधि।" इत्यादि.–ऐतरेय उपनिषद्.

सदा वाणी माझी मम हृदयिं वास्तव्य करिते,
सदा वाणीद्वारें मम हृदयही हें प्रकटतें,
प्रभो! मातें यावें धडुनि अपुलें दर्शन तरी
मनीं माझ्या तेणें उसळतिल आनन्दलहरी. १

कृपेनें जें तूझ्या उदित परमात्मन्! मम मनीं,
करो त्यातें लोकीं किमपिहि न हास्यास्पद कुणी.
प्रभो! याच्या ध्यानीं विसर मज माझाहि पडला;
समाधि ध्यानाचा रजनिसमयींही नुतरला! २

सदा जिव्हा माझी निपट ऋत बोलेल वचन,
प्रभो! जिव्हा माझी करिलचि सदा सत्यकथन.
नसो तेणें भीती! कर तव असो रक्षक मम!
तुझ्या शाहीराचें अवन तव कर्तव्य परम. ३

सर्वत्र शान्तता नांदो! शान्ति राज्य करो सदा!
शान्तिचें धर्मसाम्राज्य वाढवो ज्ञानसंपदा! ४

# सृष्टीची उत्पत्ति

( ऋग्वेद, १०–१२९ )

अस्तित्वांत ‘ असत् ’ किंवा ‘ सत् ’ तेव्हां नव्हतें मुळीं
नव्हतें ‘ रज ’ही तेव्हां, परतें ‘ व्योम ’ वा तसें १
झालें ‘ शर्म ’ कुठें ? कोण ? कोणा आवरुनी मग ?
होतें गहन गंभीर काय वारि तरी तदा ? २

नव्हता तेधवां मृत्यु, नव्हतें अमरत्वही
नव्हती तेधवां रात्र, नव्हता दिन वा तसा ३
जें काय तेधवां होतें, होतें तें एक एकलें,
स्वधेनें वातशून्यांत तें करी श्वसनक्रिया. ४
दुजें कांहींच त्याहून परतें नव्हतें तदा
एकलें एक तें येणें अद्वितीयत्व त्याप्रति. ५
आरंभीं तम, वा सारें अभिन्नत्वें तमीं जल,
तुच्छानें व्याप्त वा आभु, लोकीं ऐसें मतत्रय. ६
तम वा जल वा आभु कोणी न परि आदिम
सर्व तें अद्वितीयाचें रूपान्तर तपोबलें. ७

तें ‘ असत् ; ’ काम त्या ठायीं आरंभीं समवर्तला
मनाचें जाहला तोच रेत वा बीज आदिम. ८
सताचा असतीं हाच संबंध पहिला, असें—
विचारी ज्ञानवन्तांची मनीषा करि निश्चित. ९

तन्तुवत् यांचिया ठायीं पसरे रश्मि आडवा,
न तो केवळ खालींच, न तो केवळ वा वरी १०
रेतोधे जाहले तेव्हां, जाहले महिमे तसे
अरल्याला स्वधा व्यापी, प्रभाव परल्याप्रति. ११

कोठुनी सृष्टि ही आली, कशापासून जाहली,
कोण सांगेल याहून येथें विस्तारपूर्वक? १२
जाणतो निश्चयें कोण? देवही नव्हते तदा,
सृष्टिमागून ते आले! ज्ञाता कोण तरी मग? १३
कोठुनी जाहला साऱ्या सृष्टिचा या समुद्भव?
निर्मिलें हिजला कोणीं, वा कोणीं निर्मिलें नसे? १४
हें सर्व परमीं व्योमीं जो अध्यक्ष हिचा वसे
असेल त्याजला ठावें वा नसेल तयासही!! १५

---

# उषा

—०—

(ऋग्वेद, १–९२)

उदयपर्वतीं ध्वजा फडकली उषा सुन्दरीची,
गगनविताना रंगवितातीं किरणें हीं त्यांचीं!
आयुधधारी वीरांसम या तेजस्वी युवती,
माता, छे छे' प्रतिधेनुच ह्या नभ-पथीं येती!
आनन्दानें नाचत पुढतीं अरुण पहा आला,
या देवीही आल्या द्याया प्रकाश जगताला.
दिव्य सुशीला धेनु जोडिल्या स्वरथातें त्यांनीं
अनुपम तेजा धारण केलें अंगीं ललितांनीं;
नीतिमन्त जे भक्त, जयांच्या सोम गृहीं सिद्ध,
उत्तम ऐसे हविर्भाग जे अर्पितात नित्य,
त्यांसाठीं ह्या दुरुनी आल्या रथातुनी नारी—
धनें घेउनी, प्रभा वितरतीं अवनीला सारी!

नाना रूपां धारण करिते, नटीच कीं आहे!
विशाल वक्षस्थलही जीचें आवृत नच राहे!

प्रकाश जीचा पसरुनि लोकीं विदारितो तिमिर
द्युलोककन्या व्याली ती ही अलंकार रुचिर !
हिच्या प्रसादें सर्वहि झालों अन्धकारमुक्त,
प्रकाश पाडुनि उषा करी निज हेतूंतें व्यक्त.
सस्मितवदना दीप्तिमती ही कवितेसम रम्य,
कृपा कराया नभीं पातली; धन्य सती धन्य !
स्फुरवी चित्तीं सत्य, मधुरता, तेजाची खाणी—
उषा देवता स्तविली सादर असे गोतमांनीं.
देसी आम्हां उषे ! दयाले ! सामर्थ्यें जीं जीं,
लभलि तेणें सन्तति, योद्धे, धेनु तसे वाजी.
तुझ्या प्रसादें बलोद्भवे ! हे कीर्तिमत देवी !
'वीरांचा हा नायक !' ऐशी मम कीर्ती होई.
सेवक सदनीं अनेक असती सादर सेवेला,
वैभव माझें दाविति लोकां अश्वांच्या शाला.

कृपाकटाक्षें सती अखिल या लोका अवलोकी
नभोमण्डलीं उज्ज्वल किरणें अपुलीं मग फेंकी !
प्रकाशोनियां करी जागृती भूवरि ही जीवीं,
प्रतिभाशाली कविंनीं स्तविली धन्य उषा देवी.
पुनः पुन्हा जन्मते तरि जिला 'पुरातना' म्हणती,
समानवर्णी वस्त्रें जीच्या तनुला शोभविती,
द्यूतकार धन, आयु तसें जी क्षीण करित राहे,
ती ही येथें उषा देवता विराजली आहे !
तेज पसरलें स्वर्गाच्याही सीमेपर्यन्त,
झाला आतां वास्तव्याचा रजनीच्या अन्त !
मर्त्यजीवितां क्षीण करित ही प्रकाशते आहे,
निजप्रियाच्या दिनरायाच्या कान्तीतें लाहे !
अब्धि जलाचें, तसें पशूंचें ही ललिता सुभगा

करी प्रदर्शन, निज तेजानें शोभवि गगनपथा
देवाज्ञापालनीं सदा ही दक्ष पुरी राहे,
उषा सुन्दरी रविरश्मींनीं प्रकाशली आहे !
बलसंपन्ने ! उषे ! करावें भाग्यवन्त आम्हां,
पुत्रपौत्र होउनी आमुच्या शोभवोत धामा !
सत्यवादिनी, मञ्जुभाषिणी, गोमति, अश्ववती !
आम्हांवरती पडो सदा तव विभवप्रद कान्ती.
अरुण तुरंगां रथा आपुल्या देवि उषे ! जोड,
येउनि आम्हां दे तूं करुनी सौख्यांची जोड.

* * * *

रिपुविध्वंसक दस्रदेव हो ! रथ घेउनि या ! या !
गोधन कांचन घरीं आमुच्या भरुनी टाकाया.
उज्ज्वल तेजा असे आणिलें इहलोकीं ज्यानीं,
या ते आतां सामर्थ्यातें आम्हां घेवोनी !
प्रभातकालीं उभयहि अश्वी, देवांसमवेत
सोमरसाचें पान कराया इकडे येवोत !

---

# राजा वरुण

(ऋग्वेद १–२४–७ आणि १–२५–७/१२)
नोहे ज्या तल, त्या स्थलीं वरि वनस्तूपा उभा जो करी,
तो राजा वरुण प्रकीर्तित महा प्रौढप्रताप्यापरी !
त्याच्या अव्यय ऊर्ध्वमूलतरुच्या नीचीन शाखा भल्या
आम्हां मर्त्यजनां अदृश्य परि त्या होऊनियां राहिल्या ! १
ज्या मार्गी फिरतात पक्षि गगनीं तो ठाउका याप्रति !
नौकांचा पथही जलावरिल हा जाणे जलांचा पति !

[library stamp]

ठाव्या सर्व धृतव्रत प्रभुस या संवत्सराच्या प्रजा,
मास द्वादश, एक आणखि कधीं ये मास जोडून ज्यां. २

जो उत्तुंग अफाट वात अवघें व्यापूनियां धांवतो,
त्याच्याही गतिला अकुंठित अशा हा जाणता जाणतो
वाताच्याहि पलीकडे गगनिं जे उच्चस्थलीं राहती
ते अध्यासितही अशेष असती या ज्ञात वेत्याप्रति. ३

पाळी हा नियमांस सादर असे सामर्थ्य निस्सीम या,
स्वस्थानांत विराजमान विभु हा साम्राज्य शासावया.
केल्या वा करणार ज्या कृति अम्ही जाणूनि वा नेणुनी
त्या झाल्या वरुणाचिया न सुटणें केव्हांहि दृष्टींतुनी. ४

अदितिसुत असा हा शक्तिसंपन्न देव
प्रभु वरुण अम्हा सन्मार्ग दावो सदैव !
सदय असुर आम्हां वांचवो दीर्घ काल
कवनिं सतत गाया कीर्ति त्याची विशाल ! ५

---

# नाथ तूं अनाथ जनांचा !

( ऋग्वेद, १–२९ मधील कल्पनांच्या आधारें. )

सत्य हें नित्य तव रूप,
नाथ तूं अनाथ जनांचा !
भूतलीं पडे पाऊस—सन्तत तव औदार्यांचा !
गाजतो नगारा अजुनी—जगतीं तव सामर्थ्यांचा !
विक्रमा तुझ्या वर्णाया—वाणीला नाहीं वाचा !
इन्द्रा ! हा आर्यसमाज
हीन दीन झाला आज
तुजलाच तयाची लाज

उद्धारक हो तर त्याचा—नाथ तूं अनाथ जनांचा ! १

कोणींहि पदीं तुडवावें—आर्यांना नुरला मान !
कचराच मानिती सारे—आर्यांचें तत्त्वज्ञान !
आर्यांच्या आकांक्षांचा—घडिघडी होय अपमान !
शौर्यांचें तूंच निधान,
वृत्रघ्न तुझें अभिधान !
तुज आर्यांचा अभिमान !
बघणार अन्त किति त्यांचा—नाथ तूं अनाथ जनांचा ! २

आर्यांच्या सामर्थ्यांचा—उच्छेद जयांनीं केला
प्रेक्षीत कालकन्या त्या—बैसल्या एकमेकींला !
तरि अखण्डनिद्राधीन—कर शत्रुशासना ! त्यांला.
वैऱ्यांत वसूं दे सुप्ति !
जागृती मित्रसंघीं ती !
जे अभद्र वाणी वदती
उच्छेद होउंदे त्यांचा !—नाथ तू अनाथ जनांचा ! ३

आर्यांच्या दुर्दैवाला—जखडोत मृत्युचे पाश !
शत्रूंसह आर्यजनांच्या—शोकांचा होवो नाश !
कीर्तिनें तुडुंब भरूदे—आर्यांच्या हा अवकाश !
धेनुनीं, चपल तुरगांनीं,
धनधान्यभोग्यवस्तूंनीं
संपन्न आर्य होवोनी
उगवो रवि तद्विभवाचा !—नाथ तूं अनाथ जनाचा ! ४

---

# विश्वात्मा

( ऋग्वेद, ४-४२-१/६ )

मी विश्वात्मा, अमरगण हे जेविं आधीन माझ्या,
मी राष्ट्राचा उभयविध या क्षात्रसंपन्न राजा,
देवां माझी कृतिरत करी प्रेरणा व्यापकाची,
द्यावापृथ्वींप्रत उजळिते ज्योत माझीच साची. १

तो मी राजा वरुण, पहिलीं तीं असुर्यें समस्त—
माझ्या ठायीं धरुनि दिधलें मींच त्यां शाश्वतत्व;
देवां माझी कृतिरत करी प्रेरणा व्यापकाची
द्यावापृथ्वींप्रत उजळिते ज्योत माझीच साची. २

आहें जैसा प्रभु वरुण मी, इन्द्रही मी तसाच,
झालों मीच प्रसृत गहनें तीं रजें दोन साच;
मी विद्यांचा निधि सकळही, मी कलांचा निवास,
त्यां त्वष्ट्यानें धरुनि भुवनें त्यां दिलें चालनास. ३

माझ्या योगें भरुनि अवघें वाहतें दिव्य आप
ठेवी माझा स्थिर चिर ऋतीं देवलोका प्रताप;
मी आदित्य प्रकट, ऋत हें रूप माझें सदाचें,
त्रैलोक्यातें पसरुनि दिलें मींच, योगें ऋताचे. ४

धांवा माझा करिति समरोत्कण्ठ योद्धे समस्त,
धांवा माझा करिति अरिनीं वेढिले देवभक्त;
देतों त्यांतें यश, करुनि तच्छत्रुची पूर्ण हानि,
मी ऐश्वर्यमद, सबळ मी इन्द्र भक्ताभिमानी. ५

केल्या विश्वांतिल सकल मीं वस्तु निर्माण नाना,
शोधी तेजोबल मम असा स्वामिही सांपडेना !
अत्यानन्दप्रद मज सदा सोम वा सामगान,
हर्षें माझ्या उभयहि रजें होति कंपायमान ! ६

स्तोता—

जाणतें महिमा तूझा त्रैलोक्य, परमेश्वरा !

परमेश्वर—

मत्प्रीत्यर्थ तुझीं गीतें, जाणतों मीहि शाहिरा ! ७

REFBK-0005350

पुनरागमनाय च ।

# शुद्धिपत्र.

—:०:—

| पृष्ठ | पद्यपंक्ति | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | २० | कायकवनीं | काय कवनीं |
| २३ | २४ | काबळे | कावळे |
| ४६ | ७ | बत्त्विशी | बत्तिशी |
| ६४ | ५ | पिशाच | " पिशाच |
| ६८ | ११ | कल्हप्रिया | कलहप्रिय |
| ७७ | १० | थटे | थेट |
| १०१ | १० | अ पत्ति | आपत्ति |
| १०४ | ६ | कुशावत | कुशावर्त |
| १०४ | २२ | राष्टहिताची | राष्ट्रहिताची |
| १०५ | ६ | वायाच | वार्यांचे |
| १०५ | २३ | चन्द्य | चन्दन |
| १०७ | ६ | चचला | चंचला |
| १०९ | ७ | समर्थाचिया | समर्थांचिया |
| १२० | ७ | वळे | वेळ |
| १२० | २३ | पूर्णगड | पूर्णागड |
| १२६ | १० | कण | कर्णं |
| १२६ | १५ | साख्यासनीं | सौख्यासनीं |
| १३० | २० | जो | जे |
| १४६ | २४ | सर्खेलाचा | सर्खेलांचा |
| १४९ | ६ | पूर्णगड | पूर्णगड |
| १५३ | २ | त | ते |

| पृष्ठ | पद्यपंक्ति | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १५४ | ७ | आमुच | आमुचा |
| १५५ | ६ | तुम्हांप्र त | तुम्हांप्रत |
| १५७ | २० | गजना | गर्जना |
| १६३ | १२ | वर | वैर |
| १६४ | ७ | वखरी | वैखरी |
| १६८ | १२ | अधचतुर | अर्धचतुर |
| १६९ | १ | राघवमत्स्य | राघवमत्स्या |
| १६९ | २० | स्वगसुखांचा | स्वर्गसुखांचा |
| १७४ | ५ | नराश्य | नैराश्य |
| १८४ | ९ | परते | परतें |
| १८५ | ९ | सुन्दरीची | सुन्दरींची |
| १८६ | ११ | कीर्तिमत | कीर्तिमती |

मराठी ग्रं... क्र. ५३५०